१) मंडळांने उपकरापोटी जमा असलेली रक्कम व कर्मचाऱ्यांची आवश्यकता याचा फेरआढावा घेऊन, यासोबत जोडलेल्या **परिशिष्ट-अ व ब** मध्ये दर्शविलेल्या पदांच्या संख्येच्या कमाल मर्यादेपर्यंत, मंडळामध्ये पदे भरण्याबाबत प्रथम ठराव करण्यात यावा.तथापि, प्रत्यक्ष पदे भरताना इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती ) अधिनियम, १९९६ च्या कलम २४ (३) नुसार ' मंडळ कोणत्याही आर्थिक वर्षात एकूण खर्चाच्या निव्वळ ५ टक्के रक्कमेपर्यंत, मंडळ सदस्य व अधिकारी यांना देय असलेले भत्ते तसेच पगारापोटी प्रशासकीय व

अन्य प्रशासकीय बार्बीकरीता व मंडळ बैठकीकरिता खर्च करु शकेल ', या तरतुदीच्या अधीन राहून कार्यवाही करण्यात यावी.

२) मान्यता देण्यात आलेल्या सर्व पदांसाठीचे सेवाप्रवेश नियम हे शासनाच्या समकक्ष पदांसाठी असलेल्या सेवाप्रवेश नियमाआधारे तयार करुन घ्यावेत व त्यास मंडळाची मान्यता घ्यावी.

३) सदर पदांसाठी कामगार आयुक्त कार्यालयातील समकक्ष पदांसाठी लागू असलेली सहाव्या वेतन आयोगाची परिशिष्ठ अ व ब मध्ये नमुद केलेली वेतनश्रेणी लागू राहील.

४) सदर पदे भरण्यासाठी शासनाचे सर्व प्रचलित नियमांचे पालन करुन विहित कार्यपध्दती अवलंबविण्यात यावी.

५) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती ) नियम, २००७ च्या कलम ४० नुसार सदर पदे प्रतिनियुक्तीने भरण्याची तरतुद आहे. त्यानुसार आवश्यकतेनुरुप कार्यवाही करण्यात यावी.

६) कामगार आयुक्त यांनी प्रस्तावित केलेल्या कामगार उपायुक्त (वेतनश्रेणी १५६०० — ३९१०० ग्रेड पे रु ६६००) या दर्जाच्या एका पदास वित्त विभागाने मंत्री मंडळाच्या मान्यता घेण्याच्या अटीच्या अधीन राहून संमती दिली आहे. त्यानुसार सदर पदास मंत्रीमंडळाची मान्यता घेण्याची कार्यवाही सुरु असून त्या पदास स्वतंत्रपणे मान्यता देण्यात येईल.

७) इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या उपकरापोटी जमा झालेल्या रक्कमेमध्ये भविष्यात घट झाल्यास या पदांच्या वेतन, भत्ते, अन्य प्रशासकीय बार्बीकरीता व मंडळ बैठकी वरील खर्च भागविण्यासाठी मंडळास कोणत्याही प्रकारचे अनुदान/अर्थसहाय्य शासनाकडून देण्यात येणार नाही.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. २६६/१२/ व्यय-१६, दि. २४ ऑगस्ट, २०१२ व अनौपचारीक संदर्भ वित्तीय सुधारणा, दि. ११.९.२०१२ नुसार वित्त विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय शासनाच्या संकेतस्थळावर 201210041504391101 या क्रमांकावर उपलब्ध आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सोमनाथ पोटरे)
कार्यासन अधिकारी

प्रत :-

मा.राज्यपाल यांचे सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
मा.मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय,मुंबई.

(मंत्रालयीन सर्व विभागांकडून हा शासन आदेश त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व सार्वजनिक उपक्रमांच्या/कार्यालयांच्या निदर्शनास आणण्यात यावा.)

D:/New volume/back up/construction work/mandal post creation

महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा अनुज्ञेयता व लेखा परिक्षा) मुंबई/नागपूर
मुख्य वनसंरक्षक, वन विभाग, नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी , वांद्रे,मुंबई
निवासी लेखा परिक्षा अधिकारी , मुंबई
सर्व कोषागारे
मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग
मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग
सर्व विभागीय आयुक्त
कामगार आयुक्त तथा अध्यक्ष, इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ,
कामगार भवन, दुसरा मजला, ई ब्लॉक, सी- २०,बांद्रा- कुर्ला कॉम्प्लेक्स, सिटी पार्कजवळ, बांद्रा (पू), मुंबई.५१
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व महानगरपालिका/नगरपालिका आयुक्त
सर्व गटविकास अधिकारी, पंचायत समिती
सर्व मुख्याधिकारी, नगर परिषद
सर्व नोंदणी अधिकारी
कामगार आयुक्त यांच्या आस्थापनेवरील सर्व क्षेत्रीय अधिकारी ( द्वारा कामगार आयुक्त)
सर्व अधिकारी (कामगार प्रभाग) उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२.
कक्ष अधिकारी (प्रशासन-२) उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग यांना सदर शासन निर्णय वेबसाईटवर टाकण्याच्या विनंतीसह अग्रेषित/निवडनस्ती.

शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,क्रमांक : इमारत २०१२/प्र.क्र.१६१/कामगार ७अ, दिनांक ३ ऑक्टोबर, २०१२ सोबतचे सहपत्र)

## परिशिष्ट – अ

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या मुंबई येथील मुख्यालयासाठीच्या नवीन पदनिर्मितीचा तपशिल**

| अ.क्र. | पदनाम | एकूण पदे | सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी वेतन | वेतन ग्रेड |
|---|---|---|---|---|
| १. | सहाय्यक कामगार आयुक्त (इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ) | १ | ९३०० - ३४८०० | ४६०० |
| २. | लेखा व वित्त अधिकारी वर्ग- २(प्रतिनियुक्तीवर) | १ | ९३००-३४८०० | ४४०० |
| ३. | सरकारी कामगार अधिकारी (इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ) | १ | ९३००-३४८०० | ४४०० |
| ४. | अधिक्षक | १ | ९३००-३४८०० | ४३०० |
| ५. | लेखापाल | १ | ९३००-३४८०० | ४२०० |
| ६. | वरिष्ठ लिपिक | २ | ५२०० -२०२०० | २४०० |
| ७. | मराठी/इंग्रजी लघुटंकलेखक | १ | ५२०० -२०२०० | २४०० |
| ८. | लिपिक-टंकलेखक | ४ | ५२०० -२०२०० | १९०० |
| ९. | वाहन चालक | २ | ५२०० -२०२०० | १९०० |
| १०. | दप्तरी | १ | ४४४० -७४४० | १६०० |
| ११. | शिपाई | ३ | ४४४० -७४४० | १३०० |
| | **एकूण पदे** | **१८** | | |

D:/New volume/back up/construction work/mandal post creation

(शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,क्रमांक : इमारत २०१२/प्र.क्र.१६१/कामगार ७अ, दिनांक ३ ऑक्टोबर,२०१२ सोबतचे सहपत्र)

## परिशिष्ट — ब

## इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या जिल्हा कार्यालयासाठीच्या नवीन पदनिर्मितीचा तपशिल

| अ.क्र. | पदनाम | सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी | |
|---|---|---|---|
| | | वेतन | वेतनग्रेड |
| १. | सरकारी कामगार अधिकारी (इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ) | ९३०० - ३४८०० | ४४०० |
| २. | लिपिक — टंकलेखक | ५२०० - २०२०० | १९०० |

| अ.क्र. | जिल्ह्याचे नांव | सरकारी कामगार अधिकारी (इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ) (पदसंख्या) | लिपिक-टंकलेखक (पदसंख्या) |
|---|---|---|---|
| | **कोकण विभाग** | | |
| १. | मुंबई शहर | १ | १ |
| २. | मुंबई उपनगर | १ | १ |
| ३. | ठाणे | १ | १ |
| ४ | रायगड | १ | १ |
| ५. | रत्नागिरी, सिंधूदुर्ग | १ | १ |
| | एकूण कोकण विभाग | ५ | ५ |
| | **पुणे विभाग** | | |
| १. | पुणे | १ | १ |
| २. | सांगली, सातारा | १ | १ |
| ३ | कोल्हापूर | १ | १ |
| ४. | सोलापूर | १ | १ |
| | एकूण पुणे विभाग | ४ | ४ |
| | **नाशिक विभाग** | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १. | नाशिक, अहमदनगर | १ | १ |
| २. | जळगांव, धुळे व नंदुरबार | १ | १ |
| | एकूण नाशिक विभाग | २ | २ |
| | **औरंगाबाद विभाग** | | |
| १. | औरंगाबाद,जालना | १ | १ |
| २. | नांदेड, परभणी, हिंगोली व लातूर | १ | १ |
| ३. | बीड, उस्मानाबाद | १ | १ |
| | एकूण औरंगाबाद विभाग | २ | २ |
| | **अमरावती विभाग** | | |
| १. | अमरावती, यवतमाळ | १ | १ |
| २. | अकोला, वाशिम व बुलढाणा | १ | १ |
| | एकूण अमरावती विभाग | २ | २ |
| | **नागपूर विभाग** | | |
| १. | नागपूर, वर्धा | १ | १ |
| २. | गोंदिया, भंडारा | १ | १ |
| ३. | चंद्रपूर, गडचिरोली | १ | १ |
| | एकूण नागपूर विभाग | ३ | ३ |
| | **सर्व विभागाची एकत्रित एकूण पदे** | **१९** | **१९** |

RNI No. MAHBIL /2009/37831
Reg. No. MH/MR/South-339/2011-13

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ५, अंक ८६(२)] सोमवार, ऑक्टोबर २१, २०१३/आश्विन २९, शके १९३५ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक १४३

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### INDUSTRIES, ENERGY AND LABOUR DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated 11th October 2013

*NOTIFICATION*

BUILDING AND OTHER CONSTRUCTION WORKERS (REGULATION OF EMPLOYMENT AND CONDITIONS OF SERVICE) ACT, 1996.

No. Emarat 2013/CR 104/Lab-7(A).—In exercise of the powers conferred by section 62 read with sub-section (*1*) of section 22 of the Building and Other Construction Workers (Regulation of Employment and Conditions of Service ) Act, 1996 (27 of 1996), the Government of Maharashtra, after consultation with the Expert Committee constituted under section 5 of the said Act, hereby makes the following rules to amend the Maharashtra Building and Other Construction Workers (Regulation of Employment and Conditions of Service ) Rules, 2007, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Building and Other Construction Workers (Regulation of Employment and Conditions of Service ) (Amendment) Rules, 2013.

2. For rule 45 of the Maharashtra Building and Other Construction Workers (Regulation of Employment and Conditions of Service) Rules, 2007, the following rule shall be substituted, namely:—

"45. *Functions of the Board.*—(*1*) The Board may, by resolution, subject to the availability of Funds, provide the financial assistance to the beneficiary for the following purposes to such extent, as it deems fit, namely :—

(*i*) The following financial assistance for the education of children of the beneficiaries, namely :-

(*a*) for education of two female children studying in I to X Std. in the Government recognized schools, for every educational year;

(*b*) for two children securing minimum 50 % or more marks in X and XII standard examination;

(*c*) for two children studying in I, II and III year of graduation, towards admission fees, purchase of books and educational material, for every educational year;

(*d*) for two children studying for medical and engineering courses in the Government recognized Medical and Engineering Colleges and Institutes respectively, for every educational year;

(*e*) for two children studying from XII standard upto graduation as an encouragement, for every educational year.

(*ii*) Subject to the terms and conditions as may be determined by the State Government, the medical expenses such as expenses for medical treatment, medication, hospitalization, surgery charges, doctor's fees, follow-up treatment, etc., incurred by the beneficiary, his spouse, his children below the age of 18 years and dependent parents, for the treatment of major ailments like heart disease, paralysis, tuberculosis, cancer, etc. and for such other ailments declared as major ailments by the State Government, from time to time.

(2) The Board may, by resolution, subject to the availability of Funds, also make the provisions for the following other welfare measures and facilities under clause (*h*) of sub-section (*1*) of section 22 of the said Act, to such extent, as it may deem fit, namely :—

(*a*) premium under JanashreeBimaYojana of LIC of India payable for every beneficiary;

(*b*) a financial assistance for natural delivery and delivery by caesarean operation to the wife of the beneficiary;

(*c*) a Family Welfare financial assistance to the only female child, where the beneficiary's husband or wife has undergone family planning operation after giving birth to only female child;

(*d*) a financial assistance to the beneficiary who has suffered 75% or more permanent disability due to accident while in service;

(*e*) an immediate funeral financial assistance to the nominee of the deceased beneficiary;

(*f*) per month financial assistance for a period of five years to the widow or widower of the beneficiary who died during the course of employment;

(*g*) one time financial assistance to the legal heir of the deceased beneficiary who died during the course of employment;

(*h*) supply of articles of daily needs, to the beneficiary;

(*i*) travel allowance to the beneficiary and his family members, *viz.* spouse and two children below the age of eighteen years, to the extent of 1,000 kilometers by the Maharashtra State Road Transport Corporation (M.S.R.T.C.) bus, once in a year;

(*j*) grant for meeting expenses of the first registered marriage of beneficiary;

(*k*) skill up-gradation training for beneficiary with stipend;

(*l*) establishment of training academy in the State, for the beneficiaries as per the directions of the State Government issued in this behalf, from time to time; and

(*m*) per year contribution of Rs.1,000/- to New Pension Scheme (NPS) account opened by the beneficiary under the Swavlamban Pension Scheme of the Government of India. ".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

ARVIND KUMAR,
Principal Secretary (Labour) to Government

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGAN[illegible] AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT [illegible]

महाराष्ट्र शासन

क्रमांक: इबांका-२०१६/१६८/प्र.क्र.८२/काम-७
उद्योग उर्जा व कामगार विभाग,
मादामा कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १६ जून, २०१६.

प्रति,

कामगार आयुक्त,
कामगार आयुक्त यांचे कार्यालय,
कामगार भवन, ई-ब्लॉक, सी-२०,
बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व)
मुंबई- ४०० ०५१.

विषय: इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या योजनांच्या लाभाच्या रकमेत वाढ करण्याबाबत.

संदर्भ: (१) सहायक कामगार अधिकारी तथा सचिव महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांचे पत्र क्र.जा.क्र.मइवइबाकमं/ठराव-चर्चा/२०१५/३७०, दिनांक ४.२.२०१६.

(२)कामगार आयुक्त यांचे पत्र क्र.का.आ./मइवइबांकम्र/२०१६/११८४, दिनांक २७.५.२०१६.

महोदय,

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक १८.१.२०१६ रोजीच्या बैठकीत, मंडळाच्या अस्तित्वात असलेल्या योजनांच्या लाभाच्या रक्कमेत वाढ करण्याबाबतचा ठराव संमत करण्यात आला होता. त्यानुसार मंडळाच्या विविध योजनांच्या लाभाच्या रक्कमेत वाढ करण्याबाबत मंडळाने शासन मान्यतेकरिता पाठविलेल्या प्रस्तावास अनुसरुन मंडळाकडील नोंदीत पात्र बांधकाम कामगारांकरिता असलेल्या खालील योजना सुधारित स्वरुपात राबविण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

१) नोंदीत लाभार्थी स्त्री बांधकाम कामगारास तसेच नोंदीत पुरुष लाभार्थी बांधकाम कामगारांच्या पत्नीस दोन जिवित अपत्यांपर्यंत नैसर्गीक प्रसुतीसाठी रु.१५,०००/- व शस्त्रक्रियेद्वारे प्रसुतीसाठी रु.२०,०००/- आर्थिक सहाय्य.

२) नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगारांच्या प्रती शैक्षणीक वर्षी शाळेतील किमान ७५% किंवा अधिक उपस्थिती असणाऱ्या दोन पाल्यांस इयत्ता १ ली ते ७ वी साठी प्रतिवर्षी रु.२५००/- आणि ८ वी ते १० वी साठी प्रतिवर्षी रु.५०००/- एवढे शैक्षणिक आर्थिक सहाय्य.

C:\Users\parveen jugari\Desktop\HIMPLE\GR\2016\Note docs\Note

३) नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगारांच्या दोन पाल्यांना इयत्ता १० वी व इयत्ता १२ मध्ये किमान ५० टक्के किंवा अधिक गुण प्राप्त झाल्यारा रु.१०,०००/- एवढे प्रोत्साहनात्मक शैक्षणिक सहाय्य.

४) नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगारांच्या दोन पाल्यांना इयत्ता ११ वी व इयत्ता १२ वी च्या शिक्षणासाठी प्रती शैक्षणिक वर्षी रु.१०,०००/- एवढे शैक्षणिक सहाय्य.

५) नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगारांच्या दोन पाल्यांना अथवा पुरुष कामगाराच्या पत्नीस पदवीच्या प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या प्रवेश, पुस्तके व शैक्षणिक सामुग्रीसाठी प्रतिवर्षी रु.२०,०००/- एवढे शैक्षणिक सहाय्य.

६) नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगारांच्या दोन पाल्यांना अथवा पुरुष कामगाराच्या पत्नीस शासनमान्य वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालयात किंवा संस्थेत प्रवेशासाठी, पुस्तके व शैक्षणिक साहित्य खरेदी इत्यादीसाठी- प्रती शैक्षणीक वर्षी वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमाकरिता रु.१,००,०००/- व अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाकरिता रु.६०,०००/- इतके शैक्षणिक अर्थसहाय्य.

७) नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगारांच्या दोन पाल्यांना पदविका शिक्षण घेत असलेल्या पाल्यास प्रती शैक्षणिक वर्षी रु.२०,०००/- आणि पदव्युत्तर पदवीका मध्ये शिक्षण घेत असलेल्या पाल्यास प्रती शैक्षणिक वर्षी रु.२५,०००/- एवढे आर्थिक सहाय्य.

८) एका मुलीच्या जन्मानंतर नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगार अथवा नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगाराच्या पती/ पत्नीने कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया केल्यास एका मुलीच्या नावे १८ वर्षापर्यंत रु.१,००,०००/- मुदत बंद ठेव.

९) नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगारास ७५ टक्के किंवा कायमचे अपंगत्व आल्यास त्यास रु.२,००,०००/- एवढे आर्थिक सहाय्य. तथापि, नोंदीत बांधकाम कामगाराचे विमा संरक्षण असल्यास, विमा रक्कमेची प्रतिपुर्ती अथवा रु.२,००,००० आर्थिक सहाय्य यापैकी कोणताही एकच लाभ अनुज्ञेय राहील.

१०) नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगाराचा मृत्यु झाल्यास त्याच्या नामनिर्देशित केलेल्या वारसास रु.१०,०००/- एवढी रक्कम अंत्यविधीसाठी मदत.

११) नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगाराचा मृत्यु झाल्यास त्याच्या विधवा पत्नी अथवा स्त्री कामगारांच्या विधुर पतीस प्रतिवर्षी रु.२४,०००/- एवढे आर्थिक सहाय्य **(पाच वर्षापर्यंत)** .

१२) नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगाराचा कामावर असताना मृत्यू झाल्यास त्याच्या कायदेशीर वारसास रु.५,००,०००/- एवढे आर्थिक सहाय्य.

१३) नोंदीत लाभार्थी स्त्री बांधकाम कामगारास व नोंदीत पुरुष लाभार्थी बांधकाम कामगारास तसेच कुटुंबातील सदस्यांस गंभीर रोग / आजाराच्या उपचारार्थ रुपये १,००,०००/- एवढे आर्थिक सहाय्य **(एका सदस्यास केवळ एकदाच आणि कुटुंबातील दोन सदस्यांपर्यंत मर्यादित)**. तथापि, आरोग्य विमा योजना लागू नसल्यासच सदर योजनेचा लाभ देण्यात यावा.

१४) संगणकाचे शिक्षण (MS-CIT) घेत असलेल्या नोंदीत लाभार्थी कामगारांच्या दोन पाल्यांना शुल्काची प्रतिपूर्ती. तथापि, MS-CIT उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र सादर केल्यास सदर शुल्काची प्रतिपूर्ती करण्यात यावी.

१५) नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगारांच्या स्वत:च्या पहिल्या विवाहाच्या खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी रु.३०,०००/- अनुदान.

AT GOVERNMENT CENTRAL PRESS, ...

२. सदर योजनांच्या अंमलबजावणीत कोणतीही अनियमितता होणार नाही, याची दक्षता घ्यावी. त्याकरिता मंडळाने विशिष्ट कार्यप्रणाली निश्चित करुन व संगणक नोंद प्रक्रियेचा अवलंब करुन योजनांची प्रभावी व परिणामकारक अंमलबजावणीकरावी. तसेच अद्ययावत अभिलेख ठेवावेत. त्याचप्रमाणे सदरहू योजनांच्या अंमलबजावणीचा त्रैमासिक अहवाल शासनास स्वतंत्रपणे/नियममितपणे सादर करावा.

आपला,

(प्रशांत पु. राठोड)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत,

(१) सहायक कामगार आयुक्त तथा सचिव इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, कामगार आयुक्त कार्यालय, कामगार भवन, बांद्रा-कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१ यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव.

(२) निवडनस्ती (कामगार-७)

कामगार महाराष्ट्र राज्य मुंबई (रचना व कार्यपद्धती शाखा) कार्यासन - ७४
26 JUL 2017
आवक क्रमांक ९७५०
कार्यासन क्रमांक ४.०

# महाराष्ट्र शासन

इबांका - २०१६/०८/प्र.क्र.४१३/काम ७,
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
दिनांक:- २४ जुलै,२०१७

313
04/08/17

प्रति,

कामगार आयुक्त,
"कामगार भवन",
वांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,
बांद्रा (पूर्व), मुंबई -५१.

**विषय:-** महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदीत बांधकाम कामगाराचा नैसर्गिक मृत्यु झाल्यास त्यास रु. २ लाख आर्थिक सहाय्य देणेबाबत.

संदर्भ:-आपले पत्र क्र.मइवइबांकाकमं/मंडळ ठराव /२०१७/३१३ दि.९.२.२०१७

महोदय,

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील जे बांधकाम कामगार प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजनेचा लाभ देण्यासाठी वयाच्या निकषानुसार (वय वर्ष ५१ ते ६०) पात्र होणार नाही अशा सर्व नोंदणीकृत केवळ पात्र बांधकाम कामगारांना, नैसर्गिक मृत्यु झाल्यास त्यास रितसर रु.दोन लाख आर्थिक सहाय्य देण्याच्या योजनेचा लाभ देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

त्यानुसार आवश्यक ती उचित कार्यवाही तातडीने करण्यात यावी, ही विनंती.

आपला,

(द. य.डांगे)
कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन

प्रत: माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित.
१) सचिव,महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ,मुंबई.
२) निवडनस्ती कामगार-७

RNI No. MAHBIL /2009/37831
Reg. No. MH/MR/South-339/2011-13

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ५, अंक ८६(२)] सोमवार, ऑक्टोबर २१, २०१३/आश्विन २९, शके १९३५ [पृष्ठे २, किंमत : रुपये १.००

असाधारण क्रमांक १४३

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

## INDUSTRIES, ENERGY AND LABOUR DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated 11th October 2013

*NOTIFICATION*

BUILDING AND OTHER CONSTRUCTION WORKERS (REGULATION OF EMPLOYMENT AND CONDITIONS OF SERVICE) ACT, 1996.

No. Emarat 2013/CR 104/Lab-7(A).—In exercise of the powers conferred by section 62 read with sub-section (*1*) of section 22 of the Building and Other Construction Workers (Regulation of Employment and Conditions of Service ) Act, 1996 (27 of 1996), the Government of Maharashtra, after consultation with the Expert Committee constituted under section 5 of the said Act, hereby makes the following rules to amend the Maharashtra Building and Other Construction Workers (Regulation of Employment and Conditions of Service ) Rules, 2007, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Building and Other Construction Workers (Regulation of Employment and Conditions of Service ) (Amendment) Rules, 2013.

2. For rule 45 of the Maharashtra Building and Other Construction Workers (Regulation of Employment and Conditions of Service) Rules, 2007, the following rule shall be substituted, namely:—

"45. *Functions of the Board.*—(*1*) The Board may, by resolution, subject to the availability of Funds, provide the financial assistance to the beneficiary for the following purposes to such extent, as it deems fit, namely :—

(*i*) The following financial assistance for the education of children of the beneficiaries, namely :-

(*a*) for education of two female children studying in I to X Std. in the Government recognized schools, for every educational year;

(*b*) for two children securing minimum 50 % or more marks in X and XII standard examination;

(*c*) for two children studying in I, II and III year of graduation, towards admission fees, purchase of books and educational material, for every educational year;

(*d*) for two children studying for medical and engineering courses in the Government recognized Medical and Engineering Colleges and Institutes respectively, for every educational year;

(*e*) for two children studying from XII standard upto graduation as an encouragement, for every educational year.

(*ii*) Subject to the terms and conditions as may be determined by the State Government, the medical expenses such as expenses for medical treatment, medication, hospitalization, surgery charges, doctor's fees, follow-up treatment, etc., incurred by the beneficiary, his spouse, his children below the age of 18 years and dependent parents, for the treatment of major ailments like heart disease, paralysis, tuberculosis, cancer, etc. and for such other ailments declared as major ailments by the State Government, from time to time.

(2) The Board may, by resolution, subject to the availability of Funds, also make the provisions for the following other welfare measures and facilities under clause (*h*) of sub-section (*1*) of section 22 of the said Act, to such extent, as it may deem fit, namely :—

(*a*) premium under JanashreeBimaYojana of LIC of India payable for every beneficiary;

(*b*) a financial assistance for natural delivery and delivery by caesarean operation to the wife of the beneficiary;

(*c*) a Family Welfare financial assistance to the only female child, where the beneficiary's husband or wife has undergone family planning operation after giving birth to only female child;

(*d*) a financial assistance to the beneficiary who has suffered 75% or more permanent disability due to accident while in service;

(*e*) an immediate funeral financial assistance to the nominee of the deceased beneficiary;

(*f*) per month financial assistance for a period of five years to the widow or widower of the beneficiary who died during the course of employment;

(*g*) one time financial assistance to the legal heir of the deceased beneficiary who died during the course of employment;

(*h*) supply of articles of daily needs, to the beneficiary;

(*i*) travel allowance to the beneficiary and his family members, *viz.* spouse and two children below the age of eighteen years, to the extent of 1,000 kilometers by the Maharashtra State Road Transport Corporation (M.S.R.T.C.) bus, once in a year;

(*j*) grant for meeting expenses of the first registered marriage of beneficiary;

(*k*) skill up-gradation training for beneficiary with stipend;

(*l*) establishment of training academy in the State, for the beneficiaries as per the directions of the State Government issued in this behalf, from time to time; and

(*m*) per year contribution of Rs.1,000/- to New Pension Scheme (NPS) account opened by the beneficiary under the Swavlamban Pension Scheme of the Government of India. ".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

ARVIND KUMAR,
Principal Secretary (Labour) to Government

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत बांधकाम कामगार लाभार्थ्यांसाठी गृहपयोगी वस्तू संच वितरण योजनेस मंजुरी देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, उर्जा व कामगार विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: इबांका २०२०/प्र.क्र.१०३/कामगार ७**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: १८ जानेवारी, २०२१

संदर्भ :-सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांचे पत्र क्र. जा. मइवइबाकमं/ गृहपयोगी वस्तू संच/२०६/२०२०, दि.१८.१२.२०२०

**प्रस्तावना :-**

इमारत व इतर बांधकाम या व्यवसायात काम करणाऱ्या बांधकाम कामगारांना संबंधित आस्थापनेचे काम पूर्णत्वास आल्यावर रोजगारासाठी नविन बांधकाम जेथे सुरु होते तेथे स्थलांतरीत व्हावे लागते. अशा स्थलांतराच्या ठिकाणी त्यांना नव्याने निवास, पाल्यांचे शिक्षण, आरोग्यविषयक समस्या व भोजन याबाबत जुळवुन घ्यावे लागते.

त्यांना दैनंदिन भोजन तयार करण्यास सहाय्य व्हावे म्हणून महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांनी दिनांक २७.१०.२०२० रोजीच्या बैठकीत राज्यातील मंडळाच्या १० लक्ष नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना गृहपयोगी वस्तू संच वितरण करण्याबाबतचा ठराव पारित करण्यात आला.

सदर ठरावाच्या अनुषंगाने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत लाभार्थी बांधकाम (ज्याची नोंदणी सक्रिय आहे) कामगारांच्या गृहपयोगी वस्तू संच वितरण योजनेस मंजुरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत नोंदीत इमारत व इतर बांधकाम कामगार लाभार्थी (ज्याची नोंदणी सक्रिय आहे) यांचेसाठी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने गृहपयोगी वस्तू संच वितरण करण्याच्या योजनेस शासन मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

**योजनेच्या अटी व शर्ती :-**

१. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत नोंदणीकृत असलेला बांधकाम कामगार (ज्याची नोंदणी सक्रिय आहे) या योजनेचा लाभार्थी राहील.

२. नोंदीत इमारत व इतर बांधकाम कामगार लाभार्थी (ज्याची नोंदणी सक्रिय आहे) यांनी विहीत नमुन्यातील मागणी अर्ज प्राधिकृत सहाय्यक कामगार आयुक्त (जिल्हा कार्यकारी अधिकारी, मइवइबाकमं)/ सरकारी कामगार

अधिकारी (उपजिल्हा कार्यकारी अधिकारी, मइवइबाकमं) यांचेकडे भरून दिल्यानंतर गृहपयोगी वस्तू संच पुरविण्यात येतील.

३. जिल्हा स्तरावरील सहाय्यक कामगार आयुक्त (जिल्हा कार्यकारी अधिकारी, मइवइबाकमं) /सरकारी कामगार अधिकारी (उपजिल्हा कार्यकारी अधिकारी, मइवइबाकमं) योजनेचे समन्वय अधिकारी (नोडल अधिकारी) राहतील.

४. गृहपयोगी वस्तू संचामध्ये खालील वस्तूंचा समावेश आहे:-

| अ.क्र | गृहपयोगी संचातील वस्तू | नग |
|---|---|---|
| १ | ताट | ०४ |
| २ | वाटया | ०८ |
| ३ | पाण्याचे ग्लास | ०४ |
| ४ | पातेले झाकणासह | ०१ |
| ५ | पातेले झाकणासह | ०१ |
| ६ | पातेले झाकणासह | ०१ |
| ७ | मोठा चमचा (भात वाटपाकरीता) | ०१ |
| ८ | मोठा चमचा (वरण वाटपाकरीता) | ०१ |
| ९ | पाण्याचा जग (२ लीटर ) | ०१ |
| १० | मसाला डब्बा (०७ भाग) | ०१ |
| ११ | डब्बा झाकणासह (१४ इंच) | ०१ |
| १२ | डब्बा झाकणासह (१६ इंच) | ०१ |
| १३ | डब्बा झाकणासह (१८ इंच) | ०१ |
| १४ | परात | ०१ |
| १५ | प्रेशर कुकर -०५ लिटर (स्टेनलेस स्टील) | ०१ |
| १६ | कढई (स्टील) | ०१ |
| १७ | स्टीलची टाकी (मोठी) झाकणासह व वगराळासह | ०१ |
| | एकूण | ३० |

५. नोंदीत इमारत व इतर बांधकाम कामगार लाभार्थी (ज्याची नोंदणी सक्रिय आहे) यांना गृहपयोगी वस्तू संच पुरविण्याबाबत ई-निविदा पध्दतीचा अवलंब करावा व नोंदणीकृत, नामांकित व अनुभवी संस्थेची निवड करावी.

६. गृहपयोगी वस्तू संचाची निविदा स्विकृत करण्यापूर्वी गृहपयोगी वस्तू संचामधील वस्तूंच्या दर्जाची शासन मान्य प्रयोगशाळेकडून तपासणी करुन घ्यावी.

७. वस्तू व सेवाकर (GST) वगळता पॅकिंग, पुरवठा, वाहतूक, साठवणूक, विमा, वितरण, बायोमॅट्रीक,फोटो, मनुष्यबळ पुरवठा इत्यादी सर्व खर्चाचा गृहपयोगी वस्तू संचाच्या दरामध्ये समावेश राहील.

८. गृहपयोगी वस्तू संचातील वस्तूंवर मंडळाचे नाव नक्षीदारपणे व कोरीव होणे (Embossing/ Laser Engraving) अनिवार्य आहे.



ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING ... CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, ... CHARNI ROAD, MUMBAI ...

९. नोंदीत इमारत व इतर बांधकाम कामगार लाभार्थी (ज्याची नोंदणी सक्रिय आहे) यांना गृहपयोगी वस्तू संच प्राप्त झाल्यावर सरकारी कामगार अधिकारी (उपजिल्हा कार्यकारी अधिकारी, मइवइबाकमं) हे कामगार उप आयुक्त (उप मुख्य कार्यकारी अधिकारी, मइवइबाकमं) यांना पोचपावती सादर करतील. कामगार उपआयुक्त यांनी सरकारी कामगार अधिकारी यांचेकडून पोचपावती प्राप्त झाल्यावर देयकाची अदायगी करण्याच्या प्रमाणपत्रासह महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांना अहवाल सादर करावा. कामगार उपआयुक्त (उपमुख्य कार्यकारी अधिकारी, मइवइबाकमं) यांचेकडील प्रमाणपत्रासह अहवाल प्राप्त झाल्यावर महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ देयकाची अदायगी करेल.

१०. गृहपयोगी वस्तू संच वितरीत करताना नोंदीत इमारत व इतर बांधकाम कामगार लाभार्थी (ज्याची नोंदणी सक्रिय आहे) यांचे छायाचित्र काढणे व बायोमॅट्रीक पध्दतीने बोटांचे ठसे घेणे अनिवार्य राहील.

११. गृहपयोगी वस्तू संच वितरणाकरीता जिल्हा कार्यालयाशी संपर्क साधून संच वितरणाचे शिबीर (Camp) आयोजित करण्यात येतील.

१२. गृहपयोगी वस्तू संच पुरवठा करण्याची कार्यवाही मंडळाने विहित केलेल्या कालावधीत पूर्ण करावी. पुरवठयाचा कालावधी वाढविण्यास मान्यता देण्याचे अधिकार मंडळास राहतील.

१३. गृहपयोगी वस्तू संच वितरण योजनेसाठी येणारा खर्च मंडळाकडील जमा उपकर निधीमधून भागविण्यात यावा.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक २०२१०११८१७१६३३३३१० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

SHASHANK MADHAV SATHE

Digitally signed by SHASHANK MADHAV SATHE
Date: 2021.01.18 17:32:37 +05'30'

(श. मा. साठे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३. सर्व सन्माननीय विधानसभा/विधानपरिषद सदस्य.
४. मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव.
५. मा. राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव.

६. मा. अध्यक्ष तथा मा. मंत्री (कामगार) यांचे सचिव, इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.
७. मा.विरोधी पक्ष नेता (विधानपरिषद /विधानसभा) यांचे खाजगी सचिव.
८. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक.
९. सर्व अ.मु.स /प्र.स./सचिव मंत्रालयीन विभाग.
१०. प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहाय्यक.
११. समितीचे इतर सर्व सदस्य (व्दारा कामगार आयुक्त).
१२. कामगार आयुक्त, मुंबई/अतिरिक्त कामगार आयुक्त, मुंबई/पुणे/नागपूर.
१३. उप कामगार आयुक्त, मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती.
१४. सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.
१५. महालेखापाल-१/२, महाराष्ट्र (लेखापरिक्षा व लेखा अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
१६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१७. निवड नस्ती (कामगार-७).

| | | |
|---|---|---|
| | | त्यानुसार सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br>**ठराव: मंडळातील नोंदित बांधकाम कामगारांना त्यांच्या सुरक्षततेसाठी सुरक्षा संच (सेफ्टी किट) पुरविण्यात यावे, सुरक्षा संच (सेफ्टी किट) पुरवठ्याकरीता संचालक औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचनालय यांनी त्यांच्या दि.१९.०९.२०१७ च्या पत्रान्वये सुरक्षा साधनांच्या तांत्रिक बाबी तसेच बांधकाम कामगारांची सुरक्षा विचारात घेवून प्रस्तावातील केलेली सुरक्षा साधने बांधकाम कामगारांना पुरविण्यात यावे. तसेच सुरक्षा संच पुरवठयासाठी ई-निविदा पद्धतीने संस्था निश्चित करावी. त्याकरीता आवश्यक RFP Document मंडळाचे e-Goverance Consultant मे. KPMG यांच्या कडून तयार करून घेण्यात यावे व योजनेच्या अटी शर्ती, अंदाजित खर्च व त्यानुसार तयार केलेले RFP Document शासन मान्यतेस सादर करावे. शासन मान्यतेनुसार पूढील कार्यवाही करावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |
| ५. | **नोंदित बांधकाम कामगार व त्यांच्या पाल्यांसाठी Essentional Kit** | याबाबत मंडळ सचिव यांनी असे प्रतिपादन केले की, शासनाकडून मंडळातील बांधकाम कामगारांना Essential Kit पुरविणेबाबतचा प्रस्ताव मंडळास प्राप्त झालेला आहे. इमारत व इतर बांधकाम (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या कलम ४० व ६२ अन्वये राज्य शासन मंडळास योजनांची अंमलबजावणी करण्याबाबत आदेश देऊ शकते. |

अध्यक्ष

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | पुरविणेबाबत. | महाराष्ट्र शासन नियोजन विभाग शासन निर्णय दि.०५.१२.२०१६ अन्वये शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ मध्ये दर्शविण्यात आलेल्या ४४ वस्तू व नियोजन विभागाचे शासन निर्णय दि.०३.०३.२०१७ अन्वये समावेश करण्यात आलेल्या १८ वस्तू कोणत्याही योजनेंतर्गत खरेदी करून लाभार्थ्यांना वाटप/ वितरित करता येणार नाहीत. नियोजन विभागाच्या दि.०५.१२.२०१६ रोजीच्या शासन निर्णयात जर कल्याणकारी योजनेंतर्गत कोणतीही वस्तू/ साधनसामुग्री लाभार्थ्यांना द्यावयाचे असल्यास त्यांनी अनुसवायाच्या कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे.<br><br>या संदर्भात मे. टेलेस्टो कॉमेंट प्रा.लि. यांच्या दि.०६.०९.२०१७ रोजीच्या पत्रान्वये मा. प्रधान सचिव (कामगार) यांना बांधकाम कामगारांसाठी सुरक्षा संच पुरवठयाबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला. सदर प्रस्ताव मंडळास प्राप्त झालेला आहे.<br><br>सदर प्रस्तावानुसार बांधकाम कामगारांच्या दैनंदिन वापराकरीता आवश्यक साहित्य उपलब्ध करून देणे प्रस्तावित आहे. सदर साहित्याच्या संचामध्ये खालील वस्तू पुरविणे प्रस्तावित आहे.<br><br>१. प्लॅस्टिक मॅट -- १ नग<br>२. मॉस्क्यिुटो नेट- १ नग<br>३. सोलर टॉर्च- १ नग |



अध्यक्ष

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई




ON BEHALF ... AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI ... STATIONERY AND PUBLICATION, 21 A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI

| | | |
|---|---|---|
| | | ४. टिफीन बॉक्स- १ नग<br>५. वॉटर बॉटल- १ नग<br>६. आऊटर बॅग- १ नग<br>७. गमबूट- १ जोडी<br>८. गॅल्वानाईझ्ड ट्रंक – १ नग<br>उपरोक्त वस्तूंचा संच पुरवठयासाठी प्रतिसंच रू.५५००+ वस्तू सेवा कर प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.मंडळातील ३.१० लक्ष बांधकाम कामगारांची संख्या विचारात घेता सदर वस्तू संच पुरवठयाचा अंदाजित खर्च रू.१७५ कोटी राहील.<br>महाराष्ट्र शासन नियोजन विभागाच्या दि.०५.१२.२०१६ व दि.०३.०५.२०१७ मधील DBT द्वारे लाभार्थ्यांच्या खाती रोख स्वरूपात थेट रक्कम जमा करण्याच्या साधनसामुग्रीच्या यादीत उपरोक्त वस्तूंचा समावेश नाही. त्यामुळे सदर वस्तू ई-निविदा पध्दतीने खरेदी करून नोंदीत बांधकाम कामगारांना वितरीत करणे प्रस्तावित आहे. सदर प्रस्तावास मंडळाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर योजना मान्यतेचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात येईल. शासन मान्यतेनंतर ई-निविदा पध्दतीने अनुभवी संस्थेची नियुक्ती करून पुढील कार्यवाही करणे प्रस्तावित आहे. |



अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

| | | |
|---|---|---|
| | | यावर मा. कामगार आयुक्त यांनी असे सुचित केले की, सन २०१४ मध्ये नोंदणीकृत बांधकाम कामगारांना द्यावयाच्या भेटवस्तू ऐवजी रोख रक्कम रु. ३०००/- देणेबाबत निर्णय घेण्यात आला होता. त्याच धर्तीवर मंडळामार्फत Essentional Kit खरेदी करून देण्याऐवजी Essentional Kit च्या किमतीएवढी रक्कम DBT पद्धतीने कामगारांच्या खात्यात जमा करण्यात यावी. तसेच सुरक्षा संचामध्ये Protective Shoes देण्यात येत असल्यामुळे Essentional Kit मध्ये गम बूट घेतल्याने पुनरावृत्ती झाल्याचे दिसून येते. त्यावर मंडळाचे मा. अध्यक्ष यांनी सुचित केले की, मंडळाने बांधकाम कामगारांच्या बँक खात्यात निधी वर्ग केल्यानंतर बांधकाम कामगाराकडून Essentional Kit खरेदी करण्यात येईल, याची खात्री नाही यास्तव मंडळाकडून किट खरेदी करून देणे योग्य राहिल. यासंदर्भात मा. अध्यक्ष यांनी अशीही विचारणा केली की, DBT च्या शासन आदेशाच्या बाबीत सदर बाबींचा समावेश आहे किंवा कसे? यासंदर्भात खुलासा करताना मंडळ सचिव यांनी असे स्पष्ट केले कीं, महाराष्ट्र शासन नियोजन विभाग शासन निर्णय दि.०५.१२.२०१६ अन्वये शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ मध्ये दर्शविण्यात आलेल्या ४४ वस्तू व नियोजन विभागाचे शासन निर्णय दि.०३.०३.२०१७ अन्वये समावेश करण्यात आलेल्या १८ वस्तू कोणत्याही योजनेंतर्गत खरेदी करून लाभार्थ्यांना वाटप/ वितरित करता येणार नाहीत असे शासन आदेश आहेत. सदर दोन्ही यादीत Essentional Kit मधील वस्तूंचा समावेश नाही. यावर मा. कामगार प्रतिनिधी श्री. कुटास्कर यांनी सहमती दर्शवून नोंदित |

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

| | | |
|---|---|---|
| | | बांधकाम कामगारांकरीता Essentional Kit मंडळामार्फत खरेदी करून उपलब्ध करून देणे योग्य राहिल, असे मत व्यक्त केले.<br>त्यानुसार सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br>**ठराव: मंडळातील नोंदित बांधकाम कामगारांना त्यांच्या उपयोगासाठी प्रस्तावित Essentional Kit पुरविण्यात यावे, सदर कीटमध्ये गमबूट- १ जोडी ही बाब वगळण्यात यावी.Essentional Kit पुरवठ्याच्या अटी व शर्ती निश्चित कराव्यात. Essentional Kit पुरवठयासाठी ई-निविदा पद्धतीने संस्था निश्चित करावी. त्याकरीता आवश्यक RFP Document मंडळाचे E-Goverance Consultant मे. KPMG या कडून तयार करून घेण्यात यावे व योजनेच्या अटी शर्ती, अंदाजित खर्च व त्यानुसार तयार केलेले RFP Document शासन मान्यतेस सादर करावे. शासन मान्यतेनुसार पूढील कार्यवाही करावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |
| ६. | **मंडळाच्या विविधि कल्याणकारी योजनांबाबत प्रसार/ प्रसिद्धी करण्यासाठी** | याबाबत मंडळ सचिव असे सुचित केले की, मंडळाच्या दि.२८.०२.२०१७ रोजीच्या बैठकीत मा. कामगार आयुक्त यांनी असे स्पष्ट केले की, इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या कलम ६० अंतर्गत केंद्र शासनाने त्यांच्या दि. ०७.०६.२०१६ रोजीच्या पत्रान्वये मा. सर्वोच्च न्यायालयाने जाहीराती न करण्यासंदर्भात जारी केलेले आदेश मंडळास पाठविले आहेत. मा. सर्वोच्च |



अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई**

योजना

महाराष्ट्र शासन

इबांका -२०१७/०६/प्र.क्र.२७७ /काम ७,
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
दिनांक:- १२ मार्च,२०१८

प्रति,

कामगार आयुक्त,
"कामगार भवन",
बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,
बांद्रा (पूर्व), मुंबई -५१.

**विषय:-** बांधकाम कामगारांसाठी मध्यान्ह भोजन योजना राबिविणेबाबत.

**संदर्भ:-** १.आपले दि.२२.६.२०१७ रोजीचे पत्र.
२.शासनपत्र दिनांक २९.७.२०१७ आणि १६.८.२०१७
३.सचिव ,महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ यांचे दि.१४.२.२०१८ रोजीचे पत्र

महोदय,

उपरोक्त संदर्भिय प्रस्तावास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, बांधकाम कामगारांसाठी मध्यान्ह भोजन योजना राबिविणेच्या योजनेस शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

आपला,

(श. मा. साठे)
उप सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत:
१.सचिव, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ,मुंबई,यांस माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव,
२.निवडनस्ती ,कामगार-७

C:\Users\prashant rathod\Desktop\2017\TIPANI\CR-277 मध्यान भोजन योजना.docx

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोदींत पात्र बांधकाम कामगारांना अत्यावश्यक वस्तू संच (Essential Kit) पुरविण्याच्या योजनेस शासन मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
**शासन निर्णय क्रमांक: इबांका-२०१७/प्र.क्र.४८३/काम-७**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: २२ नोव्हेंबर, २०१७.

**वाचा-**

(१) इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम,१९९६.

(२) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती)नियम,२००७.

(३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभागशासन निर्णय भांखस-२०१४/प्र.क्र.८२ भाग III/ उद्योग-४, दिनांक १.१२.२०१६.

(४) नियोजन विभाग शासन निर्णय डिसीटी २३१६/प्र.क्र.१३३/का.१४१७, दिनांक ५.१२.२०१६, आणि ३.३.२०१७.

(५) कामगार आयुक्त यांचे पत्र क्र. मइवइबांकाकमं/Essential Kit/२०१७/२२६ दिनांक ०३. ११.२०१७.

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदीत बांधकाम कामगारांची संख्या व महाराष्ट्रातील बांधकाम क्षेत्रात प्रत्यक्ष काम करणा-या बांधकाम कामगारांची संख्या यामध्ये तफावत आहे.सदर तफावत कमी करण्यासाठी मंडळाकडील नोंदीत बांधकाम कामगारांसाठी विविध कल्याणकारी योजना जाहीर करुन, बांधकाम कामगारांना नोंदणी करण्यासाठी आकर्षित करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे, तरीपण राज्यातील अजूनही मोठ्या प्रमाणात बांधकाम संस्थाकडे कार्यरत बांधकाम कामगारांची मंडळाकडे नोंदणी होण्याचे प्रमाण समाधानकारक नाही. तसेच, अशा बहुतेक बांधकाम संस्थांमध्ये कार्यरत बांधकाम कामगार हे ग्रामीण भागातून रोजगार मिळविण्यासाठी शहराकडे येतात. अशा बांधकाम कामगारांजवळ दैंनंदिन वापराच्या अत्यावश्यक वस्तुंची कमतरता असते.सबब अशा अत्यावश्यक वस्तू संच (Essential Kit) पुरविणे या योजनेच्या माध्यमातून दैनंदिन वापराच्या वस्तुंची कमतरता भरुन काढण्यास तसेच बांधकाम कामगारांना मंडळाकडे नोंदणी करण्यासाठी आकर्षित करण्यासाठी अत्यावश्यक वस्तू संच (Essential Kit) पुरविणे ही योजना महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने दिनांक २२.९.२०१७ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र. ०५ अन्वये सुरु करण्याचे योजिले आहे आणि त्यास शासन मान्यता देण्याची संदर्भ क्र.५ येथील दिनांक ३ नोव्हेंबर, २०१७ रोजीच्या पत्रान्वये कामगार आयुक्त यांनी

शिफारस केली आहे. या पार्श्वभूमीवर सदर योजना कार्यान्वित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदीत पात्र बांधकाम कामगारांना अत्यावश्यक वस्तू संच (Essential Kit) पुरविणे या योजनेस खालील अटींच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे.

**योजनेच्या अटी व शर्ती**

१. मंडळाकडे नोंदणी जिवीत असलेले पात्र बांधकाम कामगार या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र राहतील. या पात्रताधारक कामगारांनी विहित नमुन्यातील मागणी अर्ज प्राधिकृत सरकारी कामगार अधिकारी यांच्याकडे भरुन दिल्यानंतर अत्यावश्यक वस्तू संच (Essential Kit) पुरविण्यात यावे.

२. पात्र बांधकाम कामगारांना पुरवावयाच्या अत्यावश्यक वस्तू संच (Essential Kit) मध्ये खालील वस्तूंचा समावेश असावा.

(१) प्लॅस्टिक चटई ( Plastic Mat ) (२) मच्छरदानी (Mosquito Net ) (३) सोलर टॉर्च ( Solar Torch ) (४) जेवणाचा डबा ( Tiffin Box ) (५) पाण्याची बाटली ( Water Bottle ) (६) खांद्यावरील बॅग ( Sack ) (Outer bag ) (७) पत्र्याची पेटी ( Galvanise Trunk )

३. पात्र बांधकाम कामगारांना अत्यावश्यक वस्तू संच (Essential Kit) पुरविण्या बाबत ई-निविदा पध्दतीचा अवलंब करुन, नोंदणीकृत, नामांकीत व अनुभवी संस्थेची निवड करावी.तसेच या संदर्भात उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय दिनांक १.१२.२०१६ मधील तरतूदींचे काटेकोर पालन करण्यात यावे. तसेच निविदा स्विकृती नंतर प्रस्ताव शासन मान्यतेस्तव सादर करावा.

४. अत्यावश्यक वस्तू संच (Essential Kit) मधील पुरविण्यात येणाऱ्या वस्तूंचे दर, पुरवठा, वाहतूक, वितरण व सर्व करांसह निश्चित करण्यात यावे.

५. अत्यावश्यक वस्तू संच (Essential Kit) च्या निविदा स्विकृत करण्यापूर्वी अत्यावश्यक वस्तू संच (Essential Kit) मधील वस्तूंच्या दर्जाची शासन मान्य प्रयोग शाळेकडून तपासणी व खात्री करून घ्यावी व तसे प्रमाणपत्र तद्नंतरच अशा वस्तूंची पात्र लाभार्थ्यास वितरणाची कार्यवाही करावी.

६. संबंधित सहाय्यक कामगार आयुक्त यांनी रितसर प्रमाणित केलेल्या पात्र नोंदीत बांधकाम कामगारांच्या यादीनुसारच विहीत मुदतीचे आत अत्यावश्यक वस्तू संच (Essential Kit) चा पुरवठा करण्यात यावा.

७. पात्र बांधकाम कामगारांना अत्यावश्यक वस्तू संच (Essential Kit) प्राप्त झाल्याचे सरकारी कामगार अधिकारी यांनी खात्री करावी व पुरवठा केल्याची पोचपावती उपायुक्त कामगार यांना सादर करावी. उपायुक्त कामगार यांनी अशा सर्व लाभार्थ्यांचे साहीत्य प्राप्त झाल्याबाबतच्या पोच पावत्या पाहून खात्री करुन त्याबाबतचा अहवाल देयकाची अदायगी करण्याच्या प्रमाणपत्रासह महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ,मुंबई यांना सादर करावा व महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने सदरहू अहवाल व उप आयुक्त कामगार यांचे देयक अदायगी करण्याचे प्रमाणपत्र पाहून,खात्री करुन पुरवठादाराचे देयके नियमानुसार प्रदान करावे.

८. अत्यावश्यक वस्तू संच (Essential Kit) पुर[illegible] जमा उपकर निधीतून भागविण्यात यावा.

९. सदर योजनेच्या परिणामकारक अंम[illegible] आयुक्त यांनी पहावे.

१०. पात्र बांधकाम कामगारांना अत्यावश्यक वस्तू संच (Essential Kit) पुरवठा करण्याची कार्यवाही महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करावी. कालावधी वाढविण्यास मान्यता देण्याचे अधिकार महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळास राहतील.

सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया [illegible] संकेतांक २०१७११२२१५४२३९४३१० असा आहे. तसेच सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीन [illegible] येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Shashank M. Sathe

Digitally signed by Shashank M. Sathe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agricul and ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6b4e[illegible]43f462199739802954 7f71977c2d89 91d622c519f[illegible]93078c30b, cn=Shashank M. Sathe
Date: 2017.11.[illegible]3 12:37:43 +05'30'

(श. मा. साठे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. सर्व सन्मा.विधानसभा/विधानपरिषद स[illegible]
२. मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव.
३. मा. राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव.
४. मा. अध्यक्ष, इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.
५. मा.विरोधी पक्ष नेता (विधानपरिषद /विधानसभा) यांचे खाजगी सचिव.
६. सर्व अ.मु.स /प्र.स./सचिव मंत्रालयीन विभाग

७. प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहाय्यक.

८. समितीचे इतर सर्व सदस्य (व्दारा कामगार आयुक्त)

९. कामगार आयुक्त, मुंबई / अतिरिक्त कामगार आयुक्त, मुंबई/पुणे/नागपूर.

१०. उप कामगार आयुक्त, मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, औरंगाबाद.

११. सचिव, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

१२. महालेखापाल-१ महाराष्ट्र (लेखापरिक्षा व लेखा अनुज्ञेयता), मुंबई.

१३. महालेखापाल-२ महाराष्ट्र (लेखापरिक्षा व लेखा अनुज्ञेयता), नागपूर.

१४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

१५. सहसचिव (कामगार) यांचे स्वीय सहायक, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई ३२

१६. निवडनस्ती (कामगार-७).

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोदींत पात्र बांधकाम कामगारांना सुरक्षा संच (Safety Kit ) पुरविण्याच्या योजनेस शासन मान्यता देण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

## उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

**शासन निर्णय क्रमांक: इबांका-२०१७/प्र.क्र.४८२/काम-७**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: २३ नोव्हेंबर, २०१७.

वाचा-

(१) इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम,१९९६.

(२) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती)नियम,२००७.

(३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय भांखस-२०१४/प्र.क्र.८२ भाग III/उद्योग-४ दिनांक १.१२.२०१६.

(४) नियोजन विभाग शासन निर्णय डिसीटी २३१६/प्र.क्र.१३३/का.१४१७, दिनांक- ५ डिसेंबर,२०१६ आणि दिनांक- ३ मार्च,२०१७.

(५) कामगार आयुक्त यांचे पत्र क्र. मइवइबांकाकमं/Safety Kit/२०१७/२२६ दिनांक-३.११.२०१७

प्रस्तावना:-

इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती)केंद्रीय नियम, १९९८ तसेच महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) नियम, २००७ अंतर्गत बांधकाम कामगारांच्या सुरक्षे विषयी विविध उपाय,जबाबदा-या,कर्तव्ये नमूद केलेली आहेत. तथापि, आजपर्यंतचा अनुभव पाहता सदर नियमांचे मोठ्या प्रमाणात पालन होत असल्याचे दिसत नाही. जर सुरक्षेचे नियम पाळले असते तर मागील दुर्घटनेत अनेकांचे गेलेले प्राण वाचवण्यात यश आले असते. भविष्यात अशा दुर्घटनेत बांधकाम कामगारांचे प्राण वाचावे यासाठी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाने दिनांक २२ सप्टेंबर,२०१७ रोजीच्या बैठकीत मंडळातील नोंदीत पात्र बांधकाम कामगारांना सुरक्षा संच (Safety Kit) पुरवण्यासंदर्भात ठराव पारीत केला आहे. बांधकाम कामगारांची नोंदणी वाढविणे तसेच कामगारांची जिवीत हानी होऊ नये हा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे. तसेच, या योजनेद्वारे होणा-या वाटपामुळे बांधकाम कामगारांमध्ये नोंदणीचे महत्व समजेल व होणा-या जनजागृतीमुळे ते मंडळाकडे नोंदणी करण्यास आकर्षित होतील. तसेच, बांधकाम कामगारांचे संभाव्य अपघात/दुखापत इत्यादी पासून संरक्षण होईल व अशा प्रकारच्या दुर्घटना टाळता येतील. या पार्श्वभूमीवर सदर योजना कार्यान्वित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदीत पात्र बांधकाम कामगारांना सुरक्षा संच(Safety Kit) पुरविणे या योजनेस खालील नमूद अटींच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे.

**योजनेच्या अटी व शर्ती**

१. मंडळाकडे नोंदणीकृत जिवीत असलेले पात्र बांधकाम कामगार या योजनेचा लाभ घेण्यासाठी पत्र राहतील. या पात्रताधारक कामगारांनी विहित नमुन्यातील मागणी अर्ज प्राधिकृत सरकारी कामगार अधिकारी यांच्याकडे भरुन दिल्यानंतर सुरक्षा संच (Safety Kit) ) पुरविण्यात यावे.

२. पात्र बांधकाम कामगारांना पुरवावयाच्या सुरक्षा संच (Safety Kit) मध्ये खालील वस्तूंचा समावेश असावा.

1. Protective Shoes (Safety shoes) 2. Dust Mask (Respiratory protection) 3. Hearing Protection (Earplug) 4.Safety helmet 5. Safety Hand gloves 6. Safety Harness 7. Reflective Jacket

३. पात्र बांधकाम कामगारांना सुरक्षा संच(Safety Kit) पुरविण्या बाबत ई-निविदा पध्दतीचा अवलंब करुन, नोंदणीकृत, नामांकीत व अनुभवी संस्थेची निवड करावी.तसेच या संदर्भात उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय दिनांक १.१२.२०१६ मधील तरतूदींचे काटेकोर पालन करण्यात यावे. तसेच निविदा स्विकृती नंतर प्रस्ताव शासन मान्यतेस्तव सादर करावा.

४. सुरक्षा संच (Safety Kit)) च्या निविदा स्विकृत करण्यापूर्वी सुरक्षा संच (Safety Kit) मधील वस्तूंच्या दर्जाची शासन मान्य शासन प्राधिकृत प्रयोग शाळेकडून तपासणी व खात्री करून घ्यावी व तसे प्रमाणपत्र तद्नंतरच अशा वस्तूंची पात्र लाभार्थ्यास वितरणाची कार्यवाही करावी.

५. सुरक्षा संच (Safety Kit) मधील पुरविण्यात येणाऱ्या वस्तूंचे दर, पुरवठा, वाहतूक,वितरण व सर्व करांसह निश्चित करण्यात यावे.

६. संबंधित सहाय्यक कामगार आयुक्त यांनी रितसर प्रमाणित केलेल्या जिवीत पात्र नोंदीत बांधकाम कामगारांच्या यादीनुसारच विहीत मुदतीचे आत सुरक्षा संच (Safety Kit) चा पुरवठा करण्यात यावा.

७. पात्र बांधकाम कामगारांना सुरक्षा संच (Safety Kit) प्राप्त झाल्याचे सरकारी कामगार अधिकारी यांनी खात्री करावी व पुरवठा केल्याची पोचपावती उपायुक्त कामगार यांना सादर करावी.उपायुक्त कामगार यांनी अशा सर्व लाभार्थ्यांचे साहीत्य प्राप्त झाल्याबाबतच्या पोच पावत्या पाहून खात्री करुन त्याबाबतचा अहवाल देयकाची अदायगी करण्याच्या प्रमाणपत्रासह महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ,मुंबई यांना सादर करावा व महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने सदरहू अहवाल व उप आयुक्त कामगार यांचे देयक अदायगी करण्याचे प्रमाणपत्र पाहून,खात्री करुन पुरवठादाराचे देयक नियमानुसार प्रदान करावे.

८. सुरक्षा संच (Safety Kit) पुरवठयाचा खर्च मंडळाकडील जमा उपकर निधीतून भागविण्यात यावा.

९. सदर योजनेच्या परिणामकारक अंमलबजावणी व देखरेखीचे काम कामगार आयुक्त यांनी पहावे.

**१०.** पात्र बांधकाम कामगारांना सुरक्षा संच (Safety Kit) पुरवठा करण्याची कार्यवाही महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करावी. कालावधी वाढविण्यास मान्यता देण्याचे अधिकार महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळास राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७११२३११०६५८३५१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Shashank M. Sathe

Digitally signed by Shashank M. Sathe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture and ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=6b4e6443f4621997398029547f71977c2d89e32e391d622c519f39893078c30b, cn=Shashank M. Sathe
Date: 2017.11.23 12:46:44 +05'30'

**( श. मा. साठे)**

उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. सर्व सन्मा.विधानसभा/विधानपरिषद सदस्य
२. मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव.
३. मा. राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव.
४. मा. अध्यक्ष, इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.
५. मा.विरोधी पक्ष नेता (विधानपरिषद /विधानसभा) यांचे खाजगी सचिव.
६. सर्व अ.मु.स /प्र.स./सचिव मंत्रालयीन विभाग
७. प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहाय्यक.
८. समितीचे इतर सर्व सदस्य (व्दारा कामगार आयुक्त)
९. कामगार आयुक्त, मुंबई / अतिरिक्त कामगार आयुक्त, मुंबई/पुणे/नागपूर.
१०. उप कामगार आयुक्त, मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, औरंगाबाद.
११. सचिव, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई
१२. महालेखापाल-१ महाराष्ट्र (लेखापरिक्षा व लेखा अनुज्ञेयता), मुंबई.
१३. महालेखापाल-२ महाराष्ट्र (लेखापरिक्षा व लेखा अनुज्ञेयता), नागपूर.
१४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१५. उप सचिव (कामगार) यांचे स्वीय सहायक, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई
१६. निवडनस्ती (कामगार-७).

९. सदर योजनेच्या परिणामकारक अंमलबजावणी व देखरेखीचे काम कामगार आयुक्त यांनी पहावे.

१०. पात्र बांधकाम कामगारांना सुरक्षा संच (Safety Kit) पुरवठा करण्याची कार्यवाही महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करावी. कालावधी वाढविण्यास मान्यता देण्याचे अधिकार महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळास राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७११२३११०६५८३५१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरी साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Shashank M. Sathe

Digitally signed by Shashank M. Sathe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture and ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6b4e6443f4621997398029547f71977c2d89e32e391d622c519f39893078c30b, cn=Shashank M. Sathe
Date: 2017.11.23 12:46:44 +05'30'

( श. मा. साठे)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. सर्व सन्मा.विधानसभा/विधानपरिषद सदस्य
२. मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव.
३. मा. राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव.
४. मा. अध्यक्ष, इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.
५. मा.विरोधी पक्ष नेता (विधानपरिषद /विधानसभा) यांचे खाजगी सचिव.
६. सर्व अ.मु.स /प्र.स./सचिव मंत्रालयीन विभाग
७. प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहाय्यक.
८. समितीचे इतर सर्व सदस्य (व्दारा कामगार आयुक्त)
९. कामगार आयुक्त, मुंबई / अतिरिक्त कामगार आयुक्त, मुंबई/पुणे/नागपूर.
१०. उप कामगार आयुक्त, मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, औरंगाबाद.
११. सचिव, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई
१२. महालेखापाल-१ महाराष्ट्र (लेखापरिक्षा व लेखा अनुज्ञेयता), मुंबई.
१३. महालेखापाल-२ महाराष्ट्र (लेखापरिक्षा व लेखा अनुज्ञेयता), नागपूर.
१४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१५. उप सचिव (कामगार) यांचे स्वीय सहायक, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई
१६. निवडनस्ती (कामगार-७).

कामगार
महाराष्ट्र राज्य, मुंबई.
(रचना व कार्यपद्धती-शाखा)
२४

26 JUL 2017

आवक क्रमांक ......१२५०......

कार्यासन क्रमांक ....३.७....

# महाराष्ट्र शासन

इमाका-२०१६/०६/प्र.क्र.४१३/काम ७.
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक:- २४ जुलै, २०१७

313
04/08/17

प्रति,

कामगार आयुक्त,
"कामगार भवन",
वांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,
वांद्रा (पूर्व), मुंबई -५१.

**विषय:-** महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदीत बांधकाम कामगाराचा नैसर्गिक मृत्यु झाल्यास त्यास रु. २ लाख आर्थिक सहाय्य देणेबाबत.

**संदर्भ:-** आपले पत्र क्र.मइवइबांकमं/मंडळ ठराव/२०१७/३१३ दि.९.२.२०१७

महोदय,

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील जे बांधकाम कामगार प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजनेचा लाभ देण्यासाठी वयाच्या निकषानुसार (वय वर्ष ५१ ते ६०) पात्र होणार नाही अशा सर्व नोंदणीकृत केवळ पात्र बांधकाम कामगारांना, नैसर्गिक मृत्यु झाल्यास त्यास रितसर रु.दोन लाख आर्थिक सहाय्य देण्याच्या योजनेचा लाभ देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

त्यानुसार आवश्यक ती उचित कार्यवाही तातडीने करण्यात यावी, ही विनंती.

आपला,

(द. य. डांगे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत: माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित.

१) सचिव, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.

२) निवडनस्ती कामगार-७

अटल बांधकाम कामगार आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत नोंदीत बांधकाम कामगारांना अर्थसहाय्य देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**उद्योग, उर्जा व कामगार विभाग**

**शासन निर्णय क्र. :-इबांका २०१८/प्र.क्र.२०८/कामगार ७**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक : १४ जानेवारी, २०१९

<u>वाचा</u>: १. शासन निर्णय, गृह निर्माण विभागा क्र. प्रआयो/२०१७/प्र.क्र.१०८/गृवनधो-२ दिनांक ०३ फेब्रुवारी, २०१८

२. शासन निर्णय ,उद्योग,उर्जा व कामगार विभाग क्रमांक: इबांका २०१७/ प्र.क्र. ३६० / कामगार ७ दिनांक २९ ऑक्टोबर, २०१८.

**<u>प्रस्तावना</u> :-**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे नोंदीत (सक्रिय) बांधकाम कामगारांपैकी शहरी भागातील बांधकाम कामगारांकरीता प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत महाराष्ट्र बांधकाम कामगार आवास योजना संदर्भाधीन दिनांक ०३ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये लागू करण्यात आली आहे आणि संदर्भाधीन दिनांक २९ ऑक्टोबर, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये लाभार्थी निवडीबाबतच्या अटी शर्ती व योजना अंमलबजावणीची कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक ३० ऑक्टोबर, २०१८ रोजीच्या बैठकीत ग्रामीण भागातील नोंदीत (सक्रिय) बांधकाम कामगारांना ग्रामीण भागात स्वत:च्या जागेवर नवीन घर बांधण्यासाठी किंवा अस्तित्वात असलेल्या कच्च्या घराचे पक्क्या घरात रूपांतर करण्यासाठी मंडळामार्फत योजना राबविण्याबाबत आणि सदर योजनेत घरकुल बांधण्यासाठी बांधकाम कामगाराला अर्थसहाय्य देण्याच ठराव पारित करण्यात आला. त्यास अनुलक्षून ग्रामीण भागातील नोंदीत (सक्रिय) बांधकाम कामगारांना अटल बांधकाम कामगार (ग्रामीण) आवास योजना राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u> :-**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे नोंदीत (सक्रिय) बांधक कामगारांपैकी ग्रामीण भागातील नोंदीत (सक्रिय) बांधकाम कामगारांच्या घराच्या अटल बांधकाम कामगार आव योजनेस ( ग्रामीण ) मंजुरी आणि अर्थसहाय्य देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. तसेच ग्राम विव विभागाच्या अधिपत्याखालील संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष, ग्रामीण गृह निर्माण कार्यालय, बेलापुर, नवी मुं या यंत्रणेमार्फत राबविण्यास शासन मंजुरी देण्यात येत आहे.

अटल बांधकाम कामगार आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत नोंदीत बांधकाम कामगारांना अर्थसहाय्य देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, उर्जा व कामगार विभाग**
**शासन निर्णय क्र. :-इबांका २०१८/प्र.क्र.२०८/कामगार ७**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १४ जानेवारी, २०१९

वाचा: १. शासन निर्णय, गृह निर्माण विभागा क्र. प्रआयो/२०१७/प्र.क्र.१०८/गृवनधो-२ दिनांक ०३ फेब्रुवारी, २०१८

२. शासन निर्णय ,उद्योग,उर्जा व कामगार विभाग क्रमांक: इबांका २०१७/ प्र.क्र. ३६० / कामगार ७ दिनांक २९ ऑक्टोबर, २०१८.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे नोंदीत (सक्रिय) बांधकाम कामगारांपैकी शहरी भागातील बांधकाम कामगारांकरीता प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत महाराष्ट्र बांधकाम कामगार आवास योजना संदर्भाधीन दिनांक ०३ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये लागू करण्यात आली आहे आणि संदर्भाधीन दिनांक २९ ऑक्टोबर, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये लाभार्थी निवडीबाबतच्या अटी शर्ती व योजना अंमलबजावणीची कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक ३० ऑक्टोबर, २०१८ रोजीच्या बैठकीत ग्रामीण भागातील नोंदीत (सक्रिय) बांधकाम कामगारांना ग्रामीण भागात स्वत:च्या जागेवर नवीन घर बांधण्यासाठी किंवा अस्तित्वात असलेल्या कच्च्या घराचे पक्क्या घरात रूपांतर करण्यासाठी मंडळामार्फत योजना राबविण्याबाबत आणि सदर योजनेत घरकुल बांधण्यासाठी बांधकाम कामगाराला अर्थसहाय्य देण्याचा ठराव पारित करण्यात आला. त्यास अनुलक्षून ग्रामीण भागातील नोंदीत (सक्रिय) बांधकाम कामगारांना अटल बांधकाम कामगार (ग्रामीण) आवास योजना राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे नोंदीत (सक्रिय) बांधकाम कामगारांपैकी ग्रामीण भागातील नोंदीत (सक्रिय) बांधकाम कामगारांच्या घराच्या अटल बांधकाम कामगार आवास योजनेस ( ग्रामीण ) मंजुरी आणि अर्थसहाय्य देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. तसेच ग्राम विकास विभागाच्या अधिपत्याखालील संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष, ग्रामीण गृह निर्माण कार्यालय, बेलापुर, नवी मुंबई या यंत्रणेमार्फत राबविण्यास शासन मंजुरी देण्यात येत आहे.

**योजनेचे स्वरूप :-**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे नोंदीत (सक्रिय) बांधकाम कामगारापैकी ग्रामीण भागातील नोंदीत (सक्रिय) बांधकाम कामगारांसाठी मंजुर अटल बांधकाम कामगार आवास योजनेचे (ग्रामीण) स्वरुप खालील प्रमाणे आहे.

अ. मंडळाकडील नोंदीत (सक्रिय) बांधकाम कामगारांना ग्रामीण भागात स्वतःच्या /पती /पत्नीच्या नावावरील जागेवर नवीन घर बांधण्यासाठी अथवा अस्तित्वात असलेल्या कच्च्या घराचे पक्क्या घरात रूपांतर करण्यासाठी रू. १.५० लक्ष अनुदान महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडून उपलब्ध करुन देण्यात येईल.

आ. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या धर्तीवर( MGNREGA) अनुज्ञेय असणारे रु. १८,०००/- तसेच स्वच्छ भारत अभियानद्वारे शौचालय बांधण्यासाठी अनुज्ञेय असलेले रू.१२,०००/- असे एकूण रु. ३००००/- अनुदान रु. १.५० लक्ष मध्ये समाविष्ट असल्याने संबधित योजनांचा दुबार लाभ देय राहणार नाही.

**घराचे क्षेत्रफळ :-**

अटल बांधकाम कामगार आवास योजना ( ग्रामीण ) अंतर्गत पात्र ठरलेल्या बांधकाम कामगारांनी किमान २६९ चौ. फुट इतके चटई क्षेत्र असलेले घर बांधकाम करणे आवश्यक आहे. त्याकरिता रु. १.५० लक्ष एवढे अनुदान देय राहील. मात्र, लाभार्थ्यास त्यापेक्षा जास्त क्षेत्राचे बांधकाम स्वखर्चाने करण्यास मुभा राहील.

**लाभार्थी पात्रता :-**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे नोंदीत (सक्रिय) बांधकाम कामगारांपैकी ग्रामीण भागातील नोंदीत (सक्रिय) बांधकाम कामगारांसाठी अटल बांधकाम कामगार आवास योजनेचा (ग्रामीण ) लाभ प्रति कुटुंबासाठी असून त्याचा लाभ घेण्यासाठीची पात्रता खालील प्रमाणे आहे:-

अ. या योजनेचा लाभ घेण्यासाठी बांधकाम कामगार हा नोंदणीकृत (सक्रिय) असावा तथापि अर्ज करतांना तो महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे सलग एक वर्षापेक्षा अधिक, बांधकाम कामगार म्हणून नोंदणीकृत असावा.

आ. नोंदीत (सक्रिय) बांधकाम कामगारांचे स्वतःच्या /पती / पत्नीच्या नावावर महाराष्ट्र राज्यात पक्के (सिमेंट, वाळूने बांधलेले) घर नसावे. तशा आशयाचे स्वयंघोषणापत्र/ शपथपत्र सादर करणे आवश्यक राहील.

इ. नोंदीत बांधकाम कामगारास पक्के घर बांधण्यासाठी स्वतःच्या / पती /पत्नीच्या नावे मालकीची जागा असावी अथवा मालकीचे कच्चे घर असलेल्या त्या ठिकाणी घर बांधता येईल.

ई. बांधकाम कामगारानी शासनाच्या इतर कोणत्याही गृहनिर्माण योजनांचा लाभ घेतलेला नसावा. मंडळाकडील देय गृहकर्जावरील व्याज परतावा करीता अनुज्ञेय अर्थसहाय्याचा/ अनुदानाचा लाभ घेतलेला नसावा. याबाबत त्यांनी स्वयंघोषणापत्र/ शपथपत्र सादर करणे आवश्यक राहील.

उ. अटल बांधकाम कामगार आवास योजनेचा (ग्रामीण) लाभ प्रति कुटुंबासाठी आहे.

ऊ. एकदा लाभ घेतल्यानंतर बांधकाम कामगार पुनश्चः या योजनेच्या लाभास पात्र राहणार नाही.

ए. नोंदणीकृत (सक्रिय) बांधकाम कामगार हा प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीणच्या कायमस्वरुपी प्रतिक्षा यादीमध्ये (PWL) समाविष्ट नसावा.

**आवश्यक कागदपत्रे :-**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे नोंदीत (सक्रिय) बांधकाम कामगारांपैकी ग्रामीण भागातील नोंदीत (सक्रिय) बांधकाम कामगारांसाठी अटल बांधकाम कामगार आवास योजनेचा ( (ग्रामीण ) लाभ घेण्यासाठी विहीत अर्जासह खालील कागदपत्र देणे आवश्यक आहे:-

अ) सक्षम प्राधिकाऱ्याने ,नोंदीत बांधकाम कामगार म्हणून दिलेल्या ओळखपत्राची प्रत

आ) आधारकार्ड – स्वेच्छेने दिलेल्या आधारकार्डाची प्रत.

इ) ७/१२ चा उतारा/ मालमत्ता नोंदणी प्रमाणपत्र/ ग्रामपंचायतीमधील मालमत्ता नोंदवहीतील उतारा

ई) लाभधारकाचे स्वतःच्या नावे कार्यरत असलेल्या बचत खात्याच्या पासबुकाची छायांकीत प्रत

**घराची रचना :-**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे नोंदीत (सक्रिय) बांधकाम कामगारापैकी ग्रामीण भागातील नोंदीत (सक्रिय) बांधकाम कामगारांसाठी अटल बांधकाम कामगार आवास योजनेतील (ग्रामीण ) घराची रचना खालील प्रमाणे आहे.

अ) संपूर्ण बांधकाम विटा, वाळू व सिमेंटचे असणे आवश्यक आहे. घरकुलामध्ये एक स्वयंपाकघर व बैठक हॉल यांचा समावेश असावा. शौचालय व स्नानघर बांधणे अनिवार्य राहिल.

आ) जोत्यापासून घराची उंची कमीत कमी १० फूट असावी.

इ) छतासाठी स्थानिक गरजेनुसार मजबूत लोखंडी किंवा सिमेंट पत्रे अथवा कौलांचा वापर करण्यास मुभा राहील.

ई) घराच्या दर्शनीभागावर मंडळाचे बोधचिन्ह ( लोगो ) लावणे आवश्यक आहे.

**जिल्हास्तरिय लाभार्थी निवड समिती.**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे नोंदीत (सक्रिय) बांधकाम कामगारापैकी ग्रामीण भागातील नोंदीत (सक्रिय) बांधकाम कामगारांसाठीच्या अटल बांधकाम कामगार आवास योजना (ग्रामीण ) अंतर्गत केलेल्या अर्जाची छाननी करण्यासाठी अपर कामगार आयुक्त /कामगार उपायुक्त यांचे

अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय लाभार्थ्यी निवड समिती गठीत करण्यात येत असून समितीची रचना व कार्ये खालील प्रमाणे आहे:-

| क्र. | पदनाम | पद |
|---|---|---|
| १ | अपर कामगार आयुक्त /कामगार उपायुक्त | अध्यक्ष |
| २ | प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा | सदस्य |
| ३ | जिल्हा कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ | सदस्य |
| ४ | उप जिल्हा कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ | सदस्य सचिव |

**अर्ज करण्याची, त्याची छाननी करण्याची आणि अर्थसहाय्य देण्याची कार्यपध्दती :-**

अ) नोंदणीकृत (सक्रिय) बांधकाम कामगारानी प्रथम जिल्हा कार्यकारी अधिकारी / उप जिल्हा कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांचेकडे मंडळानी विहीत केलेल्या नमुन्यात अर्ज करावा.

आ) बांधकाम कामगाराकडून प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करुन अर्जदाराची पात्रता तसेच अर्जासोबत सादर केलेल्या कागदपत्राची जिल्हास्तरीय लाभार्थी निवड समिती तपासणी करेल व त्यात पात्र झालेल्या बांधकाम कामगाराची अटल बांधकाम कामगार आवास योजनेमध्ये (ग्रामीण ) लाभार्थी म्हणून निवड करेल.

इ) उप जिल्हा कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ तथा सदस्य सचिव सनियंत्रण समिती हे सनियंत्रण समितीच्या छाननीत पात्र झालेल्या आणि मंजुरी दिलेल्या बांधकाम कामगारांची तालुका निहाय यादी तयार करतील. सदर यादी सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांना सादर करतील आणि त्याची प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा अध्यक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांना उपलब्ध करुन देतील.

ई) सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ हे ग्राम विकास विभाग यांच्या अधिपत्याखालील संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष, ग्रामीण गृह निर्माण विभाग, नवी मुंबई याचेकडे पात्र बांधकाम कामगार यांचे घरकुल बांधकामा पोटी निधी वर्ग करतील.

उ) घराच्या बांधकामाच्या प्रगतीनुसार संचालक, राज्य व्यवस्थापन कक्षाकडून टप्प्या टप्प्याने ठरवुन दिलेले बांधकाम पुर्ण झाल्याची खात्री झाल्यानंतर सार्वजनिक आर्थिक व्यवस्थापन प्रणाली (PFMS) प्रणालीद्वारे बांधकाम कामगारांच्या खात्यावर अनुदान वर्ग करण्यात येईल.

ऊ) योजनेंतर्गत उपलब्ध करुन दिलेल्या अनुदानातून ४% एवढी रक्कम राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयास प्रशासकीय खर्चासाठी देय राहील.

**जिल्हास्तरिय सनियंत्रण समिती. :-**

या योजनेच्या संनियंत्रणासाठी जिल्हास्तरावर खालीलप्रमाणे सनियंत्रण समिती गठीत करण्यात येत आहे.

| क्र. | पदनाम | पद |
|---|---|---|
| १ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | अध्यक्ष |
| २ | प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा | सदस्य |
| ३ | कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद | सदस्य |
| ४ | उपकार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ | सदस्य सचिव |

**योजनेची प्रसिध्दी/ अंमलबजावणी खर्च :-**

ग्रामीण भागातील नोंदीत (सक्रिय) बांधकाम कामगारांना मंजुर केलेल्या अटल बांधकाम कामगार आवास योजनेची (ग्रामीण) मंडळामार्फत राज्यस्तरीय, प्रादेशिक व स्थानिक वृत्तपत्रांतून व स्थानिक माध्यमांद्वारे बांधकाम कामगारांनी लाभ घेण्याच्या उद्देशानी व्यापक प्रसिध्दी करण्यात येईल. याकरीता येणारा खर्च हा या योजनेवरील खर्चात दर्शविण्यात येईल.

सदरचा शासन निर्णय ग्राम विकास विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. २० /२०१८ दिनांक ०१ डिसेबर, २०१८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक २०१९०११४१४११०१४८१० असा आहे. तसेच सदरचा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajesh Kumar

**( राजेश कुमार )**
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन.

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव.
३. मा.विरोधी पक्ष नेता (विधानपरिषद /विधानसभा)
४. सर्व सन्माननीय विधानसभा/विधानपरिषद सदस्य
५. मा. मंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव.

६. मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव.
७. मा. राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव.
८. मा. अध्यक्ष, इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई
९. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१०. महालेखापाल-१ महाराष्ट्र (लेखापरिक्षा व लेखा अनुज्ञेयता), मुंबई.
११. महालेखापाल-२ महाराष्ट्र (लेखापरिक्षा व लेखा अनुज्ञेयता), नागपूर
१२. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक.
१३. सर्व अ.मु.स /प्र.स./सचिव मंत्रालयीन विभाग.
१४. प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहाय्यक.
१५. प्रधान सचिव (ग्राम विकास) यांचे स्वीय सहाय्यक.
१६. सर्व सह सचिव / उप सचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी, कामगार विभाग
१७. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१८. सर्व अपर कामगार आयुक्त /उपायुक्त कामगार आयुक्त / सहाय्यक कामगार आयुक्त.
१९. उप कामगार आयुक्त, मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, औरंगाबाद.
२०. सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई
२१. निवडनस्ती (कामगार-७).

कलम ४(१)(ख) नुसार

बैठक दि. १८/१/२०१६

पाठविण्याची आवश्यकता नाही, अशी धारणा व्यक्त करून ती धारणा पक्की करण्यासाठी मी पत्राद्वारे विनंती केली आहे, असे ते म्हणाले.

मा. अध्यक्ष यांनी असे सांगितले की, मॉनिटरिंग कमिटीच्या सूचना लक्षात घेता हे तातडीने करणे आवश्यक आहे. मंडळ संविधानिक असल्यामुळे मंडळास RFP डॉक्युमेंटनुसार ई-निविदा काढता येईल. तथापि, या RFP डॉक्युमेंटवर आय.टी विभागाचे अभिप्राय घेऊन त्यांचे परिक्षणानंतर ई-निविदा प्रसिध्द करणे योग्य राहील, असे ते म्हणाले.

RFP डॉक्युमेंटबाबत सविस्तर चर्चा होऊन या RFP डॉक्युमेंटवर आय.टी विभागाचे अभिप्राय घेऊन माहिती व तंत्रज्ञान विभागाने सूचविलेल्या बदलासह ई-निविदा प्रसिध्द करण्यात यावी, असे सर्वानुमते ठरले. तसेच RFP डॉक्युमेंटवर माहिती व तंत्रज्ञान विभागाचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर RFP च्या अटी व शर्तीमध्ये आवश्यक बदल करण्याचे संपूर्ण अधिकार मा. अध्यक्ष व मा. कामगार आयुक्त यांना आहेत, असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ४): इतर राज्यांच्या कल्याणकारी योजनांचा आढावा घेऊन महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या योजनांच्या लाभाच्या रक्कमेबाबत निर्णय घेणे.**

सचिव यांनी याबाबत मागील बैठकीत सुचित केल्यानुसार इतर राज्यांच्या कल्याणकारी योजनांच्या लाभाच्या रकमेबाबत तुलनात्मक तक्ता मंडळासमोर सादर केला. सदर तक्त्याचे अवलोकन करुन आपल्या मंडळाच्या कल्याणकारी योजनांच्या लाभाच्या रकमेत वाढ करण्यात यावी असे मा.अध्याक्षांनी सर्व उपस्थितांना सांगीतले. याबाबत सविस्तर चर्चा होउन महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या कल्याणकारी योजनांच्या लाभाच्या रकमेत खालीलप्रमाणे वाढ करण्याबाबतचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

| अ.क्र. | प्रचलित योजना | सुधारित योजना |
|---|---|---|
| १. | नोंदित लाभार्थी स्त्री बांधकाम कामगारास तसेच नोंदित पुरुष लाभार्थी बांधकाम कामगारांच्या पत्नीस नैसर्गिक प्रसुतीसाठी रु.१०,०००/ (रु. दहा हजार फक्त) व शस्त्रक्रियेद्वारे प्रसुतीसाठी रु. १५,०००/- (रु. पंधरा हजार फक्त) एवढे आर्थिक सहाय्य. | नोंदित लाभार्थी स्त्री बांधकाम कामगारास तसेच नोंदित पुरुष लाभार्थी बांधकाम कामगारांच्या पत्नीस नैसर्गिक प्रसुतीसाठी रु. १५,०००/- (रु. पंधरा **हजार फक्त**) व शस्त्रक्रियेद्वारे प्रसुतीसाठी **रु. २०,०००/- (रु. वीस हजार फक्त**) एवढे आर्थिक सहाय्य. |
| २. | नोंदित लाभार्थी बांधकाम कामगारांच्या प्रति शैक्षणिक | नोंदित लाभार्थी बांधकाम कामगारांच्या प्रति |

| | | |
|---|---|---|
| | वर्षी शाळेतील किमान ७५% किंवा अधिक उपस्थिती असणा-या दोन पाल्यांस इयत्ता १ ली ते ७ वी साठी प्रतिवर्षी रु. १२००/- (रु. एक हजार दोनशे फक्त) किंवा इयत्ता ८ वी ते १० वी साठी प्रतिवर्षी रु. २४००/- (दोन हजार चारशे फक्त) एवढे शैक्षणिक आर्थिक सहाय्य. | शैक्षणिक वर्षी शाळेतील किमान ७५% किंवा अधिक उपस्थिती असणा-या दोन पाल्यांस इयत्ता १ ली ते ७ वी साठी प्रतिवर्षी **रु. २४००/- (रु. दोन हजार चारशे फक्त)** किंवा इयत्ता ८ वी ते १० वी साठी प्रतिवर्षी **रु. ४८००/- (चार हजार आठशे फक्त)** एवढे शैक्षणिक आर्थिक सहाय्य. |
| ३. | नोंदित लाभार्थी कामगारांच्या दोन पाल्यांना इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी मध्ये किमान ५० किंवा अधिक गुण प्राप्त झाल्यास रु. ५०००/- (रु. पाच हजार फक्त) एवढे प्रोत्साहानात्मक शैक्षणिक सहाय्य. | नोंदित लाभार्थी कामगारांच्या दोन पाल्यांना इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी मध्ये किमान ५० किंवा अधिक गुण प्राप्त झाल्यास **रु. १०,०००/- (रु. दहा हजार फक्त)** एवढे प्रोत्साहानात्मक शैक्षणिक सहाय्य. |
| ४. | नोंदित लाभार्थी कामगारांच्या दोन पाल्यांना इयत्ता ११ वी व इयत्ता १२ वी च्या शिक्षणासाठी प्रती शैक्षणिक वर्षी रु. ५०००/- (रु. पाच हजार फक्त) एवढे शैक्षणिक सहाय्य. | नोंदित लाभार्थी कामगारांच्या दोन पाल्यांना इयत्ता ११ वी व इयत्ता १२ वी च्या शिक्षणासाठी प्रती शैक्षणिक वर्षी **रु. १०,०००/- (रु. दहा हजार फक्त)** एवढे शैक्षणिक सहाय्य. |
| ५. | नोंदित लाभार्थी कामगारांच्या दोन पाल्यांना अथवा पुरुष कामगाराच्या पत्नीस पदवीच्या प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या प्रवेश, पुस्तके व शैक्षणिक सामुग्रीसाठी प्रतिवर्षी रु. १५,०००/- एवढे शैक्षणिक सहाय्य. | नोंदित लाभार्थी कामगारांच्या दोन पाल्यांना अथवा पुरुष कामगाराच्या पत्नीस पदवीच्या प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या प्रवेश, पुस्तके व शैक्षणिक सामुग्रीसाठी प्रतिवर्षी **रु. २५,०००/- (रु. पंचवीस हजार फक्त)** एवढे शैक्षणिक सहाय्य. |
| ६. | नोंदित लाभार्थी कामगारांच्या दोन पाल्यांना अथवा पुरुष कामगाराच्या पत्नीस शासनमान्य वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालयात किंवा संस्थेत प्रवेशासाठी, पुस्तके व शैक्षणिक साहित्य खरेदी इत्यादीसाठी प्रती शैक्षणिक वर्षी रु. ३५०००/- (रु. पस्तीस हजार फक्त) एवढे शैक्षणिक अर्थसहाय्य. | नोंदित लाभार्थी कामगारांच्या दोन पाल्यांना अथवा पुरुष कामगाराच्या पत्नीस शासनमान्य वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालयात किंवा संस्थेत प्रवेशासाठी, पुस्तके व शैक्षणिक साहित्य खरेदी इत्यादीसाठी प्रती शैक्षणिक वर्षी **रु. ५०,०००/- (रु. पन्नास हजार फक्त)** एवढे शैक्षणिक अर्थसहाय्य. |
| ). | नोंदित लाभार्थी कामगारांच्या दोन पाल्यांना, शासनास पदविकेमध्ये आणि पदव्युत्तर पदवीका मध्ये शिक्षण घेत असलेल्या पाल्यास प्रतिवर्षी रु. १०,०००/- (रु. दहा हजार फक्त) एवढे आर्थिक सहाय्य. | नोंदित लाभार्थी कामगारांच्या दोन पाल्यांना, शासनास पदविकेमध्ये आणि पदव्युत्तर पदवीका मध्ये शिक्षण घेत असलेल्या पाल्यास प्रतिवर्षी **रु. २५,०००/- (रु. पंचवीस हजार फक्त)** एवढे आर्थिक सहाय्य. |
| | एका मुलीच्या जन्मानंतर नोंदित लाभार्थी बांधकाम कामगार अथवा नोंदित लाभार्थी बांधकाम कामगारच्या त्याच्या पती/पत्नीने कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया केल्यास एका मुलीच्या नावे १८ वर्षापर्यंत रु. २५,०००/- (रु. पंचवीस हजार फक्त) मुदत बंद ठेव. | एका मुलीच्या जन्मानंतर नोंदित लाभार्थी बांधकाम कामगार अथवा नोंदित लाभार्थी बांधकाम कामगारच्या त्याच्या पती/पत्नीने कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया केल्यास एका मुलीच्या नावे १८ वर्षापर्यंत **रु. १,००,०००/- (रु. एक लाख फक्त)** मुदत बंद ठेव. |
| | नोंदित लाभार्थी कामगारास ७५ किंवा कायमचे अपंगत्व आल्यास त्यास रु. १,००,०००/- (रु. एक लाख रुपये) एवढे आर्थिक सहाय्य. | नोंदित लाभार्थी कामगारास ७५ किंवा कायमचे अपंगत्व आल्यास त्यास **रु. २,००,०००/-(रु. दोन लाख रूपये)** एवढे आर्थिक सहाय्य. |
| | नोंदित लाभार्थी कामगाराचा मृत्यू झाल्यास त्याच्या | नोंदित लाभार्थी कामगाराचा मृत्यू झाल्यास त्याच्या |

| | | |
|---|---|---|
| | नामनिर्देशित केलेल्या वारसास रु. ५,०००/- (रु. पाच हजार फक्त) एवढी रक्कम अत्यंविधीसाठी मदत. | नामनिर्देशित केलेल्या वारसास **रु. १०,०००/- (रू. दहा हजार फक्त)** एवढी रक्कम अत्यंविधीसाठी मदत. |
| ११. | नोंदित लाभार्थी कामगाराचा मृत्यू झाल्यास त्याच्या विधवा पत्नी अथवा स्त्रीकामगाराचे विधुर पतीस प्रतिवर्षी रु. १२,०००/- (रु. बारा हजार फक्त) एवढे आर्थिक सहाय्य. | नोंदित लाभार्थी कामगाराचा मृत्यू झाल्यास त्याच्या विधवा पत्नी अथवा स्त्रीकामगाराचे विधुर पतीस प्रतिवर्षी **रु. २४,०००/- (रू. चौवीस हजार फक्त)** एवढे आर्थिक सहाय्य. (पाच वर्षापर्यंत) |
| १२. | नोंदित लाभार्थी बांधकाम कामगाराचा कामावर असताना मृत्यू झाल्यास त्याच्या कायदेशीर वारसास रु. २,००,०००/- (रु. दोन लाख) एवढे आर्थिक सहाय्य. | नोंदित लाभार्थी बांधकाम कामगाराचा कामावर असताना मृत्यू झाल्यास त्याच्या कायदेशीर वारसास **रु. ५,००,०००/- (रू. पाच लाख फक्त)** एवढे आर्थिक सहाय्य. |
| १३. | नोंदित लाभार्थी स्त्री बांधकाम कामगारास व नोंदित पुरुष लाभार्थी बांधकाम कामगारास तसेच कुटुंबातील सदस्यांस गंभीर रोग व गंभीर आजाराच्या उपचारार्थ रुपये २५,०००/- (रु. पंचवीस हजार फक्त) एवढे आर्थिक सहाय्य. | नोंदित लाभार्थी स्त्री बांधकाम कामगारास व नोंदित पुरुष लाभार्थी बांधकाम कामगारास तसेच कुटुंबातील सदस्यांस गंभीर रोग व गंभीर आजाराच्या उपचारार्थ **रु. १,००,०००/- (रु. एक लाख फक्त)** एवढे आर्थिक सहाय्य. (फक्त एकदा) |
| १४. | संगणकाचे शिक्षण (MS-CIT) घेत असलेल्या नोंदित लाभार्थी कामगारांच्या दोन पाल्यांना शुल्काची परीपुर्ती. | संगणकाचे शिक्षण (MS-CIT) घेत असलेल्या नोंदित लाभार्थी कामगारांच्या दोन पाल्यांना शुल्काची परीपुर्ती. |
| १५. | नोंदित लाभार्थी बांधकाम कामगाराच्या स्वत:च्या पहिल्या विवाहाच्या खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी रु. १०,०००/- (रु. दहा हजार फक्त) अनुदान. | नोंदित लाभार्थी बांधकाम कामगाराच्या स्वत:च्या पहिल्या विवाहाच्या खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी **रु. ५०,०००/- (रू. पन्नास हजार फक्त)** अनुदान. |

**विषय क्र. ५) : आयत्यावेळचे विषय.**

**१)मंडळाच्या उपकराच्या गुंतवणुकीबाबत –**

याबाबत बोलताना मंडळाच्या सचिव यांनी मंडळांतर्गत जमा उपकराच्या रक्कमेच्या गुंतवणूकीचा तपशील मंडळासमोर सादर केला. गुंतवणूकीची मागील बैठक मा. अध्यक्षांनी सूचित केल्यानुसार दि. २२.१२.२०१५ रोजी पार पडल्याचे त्यांनी उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिले. त्यामध्ये मंडळाकडे असलेल्या एकूण रू. ८०० रकमेपैकी रुपये ३०० कोटी इतकी रक्कम देना बँकेच्या माटुंगा शाखेत ७.५१% प्रतिवर्ष या दराने गुंतवण्यात आली असून रू. ५०० कोटी इतकी रक्कम सिंडीकेट बँकेच्या कुलाबा शाखेत ७.३१% प्रतिवर्ष या व्याजदराने एका वर्षासाठी गुंतवण्यात आली असल्याचे त्यांनी उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिले. या गुंतवणूकीची नोंद मंडळाने घेतली

No. Z-20011/08/2021-BOCW
Government of India
Ministry of Labour and Employment
O/o DGLW
*****

Jaisalmer House, Mansingh Road
New Delhi, dated 22nd March, 2021

## Order under Section 60 of BOCW Act, 1996

**Subject : Use of Direct Benefit Transfer (DBT) for cash assistance and restriction on distribution of benefits in-kind to the registered BOCW workers by the State Building and Other Construction Workers' Welfare Board – reg.**

**Read : (1) Section 60 of the Building and Other Construction Workers (Regulation of Employment and Conditions of Service) Act, 1996. (BOCW Act, 1996)**

**(2) O.M.No.1-11-11/145/2015-DBT-Cab.(Pt.) dated 31st March, 2016 of DBT Mission, Cabinet Secretariat, Government of India**

Whereas, the BOCW Act, 1996 aims at regulating the safety, health, welfare and other conditions of service of BOCW workers through the Welfare Boards in every State/UT, which are administered by the respective State/UT:

Whereas, Section 22(1) of the said Act comprehensively stipulates the functions of the Welfare Board as under:

a. Provide immediate assistance to a beneficiary in case of an accident;
b. Make payment of pension to the beneficiaries who have completed the age of sixty years;
c. Sanction loans and advances to a beneficiary for construction of a house not exceeding such amount and on such terms and conditions as may be prescribed;
d. Pay such amount in connection with premia for Group Insurance Scheme of the beneficiaries as it may deem fit;
e. Give such financial assistance for the education of children of the beneficiaries as may be prescribed;
f. Meet such medical expenses for treatment of major ailments of a beneficiary or, such dependent, as may be prescribed;
g. Make payment of maternity benefit to the female beneficiaries; and
h. Make provision and improvement of such other welfare measures and facilities as may be prescribed.

Whereas, several instructions have been issued by Ministry of Labour & Employment to State Governments/UTs and respective BOCW Welfare Board to take steps for utilization of the cess fund on account of the above mentioned activities only.

Whereas, Ministry of Labour & Employment has issued Model Welfare Schemes in compliance of the Hon'ble Supreme Court Order dated 19.03.2018 and 04.10.2018 which inter-alia provides detailed guidelines for expenditure of the cess fund on the welfare schemes of the

BOCW workers relating to their life and disability cover, health and maternity cover, education, housing, skill development, awareness programs and pension.

Where It has come to the notice of the Ministry that some State Welfare Boards are incurring expenditure on distribution of lantern, blankets, umbrellas, household items, tool-kits, utensils and similar other articles in-kind, leading to the apprehension of misuse/ leakage of cess fund.

Therefore, keeping in view the above position, following directions are issued to the State/ UT BOCW Welfare Boards under Section 60 of the BOCW Act, 1996:-

(i) The Social security and other coverages stipulated under Section 22(1)(a) to (g) will hold precedence over any other benefit being provided to the registered workers under Section 22 (1)(h) of the Act. After meeting these priority expenses as mentioned in Section 22(1)(a) to (g) of the Act, any balance of cess fund can be utilized by BOCW Boards for giving additional benefits as per mandates given under Section 22 (1)(h) of the Act. The BOCW Boards shall submit an annual Statement to DG, Labour Welfare by 30th April on the expenditure made on items under Section 22(1)(a) to (g) and the money remaining to be spent and actually spent on Section 22(1)(h).

(ii) Any monetary assistance under the welfare schemes are to be provided through Direct Benefit Transfer (DBT) only in the beneficiary's bank account.

(iii) No benefit is to be provided in-kind except in extra-ordinary circumstances such as natural calamities, epidemics, fire, accidents caused due to occupational hazard or similar other crisis, and with prior approval of the State Government and intimation to DG Labour Welfare, Govt Of India.

2. This issues with the approval of Hon'ble Minister of State (IC) for Labour & Employment.

**(Rajender Singh Kaushik)**
**Under Secretary to the Government of India**
**Tele: 011-23385241**
**E-mail: Kaushik.rs06@nic.in**

To,

**The Chief Secretary/Administrators of all States/UTs**
**All Principal Secretary/Secretary/Commissioner of Labour**
**All Secretary, BOCW State Welfare Boards**

**Proforma for sending Annual Report by State/UT BOCW Welfare Boards to Director General, Labour Welfare, Ministry of Labour and Employment, Government of India, 26, Jaisalmer House, Mansingh Road, New Delhi-110011 regarding Expenditure of Cess Fund.**

| Financial Year | Opening Balance of Cess fund as on 1st April of the Financial Year(Rs) | Cess fund spent on items under Section - 22 (1) (a) to (g) | Details of items under column (c) on which the Cess fund spent | Cess fund spent on items under Section - 22 (1) (h) | Details of items under column (e) on which the Cess fund spent | Receipts in the form of Cess Collection, interest etc. during the year | Closing Balance of Cess fund as on 31st March of the Financial Year (Rs) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (a) | (b) | (c) | (d) | (e) | (f) | (g) | (h) |

**कामगार आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.**

विषय : इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या **दि.२०.६.२०११ रोजी संपन्न झालेल्या द्वितीय बैठकीचे इतिवृत्त.**

महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची द्वितीय बैठक दिनांक २०.०६.२०११ रोजी दुपारी १२.०० वाजता मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. संजय देशमुख | :- | कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई - अध्यक्ष |
| २. | श्री. अनिल दत्तात्रय ढवळे | :- | मालक प्रतिनिधी - सदस्य |
| ३. | श्री. रमेश सोहनलाल सारडा | :- | मालक प्रतिनिधी - सदस्य |
| ४. | श्री. शंकर गजानन भोईर | :- | मालक प्रतिनिधी - सदस्य |
| ५. | श्री. संजय गोपाळ जाधव | :- | मालक प्रतिनिधी - सदस्य |
| ६. | श्री. महेश मुद्दा | :- | मालक प्रतिनिधी - सदस्य |
| ७. | श्री. वसंत गणपत सावंत | :- | कामगार प्रतिनिधी - सदस्य |
| ८. | श्री. मुनवर शेख | :- | कामगार प्रतिनिधी - सदस्य |
| ९. | श्री. राजेश फुले | :- | कामगार प्रतिनिधी - सदस्य |
| १०. | श्री. केदार काळे | :- | कामगार प्रतिनिधी - सदस्य |
| ११. | श्री. प्रकाश मारोतराव देवतळे | :- | कामगार प्रतिनिधी - सदस्य |

सर्वप्रथम सर्व उपस्थितांचे स्वागत करुन बैठकीस सुरुवात करण्यात आली. बैठकीत खालील विषयांवर चर्चा करण्यात आली.

१. **मागील बैठकीच्या इतिवृत्तास मंजूरी देणे :-**

दिनांक १८.०५.२०११ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्तांत वाचून दाखविण्यात आले. सदर इतिवृत्तांस सर्व सदस्यांनी मान्यता दिल्याने ते कायम करण्यात आले.

२. **सध्या बँक ऑफ इंडिया, मुंबई येथील खात्यात जमा असलेल्या रकमेची राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये गुंतवणूक करणेबाबत.**

मंडळाकडे सुमारे रु. १६६ कोटी चालू खात्यामध्ये जमा आहेत. हे सर्व पैसे

मंडळाच्या कार्यालयीन कामकाजासाठी रु.५० लाखाची तरतूद करण्यास व ते यासाठी वापरण्यास मंडळाने मंजूरी दिली. मंडळाचा प्रशासकीय खर्च चालविण्यासाठी योजनांवरील खर्चाच्या ५% रक्कम प्रशासकीय खर्च म्हणून अनुज्ञेय आहे. प्रत्यक्ष योजना राबविण्यास काही कालावधी लागणार असल्याने दरम्यानच्या काळात मंडळाचे कामकाज करणे सुकर व्हावे म्हणून रु.५० लाख अग्रीम स्वरुपात देण्यात यावेत असे सदस्य सचीव यानी प्रस्तावीत केले व त्यास सर्वांनी मान्यता दिली.

७. **इमारत व इतर बांधकाम कामगारांना विविध कल्याणकारी योजनांचे लाभ देण्याबाबत विचारविनिमय करुन निर्णय घेणे :-**

अपघात १. लाभार्थी कामगारास अपघात झाल्यास त्यास तात्काळ सहाय्य म्हणून रु. १०,०००/- चा धनादेश हॉस्पीटलच्या नांवाने देण्यात यावा. तसेच चोलामंडलम, आय.सी.आय.सी.आय. लोम्बार्ड, एल.आय.सी. या कंपन्यांकडून माहिती मागवून ग्रुप इन्शुरन्स काढण्याबाबत सुचविण्यात आले.

निवृत्ती वेतन २. वयाची साठ वर्षे पूर्ण झालेल्या लाभार्थी कामगारास निवृत्ती वेतन देण्याबाबतचा मुद्दा सध्या स्थगित ठेवण्यात यावा व सदर बाबीचा पुढील बैठकीमध्ये विचार करण्यात यावा.

घर बांधणी ३. घराच्या बांधकामाकरीता कर्ज वा अग्रिम मंजूर करण्याबाबतच्या मुद्दयावर असे ठरले की, की लाभार्थी कामगारांची नोंदणी झाल्यापासून ०५ वर्षांनंतर कामगारास रु. २,००,०००/- पर्यंतचे कर्ज मंजूर करण्यात यावे.

४. विमा योजनेचा हप्ता अदा करण्याबाबतच्या मुद्दयावर असे ठरले की, लाभार्थी कामगारांना राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजनेंतर्गत समाविष्ठ करुन घेण्यात यावे.

मुलांच्या शिक्षणाकरिता ५. लाभार्थी मुलांच्या शिक्षणाकरिता सहाय्य करण्याविषयीच्या मुद्दयाबाबत असे ठरले की,

अ) इयत्ता पहिली ते दहावी मधील विद्यार्थ्यांची शाळेत जर ७५%

हजेरी असेल तर त्यास महिनावारी रु. १0/- रोख देण्यात यावेत. परंतु, सदरची सवलत ही फक्त मुलीकरीता लागू राहिल.

ब) इयत्ता बारावी नंतर एफ.वाय., एस.वाय., व टी.वाय. च्या प्रवेश व पुस्तके इ.साहीत्यासाठी रु. १५,000/- व वैद्यकिय व तांत्रिक शिक्षणाच्या प्रवेश व पुस्तके इ.साठी रु. ३५,000/- सहाय्य देण्यात येईल. सदरची सवलत ही दोन मुलांपुरतीच मर्यादित राहिल. तसेच सदरची रक्कम ही प्रवेशाच्यावेळी रु. २,000/- सहा महिन्यांनतर रु. ३,000/- व वर्षअखेर रु. ५,000/- विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात येईल.

मोठे आजार ६. मोठया आजारांच्या शुश्रुषेकरीता वैद्यकिय मदत देण्याबाबतच्या मुद्दयावर असा निर्णय झाला की, टी.बी., कॅन्सर अशा प्रकारच्या आजारांवर उपचार करण्याकरीता प्रत्येकी रु. १0,000/- वैद्यकिय खर्चाची प्रतिपूर्ती करण्यात येईल. यामध्ये पुरुष कामगार असल्यास त्याचे आई-वडील, पत्नी व दोन मुले यांचा समावेश असेल. तसेच सदर मुलांचे वय वर्षे १८ खालील असावे. तसेच कामगाराचा मृत्यू झाल्यास तात्काळ सहाय्य म्हणून रु. ५,000/- देण्यात येतील. गंभीर आजार

प्रसुति ७. स्त्री लाभार्थी कामगारांना प्रस्तुती लाभ देण्याबाबत असे ठरले की, नॉर्मल डिलीव्हरी झाल्यास रु. ५,000/- व सिझरींग झाल्यास रु. १0,000/- इतक्या रकमेची मदत करण्यात येईल. तसेच सदरची सवलत फक्त दोन मुलांकरीता लागू राहिल.

८. अन्य कल्याणकारी योजनांकरिता तरतूद करणे व त्यात सुधारणा करण्याकंरिता तरतूद करणयाबाबतच्या मुद्दयावर असे ठरले की, लाभार्थी कामगारांच्या मुलांकरीता वसतीगृह बांधण्यात यावे. त्याकरीता जागा विकत घेऊन १00 मुलांकरीता एक अशा प्रकारे वसतीगृह बांधण्यात यावे. तसेच याबाबत परिपूर्ण अभ्यास करुन पुढील बैठकीमध्ये या विषयावर चर्चा करण्यात यावी.

**मा. अध्यक्षांच्या संमतीने आयत्यावेळचे विषय :-**

८.

कामगार आयुक्त
3 MAR 2021

महाराष्ट्र शासन

क्रइबांका २०१६/प्र.क्र. ८२/काम-७
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ०१ मार्च, २०२१.

प्रति,

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई
15 MAR 2021

विषय :- बांधकाम कामगाराच्या पहिल्या दोन अपत्याच्या शिक्षणाकरीता अर्थसहाय्य देणे, पदव्युत्तर शिक्षणासाठी अर्थसहाय्य व गंभीर आजारामध्ये सर्व कर्करोगाचा समावेश करणेस मान्यता देणेबाबत.

संदर्भ :- १. शासनाचे समक्रमांक दिनांक १६.०६.२०१६ रोजीचे पत्र.
२. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांचे पत्र क्र. इवइबांकाकमं/५२ बैठक-विषय क्र.०३/१५६/मे/२०१९, दिनांक २७.०९.२०१९.

महोदय,

उपरोक्त विषयावरील संदर्भाधीन पत्र कृपया पहावे.

२. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने दिनांक ०४.०९.२०१९ रोजीच्या ५३ व्या बैठकीत नोंदित सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांच्या पाल्यास पदव्युत्तर पदवी या पाठ्यक्रमाचा समावेश करण्यास आणि त्यासाठी प्रतिवर्षी रु. २५,०००/- अर्थसहाय्य देण्याच्या ठरावास शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

३. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने मंजूर केलेल्या सर्व शैक्षणिक अर्थसहाय्य योजनेचा लाभ पहिल्या दोन पाल्यांस देण्याच्या ठरावास शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

आपला,

(श्री. मा. साठे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत :
कामगार आयुक्त यांना माहितीस्तव अग्रेषित.

C:\Lab\Correspondance\BOCW\CR.82\2016

## महाराष्ट्र शासन

क्रमांक: इबांका-२०१६/१६८/प्र.क्र.८२/काम-७
उद्योग उर्जा व कामगार विभाग,
मादामा कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक.
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १६ जून, २०१६.

प्रति,

कामगार आयुक्त,
कामगार आयुक्त यांचे कार्यालय,
कामगार भवन, ई-ब्लॉक, सी-२०,
बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व)
मुंबई- ४०० ०५१.

विषय: इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या योजनांच्या लाभाच्या रकमेत वाढ करण्याबाबत.

संदर्भ: (१) सहायक कामगार अधिकारी तथा सचिव महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांचे पत्र क्र.जा.क्र.मइवइवाकमं/ठराव-चर्चा/२०१५/३७०, दिनांक ४.२.२०१६.

(२)कामगार आयुक्त यांचे पत्र क्र.का.आ./मइवइबांकम्रं/२०१६/११८४, दिनांक २७.५.२०१६.

महोदय,

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक १८.१.२०१६ रोजीच्या बैठकीत, मंडळाच्या अस्तित्वात असलेल्या योजनांच्या लाभाच्या रक्कमेत वाढ करण्याबाबतचा ठराव संमत करण्यात आला होता. त्यानुसार मंडळाच्या विविध योजनांच्या लाभाच्या रक्कमेत वाढ करण्याबाबत मंडळाने शासन मान्यतेकरिता पाठविलेल्या प्रस्तावास अनुसरुन मंडळाकडील नोंदीत पात्र बांधकाम कामगारांकरिता असलेल्या खालील योजना सुधारित स्वरुपात राबविण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

१) नोंदीत लाभार्थी स्त्री बांधकाम कामगारास तसेच नोंदीत पुरुष लाभार्थी बांधकाम कामगारांच्या पत्नीस दोन जिवित अपत्यांपर्यंत नैसर्गीक प्रसुतीसाठी रु.१५,०००/- व शस्त्रक्रियेद्वारे प्रसुतीसाठी रु.२०,०००/- आर्थिक सहाय्य.

२) नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगारांच्या प्रती शैक्षणीक वर्षी शाळेतील किमान ७५% किंवा अधिक उपस्थिती असणाऱ्या दोन पाल्यांना इयत्ता १ ली ते ७ वी साठी प्रतिवर्षी रु.२५००/- आणि ८ वी ते १० वी साठी प्रतिवर्षी रु.५०००/- एवढे शैक्षणिक आर्थिक सहाय्य.

३) नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगारांच्या दोन पाल्यांना इयत्ता १० वी व इयत्ता १२ मध्ये किमान ५० टक्के किंवा अधिक गुण प्राप्त झाल्यास रु.१०,०००/- एवढे प्रोत्साहनात्मक शैक्षणिक सहाय्य.

४) नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगारांच्या दोन पाल्यांना इयत्ता ११ वी व इयत्ता १२ वी च्या शिक्षणासाठी प्रती शैक्षणिक वर्षी रु.१०,०००/- एवढे शैक्षणिक सहाय्य.

५) नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगारांच्या दोन पाल्यांना अथवा पुरुष कामगाराच्या पत्नीस पदवीच्या प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या प्रवेश, पुस्तके व शैक्षणिक सामुग्रीसाठी प्रतिवर्षी रु.२०,०००/- एवढे शैक्षणिक सहाय्य.

६) नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगारांच्या दोन पाल्यांना अथवा पुरुष कामगाराच्या पत्नीस शासनमान्य वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालयात किंवा संस्थेत प्रवेशासाठी, पुस्तके व शैक्षणिक साहित्य खरेदी इत्यादीसाठी- प्रती शैक्षणीक वर्षी वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमाकरिता रु.१,००,०००/- व अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाकरिता रु.६०,०००/- इतके शैक्षणिक अर्थसहाय्य.

७) नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगारांच्या दोन पाल्यांना पदविका शिक्षण घेत असलेल्या पाल्यास प्रती शैक्षणिक वर्षी रु.२०,०००/- आणि पदव्युत्तर पदवीका मध्ये शिक्षण घेत असलेल्या पाल्यास प्रती शैक्षणिक वर्षी रु.२५,०००/- एवढे आर्थिक सहाय्य.

८) एका मुलीच्या जन्मानंतर नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगार अथवा नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगाराच्या पती/ पत्नीने कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया केल्यास एका मुलीच्या नावे १८ वर्षापर्यंत रु.१,००,०००/- मुदत बंद ठेव.

९) नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगारास ७५ टक्के किंवा कायमचे अपंगत्व आल्यास त्यास रु.२,००,०००/- एवढे आर्थिक सहाय्य. तथापि, नोंदीत बांधकाम कामगाराचे विमा संरक्षण असल्यास, विमा रक्कमेची प्रतिपुर्ती अथवा रु.२,००,००० आर्थिक सहाय्य यापैकी कोणताही एकच लाभ अनुज्ञेय राहील.

१०) नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगाराचा मृत्यु झाल्यास त्याच्या नामनिर्देशित केलेल्या वारसास रु.१०,०००/- एवढी रक्कम अंत्यविधीसाठी मदत.

११) नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगाराचा मृत्यु झाल्यास त्याच्या विधवा पत्नी अथवा स्त्री कामगारांच्या विधुर पतीस प्रतिवर्षी रु.२४,०००/- एवढे आर्थिक सहाय्य (पाच वर्षापर्यंत).

१२) नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगाराचा कामावर असताना मृत्यू झाल्यास त्याच्या कायदेशीर वारसास रु.५,००,०००/- एवढे आर्थिक सहाय्य.

१३) नोंदीत लाभार्थी स्त्री बांधकाम कामगारास व नोंदीत पुरुष लाभार्थी बांधकाम कामगारास तसेच कुटुंबातील सदस्यांस गंभीर रोग / आजाराच्या उपचारार्थ रुपये १,००,०००/- एवढे आर्थिक सहाय्य **(एका सदस्यास केवळ एकदाच आणि कुटुंबातील दोन सदस्यांपर्यंत मर्यादित)**. तथापि, आरोग्य विमा योजना लागू नसल्यासच सदर योजनेचा लाभ देण्यात यावा.

१४) संगणकाचे शिक्षण (MS-CIT) घेत असलेल्या नोंदीत लाभार्थी कामगारांच्या दोन पाल्यांना शुल्काची प्रतिपूर्ती. तथापि, MS-CIT उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र सादर केल्यास सदर शुल्काची प्रतिपूर्ती करण्यात यावी.

१५) नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगारांच्या स्वतःच्या पहिल्या विवाहाच्या खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी रु.३०,०००/- अनुदान.

२. सदर योजनांच्या अंमलबजावणीत कोणतीही अनियमितता होणार नाही. याची दक्षता घ्यावी. त्याकरिता मंडळाने विशिष्ट कार्यप्रणाली निश्चित करुन व संगणक नोंद प्रक्रियेचा अवलंब करुन योजनांची प्रभावी व परिणामकारक अंमलबजावणीकरावी. तसेच अद्ययावत अभिलेख ठेवावेत. त्याचप्रमाणे सदरहू योजनांच्या अंमलबजावणीचा त्रैमासिक अहवाल शासनास स्वतंत्रपणे/नियममितपणे सादर करावा.

आपला,

(प्रशांत पु. राठोड)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत,

(१) सहायक कामगार आयुक्त तथा सचिव इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, कामगार आयुक्त कार्यालय, कामगार भवन, बांद्रा-कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१ यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव.

(२) निवडनस्ती (कामगार -७)

## महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ.

**विषय : इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक ११.१०.२०११ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्तांत.**

दिनांक ११.१०.२०११ रोजी दुपारी १०.०० वाजता मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची बैठक पार पडली. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. संजय देशमुख | :- | कामगार आयुक्त तथा अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई. |
| २. | श्री. आर.व्ही. कुळकर्णी | :- | कामगार उप आयुक्त तथा मुख्याधिकारी, मुंबई. |
| ३. | श्री. एस.आर. कदम | :- | सहाय्यक कामगार आयुक्त, मुंबई. |
| ४. | श्री. अनिल दत्तात्रय ढवळे | :- | मालक प्रतिनिधी |
| ५. | श्री. शंकर गजानन भोईर | :- | मालक प्रतिनिधी |
| ६. | श्री. संजय गोपाळ जाधव | :- | मालक प्रतिनिधी |
| ७. | श्री. राजेश फुले | :- | कामगार प्रतिनिधी |
| ८. | श्री. मुन्वर शेख | :- | कामगार प्रतिनिधी |
| ९. | श्री. वसंत गणपत सावंत | : | कामगार प्रतिनिधी |
| १०. | श्री. प्रकाश देवतळे | :- | कामगार प्रतिनिधी |

सर्वप्रथम सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत करुन बैठकीस सुरुवात करण्यात आली.

१. **मागील बैठकीच्या इतिवृत्तांतास मंजूरी देणे :-**

प्रथमतः श्री. कुलकर्णी, कामगार उप आयुक्त यांनी दिनांक १०.०८.२०११ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त वाचून दाखविले. त्यात श्री. फुले यांनी असे नमूद केले की, मागील इतिवृत्ताच्या मुद्दा क्र. ४ (१) मध्ये लाभार्थी कामगार हा किमान एक वर्षे मंडळाचा नोंदणीकृत सभासद असेल तरच त्याला सदर योजनेचा लाभ देता येईल, असा उल्लेख केला आहे. त्यावर श्री. फुले, सदस्य यांनी सदरचा कालावधी ०६ महिने असावा अशी चर्चा होऊन निश्चित केल्यावरही एक वर्ष नमूद केले आहे, असे निदर्शनास आणले. त्यावर याची नोंद घेऊन ०६ महिने अशी दुरुस्ती करण्यात येईल, असे अध्यक्ष यांनी सांगितले . त्यास सर्व सदस्यांनी सहमती दिली.

अनुषंगिक खर्च देण्याबाबत सविस्तर नियमावली बनविण्यात यावी

सूचक :- श्री राजेश फुले, सदस्य

अनुमोदक :- श्री संजय गोपाळ जाधव, सदस्य

ठराव सर्वानुमते मंजूर

८. **रोख बक्षिस** :- ज्या कामगारांच्या पाल्यांना इयत्ता १०वी अथवा १२ वी मध्ये ७५% किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त झाले आहेत, अशा पाल्यांना एकरकमी रु. ५,०००/- प्रोत्साहन निधी म्हणून देण्यात यावेत.

**ठराव क्र. ०९ :- ठराव करण्यात येतो की, इयत्ता १० वी व १२ वी मध्ये ७५% गुणांच्या वर गुण प्राप्त करणाऱ्या बांधकाम कामगाराच्या पाल्यास रु. ५०००/- प्रोत्साहन निधी देण्यात यावा.**

**सूचक :- श्री. शंकर गजानन भोईर, सदस्य**

**अनुमोदक :- श्री. राजेश फुले, सदस्य**

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

९. **व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेश परिक्षेकरीता शिकवणीसाठी आर्थिक सहाय्य :-** ज्या कामगारांच्या पाल्यांना इयत्ता १२वी नंतर वैद्यकिय अथवा तांत्रिक शिक्षणासाठी प्रवेश प्राप्त झाला असेल अशा पाल्यांना त्यांच्या शिक्षणाच्या कालावधीमध्ये दरवर्षी रु. ५,०००/- पर्यंत विशेष आर्थिक सहाय्य देण्यात यावे. ही सवलत देत असताना संबंधित विद्यार्थ्यास १२वी मध्ये किमान ५०% गुण असले पाहिजेत. या योजनेचे इतर निकष पुढील बैठकीत सादर करण्यात यावे, असे श्री. अनिल दत्तात्रय ढवळे यांनी सुचविले.

**ठराव क्र. १० :- ठराव करण्यात येतो की, इयत्ता १२ वी नंतर वैद्यकीय अथवा तांत्रिक शिक्षणासाठी प्रवेश प्राप्त झाला असल्यास बांधकाम कामगाराच्या पाल्यांना दरवर्षी रु.५०००/- विशेष आर्थिक मदत देण्यात यावे. अशा विद्यार्थ्यास इयत्ता १२ वी मध्ये किमान ५०% गुण असणे आवश्यक आहे.**

**सूचक :- श्री. अनिल दत्तात्रय ढवळे**

**अनुमोदक :- श्री. प्रकाश देवतळे**

[illegible]

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ.**

**विषय : इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक ११.१०.२०११ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्तांत.**

दिनांक ११.१०.२०११ रोजी दुपारी १०.०० वाजता मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची बैठक पार पडली. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. संजय देशमुख | :- | कामगार आयुक्त तथा अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई. |
| २. | श्री. आर.व्ही. कुळकर्णी | :- | कामगार उप आयुक्त तथा मुख्याधिकारी, मुंबई. |
| ३. | श्री. एस.आर. कदम | :- | सहाय्यक कामगार आयुक्त, मुंबई. |
| ४. | श्री. अनिल दत्तात्रय ढवळे | :- | मालक प्रतिनिधी |
| ५. | श्री. शंकर गजानन भोईर | :- | मालक प्रतिनिधी |
| ६. | श्री. संजय गोपाळ जाधव | :- | मालक प्रतिनिधी |
| ७. | श्री. राजेश फुले | :- | कामगार प्रतिनिधी |
| ८. | श्री. मुन्वर शेख | :- | कामगार प्रतिनिधी |
| ९. | श्री. वसंत गणपत सावंत | : | कामगार प्रतिनिधी |
| १०. | श्री. प्रकाश देवतळे | :- | कामगार प्रतिनिधी |

सर्वप्रथम सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत करुन बैठकीस सुरुवात करण्यात आली.

**१. मागील बैठकीच्या इतिवृत्तांतास मंजूरी देणे :-**

प्रथमतः श्री. कुलकर्णी, कामगार उप आयुक्त यांनी दिनांक १०.०८.२०११ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त वाचून दाखविले. त्यात श्री. फुले यांनी असे नमूद केले की, मागील इतिवृत्ताच्या मुद्दा क्र. ४ (१) मध्ये लाभार्थी कामगार हा किमान एक वर्षे मंडळाचा नोंदणीकृत सभासद असेल तरच त्याला सदर योजनेचा लाभ देता येईल, असा उल्लेख केला आहे. त्यावर श्री. फुले, सदस्य यांनी सदरचा कालावधी ०६ महिने असावा अशी चर्चा होऊन निश्चित केल्यावरही एक वर्ष नमूद केले आहे, असे निदर्शनास आणले. त्यावर याची नोंद घेऊन ०६ महिने अशी दुरुस्ती करण्यात येईल, असे अध्यक्ष यांनी सांगितले . त्यास सर्व सदस्यांनी सहमती दिली.

**ठराव क्र. ०६ :- ठराव करण्यात येतो की, बांधकाम कामगाराचा अपघाती किंवा नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबियांना (पती/पत्नी) यांना रु. १०००/- मासिक सहाय्य सांत्वन निधी मृत्यू दिनांकापासून ५ वर्षे देण्यात यावा.**

**सूचक :- श्री. अनिल दत्तात्रय ढगळे, सदस्य**

**अनुमोदक :- श्री. गुल्जार शेख, सदस्य**

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

६. **कायमचे अपंगत्व आल्यास आर्थिक सहाय्य :-** एखाद्या कामगारास तो बांधकामावर असताना किंवा नसताना अपघात किंवा इतर कारणामुळे कायमचे अपंगत्व आल्यास व ते ७५% पेक्षा जास्त असल्यास त्यास रु. १,००,०००/- निधी देण्यात यावा. कामगार बांधकामाच्या कामावर असताना अपघात होऊन कायमचे अपंगत्व आले तर Workmen Compensation Act अन्वये नुकसान भरपाई मिळण्याची तरतूद आहे, असे असले तरीही हा निधी त्यांना देण्यात यावा, असे श्री. शंकर गजानन भोईर यांनी सुचविले व त्यास सर्वांनी दुजोरा दिला.

**ठराव क्र. ०७ :- ठराव करण्यात येतो की, नोंदीत लाभार्थीस बांधकामावर असताना किंवा नसताना अथवा इतर कारणाने कायमचे अपंगत्व आल्यास व ते अपंगत्व ७५% पेक्षा जास्त असल्यास त्यास रु.१,००,०००/- निधी देण्यात यावा.**

**सूचक :- श्री. प्रकाश देवतळे, सदस्य**

**अनुमोदक :- श्री. संजय गोपाळ जाधव**

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

७. **असाध्य रोगांकरीता सहाय्य :-** एखाद्या कामगारास असाध्य रोग अथवा तातडीचा आजार उद्भवल्यास सदरहू आजारांसाठी कामगारास विमा योजनेच्या माध्यमातून लाभ मिळत असला तरीही त्याच्या कुटुंबियांना त्याच्या उपचारासाठी इस्पितळात राहण्यासाठीचा अनुषंगिक खर्च इत्यादी रकमेची आवश्यकता भासते. तथापि, यासंबंधी सविस्तर नियम तयार करण्यात येऊन ते पुढील सभेत सादर करण्यात यावेत.

**ठराव क्र. ०८ :- ठराव करण्यात येतो की, बांधकाम कामगारास असाध्य रोग अथवा तातडीचा आजार उद्भवल्यास उपचारासाठी दवाखान्यात भरती होण्यासाठी येणारा**

ठराव सर्वानुमते मंजूर.

१०. **प्रसुती लाभ** :- महिला कामगारांना अथव पुरुष कामगाराच्या पत्नीला प्रसुतीसाठी निधी देण्यात यावा, जेणेकरुन सदरहू प्रसुती ही योग्य सोई-सुविधा उपलब्ध असलेल्या हॉस्पीटलमध्ये करता येईल व मातेच्या जीवितास धोका रहाणार नाही, म्हणून असे लाभ देणे आवश्यक आहे, असे म्हणणे श्री. शंकर गजानन भोईर यांनी मांडले. त्यावर श्री. राजेश फुले यांनी नैसर्गिक प्रसुतीकरीता रु. ५,०००/- व शस्त्रक्रिया केल्यास रु. १०,०००/- आर्थिक सहाय्य देण्यात यावे व हे जास्तीत जास्त दोन प्रसुतीच्यावेळी देय ठरतील असे सुचविले. त्यास सर्वांनी सहमती दर्शविली.

बांधकाम कामगाराने एका मुलीनंतर कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया केल्यास संबंधित मुलीच्या नावे रु. २५,०००/- विशेष सहाय्य देण्यात यावे व ते १८ वर्षांच्या मुदतीकरीता राष्ट्रीयीकृत बँकेमध्ये गुंतविण्यात यावेत. तसेच सदरहू मुलगी सज्ञान झाल्यावर तिला व्याजासह ही रक्कम देण्यात यावी.

**ठराव क्र. ११ :- ठराव करण्यात येतो की, बांधकाम कामगार महिला अथवा पुरुष कामगाराच्या पत्नीला प्रसुतीकरिता रु. ५०००/- व शस्त्रक्रिया झाल्यास रु. १०,०००/- आर्थिक सहाय्य देणे व एका मुलीवर कुटूंब नियोजनाची शस्त्रक्रिया केल्यास अशा मुलीच्या नावे रु. २५,०००/- त्या मुलीच्या वयाची १८ वर्षे पूर्ण होईपर्यंत मुदत ठेव ठेवण्यात यावी.**

**सूचक :- श्री. राजेश फुले, सदस्य**

**अनुमोदक :- श्री. अनिल दत्तात्रय ढवळे, सदस्य**

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**खालील मुद्दयांवर पुढील बैठकीत चर्चा करण्याचे ठरले.**

**११. गृहकर्जे**

**१२. पेन्शन योजना**

**१३. अंत्यविधी सहाय्य**

**१४. अपघाती मृत्यूकरीता भरपाई**

**१५. कामगारांच्या पाल्यांच्या शिक्षणाकरीता आर्थिक सहाय्य**

ठराव सर्वानुमते मंजूर.

१०. **प्रसुती लाभ** :- महिला कामगारांना अथव पुरुष कामगाराच्या पत्नीला प्रसुतीसाठी निधी देण्यात यावा, जेणेकरुन सदरहू प्रसुती ही योग्य सोई-सुविधा उपलब्ध असलेल्या हॉस्पीटलमध्ये करता येईल व मातेच्या जीवितास धोका रहाणार नाही, म्हणून असे लाभ देणे आवश्यक आहे, असे म्हणणे श्री. शंकर गजानन भोईर यांनी मांडले. त्यावर श्री. राजेश फुले यांनी नैसर्गिक प्रसुतीकरीता रु. ५,०००/- व शस्त्रक्रिया केल्यास रु. १०,०००/- आर्थिक सहाय्य देण्यात यावे व हे जास्तीत जास्त दोन प्रसुतीच्यावेळी देय ठरतील असे सुचविले. त्यास सर्वांनी सहमती दर्शविली.

बांधकाम कामगाराने एका मुलीनंतर कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया केल्यास संबंधित मुलीच्या नावे रु. २५,०००/- विशेष सहाय्य देण्यात यावे व ते १८ वर्षांच्या मुदतीकरीता राष्ट्रीयीकृत बँकेमध्ये गुंतविण्यात यावेत. तसेच सदरहू मुलगी सज्ञान झाल्यावर तिला व्याजासह ही रक्कम देण्यात यावी.

**ठराव क्र. ११ :- ठराव करण्यात येतो की, बांधकाम कामगार महिला अथवा पुरुष कामगाराच्या पत्नीला प्रसुतीकरिता रु. ५०००/- व शस्त्रक्रिया झाल्यास रु. १०,०००/- आर्थिक सहाय्य देणे व एका मुलीवर कुटूंब नियोजनाची शस्त्रक्रिया केल्यास अशा मुलीच्या नावे रु. २५,०००/- त्या मुलीच्या वयाची १८ वर्षे पूर्ण होईपर्यंत मुदत ठेव ठेवण्यात यावी.**

**सूचक :- श्री. राजेश फुले, सदस्य**

**अनुमोदक :- श्री. अनिल दत्तात्रय ढवळे, सदस्य**

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**खालील मुद्दयांवर पुढील बैठकीत चर्चा करण्याचे ठरले.**

**११. गृहकर्जे**

**१२. पेन्शन योजना**

**१३. अंत्यविधी सहाय्य**

१४. अपघाती मृत्यूकरीता भरपाई

**१५. कामगारांच्या पाल्यांच्या शिक्षणाकरीता आर्थिक सहाय्य**

## महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.

कार्यासन 30.

इतिवृत्तांत :-

विषय– महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक 22 ऑगस्ट, 2012 रोजी संपन्न झालेल्या 12 व्या बैठकीचे इतिवृत्तांत.

दिनांक 22 ऑगस्ट, 2012 रोजी दुपारी 2.00 वाजता महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची 12 वी बैठक कामगार आयुक्त कार्यालयाच्या समिती सभागृह येथे पार पडली. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | श्री मधुकर बी गायकवाड | : | मा.कामगार आयुक्त,महाराष्ट्र राज्य,मुंबई तथा अध्यक्ष |
| 2 | श्री. सी.बी.पाटील | : | सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई |
| 3 | श्री. अनिल दत्तात्रय ढवळे | | मालक प्रतिनिधी |
| 4 | श्री. रमेश सो. सारडा | | मालक प्रतिनिधी |
| 5 | श्री. केदार काळे | | मालक प्रतिनिधी |
| 6 | श्री प्रकाश देवतळे | : | मालक प्रतिनिधी |
| 7 | श्री वसंत गणपत सावंत | : | कामगार प्रतिनिधी |
| 8 | श्री मुनवर शेख | : | कामगार प्रतिनिधी |
| 9 | श्री राजेश फुले | : | कामगार प्रतिनिधी |
| 10 | श्री दादाराव डोंगरे | : | कामगार प्रतिनिधी |
| 11 | श्रीमती राधिका गायकवाड | : | कामगार प्रतिनिधी |
| 12 | श्री र. वि. कुलकर्णी | | कामगार उप आयुक्त तथा सचिव |
| 13 | श्री सु.मा. कदम | | सहायक कामगार आयुक्त, मुंबई |

सर्व प्रथम अध्यक्षांनी उपस्थितांचे स्वागत करून बैठकीस सुरुवात केली.

1

कामगार आयुक्त तथा अध्यक्ष तसेच कामगार प्रतिनिधी श्री फुले, आगरे व श्री शेख तसेच मालक प्रतिनिधी श्री सारडा, ढवळे व श्री मुद्दा हे अभ्यास गटात राहतील

जिल्ह्याच्या ठिकाणी 400, कोकण विभागात 500 व मुंबईमध्ये 1000 घर बांधण्यात यावीत. असे सूचविले गेले. मा. अध्यक्षांनी कामगाराचे महाराष्ट्रातील वास्तव्य 15 वर्ष असावे, तो नोंदीत कामगार असावा व नोंदणी चालू असावी व त्याचे वय 18 ते 60 पर्यंत असावे, असे निकष सूचविले. सदर योजना दोन महिन्यात चालू जावे असे श्री. फुले यानी सूचविले. उपरोक्त उल्लेखित गटाची बैठक लवकरच घेतली जावून त्यात निकष व कार्यपध्दती बाबत प्रस्ताव केला जाईल, असे ठरले.

ठराव– नोंदीत बांधकाम कामगारांसाठी घरकुल योजना राबविली जाण्याचे एकमताने ठरले.

**विषय कमांक 4 बांधकाम कामगारांच्या अपघातीपोटी रू 2 लाखाचे अर्थसहाय मंजूर करणे.**

वरील बाबत सांगोपांग चर्चा झाली. सदरील मदत नैसर्गिक मृत्यूपोटीही देण्याचे श्री सावंत यांनी सूचविले. यावर श्री ढवळे यांनी केवळ अपघाती मृत्यू झाल्यास ही मदत देण्यात यावी, असे सूचविले. जे सर्वानुमते मान्य करण्यात आले.

ठराव– नोंदीत बांधकाम कामगारांच्या अपघाती मृत्यूपोटी पती अथवा पत्नी अथवा कायदेशीर वारसास रू 2 लाखाचे अर्थ सहाय देण्याचे एकमताने ठरावाद्वारे मंजूर करण्यात आले.

**विषय कमांक 5– बांधकाम कामगारांचे नोंदणी अभियान राबविण्यासाठी विभागीय कार्यालयांना प्रत्येकी रू 5 लाख देणे व त्यासाठी विभागीय कार्यालयांना राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडयाचे परवानगी देणे.**

सदरील बाबत चर्चा होवून विभागीय कार्यालयांना प्रत्येकी रू 3 लाखा ऐवजी रू 5 लाख देण्याचे ठरले. ही रक्कम खालील प्रमाणे खर्च केले जावी

अ. कामगार मेळावे व जाणीव जागृती मोहिम.

ब. लहान प्रमाणातील जाहिराती, उदा. पत्रके, लिफलेट इत्यादी.

क. दूरवरच्या कामावरील क्षेत्रिय भेटी.

## महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

विषय :- महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक ०८.०७.२०१३ रोजी सकाळी ११.४५ वाजता संपन्न झालेल्या बैठकींचा इतिवृत्तांत.

दिनांक ०८.०७.२०१३ रोजी सकाळी ११.४५ वाजता मा. कामगार आयुक्त तथा अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची बैठक संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री मधुकर गायकवाड | : | मा. कामगार आयुक्त,महाराष्ट्र राज्य, मुंबई तथा अध्यक्ष |
| | | : | शासकीय सदस्य |
| २. | श्री बाळासाहेब कोळसे, सहसचिव (कामगार विभाग, मंत्रालय),मुंबई | : | शासकीय सदस्य |
| ३. | श्री शि. म. म्हात्रे, सहसचिव,वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई | : | शासकीय सदस्य |
| ४. | श्रीमती सरोज देशपांडे, कल्याण आयुक्त, नागपूर | : | मालक प्रतिनिधी सदस्य |
| ५. | श्री रमेश सारडा | : | मालक प्रतिनिधी सदस्य |
| ६. | श्री अनिल दत्तात्रय ढवळे | : | मालक प्रतिनिधी सदस्य |
| ७. | श्री महेश मुद्दा | : | मालक प्रतिनिधी सदस्य |
| ८. | श्री प्रकश देवतळे | : | मालक प्रतिनिधी सदस्य |
| ९. | श्री केदार काळे | : | कामगार प्रतिनिधी सदस्य |
| १०. | श्री वसंत गणपत सावंत | : | कामगार प्रतिनिधी सदस्य |
| ११. | श्री मुनवर शेख | : | कामगार प्रतिनिधी सदस्य |
| ११. | श्री राजेश फुले | : | कामगार प्रतिनिधी सदस्य |
| १२. | श्री.दादाराव डोंगरे | : | कामगार प्रतिनिधी सदस्य |
| १३. | श्रीमती राधिका गायकवाड | | |
| १४. | श्री व्हि. के. बुवा, कामगार उप आयुक्त, मुंबई | : | सचिव |

सन्माननीय सदस्य श्री.फुले यांनी लिंका [illegible] [illegible] [illegible] व सर्व सामुग्री तात्काळ उपलब्ध करुन त्यासाठी सुचित केले. लिंका योजनासाठी [illegible] [illegible] तयार करुन सर्व कार्यालयांना [illegible] येईल. श्री.फुले यांनी सुचित केल्याप्रमाणे नोंदित बांधकाम कामगाराच्या पहीली ते दहावीत शिकत असलेल्या मुलींसाठी रु.६०० रुपये प्रतिवर्षी ही शिष्यवृत्ती योजना त्यांच्या मुलांसाठी देखील लागु करावी. ही बाब सर्वानुमते मान्य झाली.

तसेच श्री.फुले यांनी तांत्रिक शिक्षणाकरीता शिष्यवृत्ती देण्यात यावी.. असे सांगितले.

**विषय क्र.४:- नवीन प्रस्तावित योजनांना मान्यता देणे बाबत.**

मा.अध्यक्षांनी खालील विषय मंडळ सदस्यांच्या निदर्शनास आणुन दिले.

**ठराव :- १)** सर्व प्रकारच्या पदविका व पदवीव्युत्तर पदविका यांनाही वार्षिक २००० रुपये स्कॉलरशिप देण्याचा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.

**ठराव :-** २) मा.प्रधान सचिव (कामगार) यांचे सुचनेवरुन खालील दोन योजना मंजूर केल्या

A) इंग्रजी शिक्षणासाठी रु.२०००/- प्रती पाल्य २ मुलांकरीता मर्यादित प्रशिक्षण पावत्या सादर केल्यास देण्यात येईल.

B) कामगारांच्या मुलांना (जास्तीत जास्त दोन) संगणकात प्राविण्य मिळविण्यासाठी एमएससीआयटी परीक्षेसाठी अर्थसहाय्य देणे

**ठराव :- ३)** नैसर्गिक प्रसुती झालेल्या बांधकाम कामगारांच्या पत्नीस रु.१०,०००/- देण्यात येईल. सिझेरिअन प्रसुती झालेल्या बांधकाम कामगारांच्या पत्नीस रु.१५,०००/- देण्यात येईल.

**ठराव :-** ४) नोंदीत बांधकाम कामगारांच्या इयत्ता ११ वीतील मुलांकरीता रु.२०००/- शिष्यवृत्ती देण्यात येईल. नोंदित बांधकाम कामगारांच्या मुलींसाठी विहीत केलेली रु.६००/- ही योजना मुलांसाठीही लागु करण्याचे सुचविले व त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. त्याप्रमाणे यात वृध्दी करुन इयत्ता पहीली ते सातवी साठी १२०० रुपये व इयत्ता आठवी ते दहावीसाठी २४०० रुपये प्रतिवर्षी अशी सुधारणा सर्वानुमते केली.

**ठराव :-** ५) सध्याच्या योजनेनुसार कुंटूंब नियोजनाची शस्त्रक्रिया केल्यास नोंदीत कामगारांच्या एकुलत्या एक मुलीच्या नांवे रु.२५०००/-.त्या मुलीच्या वय १८ वर्षे पुर्ण होईपर्यंत ठेवण्यात येत होती. ती आता दोन मुलींच्या नांवे प्रत्येकी रु.२५,०००/- मुदत ठेव त्याच्या वयाची १८ वर्षे पुर्ण

७ बैठक दि. १६/१/१४

**योजना क्र.५:** नोंदीत लाभार्थी कामगारांच्या २ पाल्यांना अथवा पुरुष कामगाराच्या पत्नीस पदवीच्या प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या प्रवेश, पुस्तके व शैक्षणिक सामुग्रीसाठी प्रतिवर्षी रु.१५०००/- एवढे शैक्षणिक सहाय्य.( या योजनेचा लाभ फक्त चालू शैक्षणिक वर्षासाठी देण्यात येईल.)

**योजना क्र.६:** नोंदीत लाभार्थी कामगारांच्या २ पाल्यांना अथवा पुरुष कामगाराच्या पत्नीस शासनमान्य वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालयात किंवा संस्थेत प्रवेशासाठी पुस्तके व शैक्षणिक साहित्यखरेदी इत्यादीसाठी प्रती शैक्षणिक वर्षी रु.५०,०००/- एवढे शैक्षणिक सहाय्य.( या योजनेचा लाभ फक्त चालू शैक्षणिक वर्षासाठी देण्यात येईल.)

**योजना क्र.७:** नोंदीत लाभार्थी कामगारांच्या २ पाल्यांना, शासनमान्य पदविकेमध्ये आणि पदव्युत्तर पदविकेमध्ये शिक्षण घेत असलेल्या पाल्यांस प्रतिवर्षी रु.१०,०००/- एवढे आर्थिक सहाय्य.

**योजना क्र.८:** दोन मुलींच्या जन्मानंतर नोंदित लाभार्थी बांधकाम कामगार अथवा नोंदित लाभार्थी बांधकाम कामगाराच्या पती किंवा पत्नी यांनी कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रीया केल्यास दोन मुलींच्या नांवे १८ वर्षापर्यन्त रु. २५,०००/- मुदत बंद ठेव.

**योजना क्र.९:** नोंदित लाभार्थी कामगारास ७५% किंवा कायमचे अपंगत्व आल्यास त्यास रु. १,००,०००/- (रु. एक लाख ) एवढे आर्थिक सहाय्य. (मेडिक्लेम योजनेत अंतर्भूत नसल्यास)

**योजना क्र.१०:** नोंदित लाभार्थी कामगाराचा मृत्यू झाल्यास त्याच्या नामनिर्देशित केलेल्या वारसास रु.५,०००/- एवढी रक्कम अत्यंविधीसाठी मदत.

**योजना क्र.११:** नोंदीत लाभार्थी कामगाराचा मृत्यू झाल्यास त्याच्या विधवा पत्नीस अथवा स्त्री कामगाराचे विधुर पतीस प्रतीवर्षी रु.१२,०००/- एवढे आर्थिक सहाय्य. (फक्त पाच वर्षासाठी)

**योजना क्र.१२:** नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगारांचा मृत्यू झाल्यास त्याच्या कायदेशीर वारसास रुपये २,००,०००/- एवढे आर्थिक सहाय्य. (मेडिक्लेम योजनेत अंतर्भूत नसल्यास)

**योजना क्र.१३:** नोंदीत लाभार्थी स्त्री बांधकाम कामगारास व नोंदीत पुरुष लाभार्थी बांधकाम कामगारास तसेच कुटुंबातील सदस्यांस गंभीर रोग व गंभीर आजाराच्या उपचारार्थ रुपये २५,०००/- एवढे वैद्यकीय सहाय्य. (मेडिक्लेम योजनेत अंतर्भूत नसल्यास)

**योजना क्र.१४:** संगणक शिक्षण ( फक्त MS-CIT course ) घेत असलेल्या नोंदीत लाभार्थी कामगारांच्या दोन पाल्यांना शुल्काची परीपुर्ती.

**योजना क्र.१५:** नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगारांच्या स्वतःच्या पहिल्या विवाहाच्या खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी रु. १०,०००/- अनुदान.

कामगार आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई

**विषय :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक ०२.११.२०१५ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्तांत.**

---

दिनांक ०२.११.२०१५ रोजी दुपारी ३.०० वाजता महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची बैठक कामगार आयुक्त कार्यालय, कामगार भवन, बांद्रा (पूर्व), मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. श्री.ओमप्रकाश यादव | : | मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई |
| २. | मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई | : | शासकीय प्रतिनिधी |
| ३. | मा.सहसचिव, कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई | : | शासकीय प्रतिनिधी |
| ४. | मा.संचालक, (लेखा व कोषागारे), महाराष्ट्र राज्य, मुंबई | : | शासकीय प्रतिनिधी |
| ५. | श्रीम.वेदा धवल आगटे | : | मालक प्रतिनिधी |
| ६. | श्री.सतीश मगर | : | मालक प्रतिनिधी |
| ७. | श्री.अशोक गोविंदराव भुताड | : | कामगार प्रतिनिधी |
| ८. | श्री.श्रीपाद कुटासकर | : | कामगार प्रतिनिधी |
| ९. | श्री.विजय देवरुखकर | : | कामगार प्रतिनिधी |

बैठकीच्या सुरुवातीस श्रीम. निलांबरी भोसले, सहायक कामगार आयुक्त तथा सचिव या वैद्यकीय रजेवर असल्यामुळे प्रभारी सचिव श्री. चं.अं. राऊत, सहायक कामगार आयुक्त यांनी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे मा.अध्यक्ष, शासन प्रतिनिधी

अध्यक्ष यांनी असे प्रतिपादन केले की, असे केल्यास मंडळांतर्गत योजनांवरील खर्च आधीच कमी
आहे, तो पुन्हा कमी होईल. केंद्र शासनाने ५०% पर्यंत मर्यादा ठेवली आहे. तथापि, आपण १००%
पर्यंत रक्कम अदा करू शकतो त्यामुळे सदर योजना लागू करण्यासाठी मंडळाकडून १०० %
अनुदान देण्यात यावे व ज्यावेळी कामगारांची नोंदणी वाढेल त्यावेळी याबाबतीत फेरविचार करण्यात
येईल. यावर सर्व सदस्यांनी सहमती दर्शविली. मा.अध्यक्षांनीही याला मान्यता दिली. त्यानुसार
मंडळांतर्गत योजना राबविताना कामगारांचे आर्थिक योगदान न घेता संपूर्ण १०० % योगदान मंडळाने
करावे. असा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

**विषयक क्र. ३) मंडळातील नोंदित बांधकाम कामगारांना प्रधान मंत्री जीवन ज्योती विमा योजना लागू करणेबाबत.**

**विषय क्र. ४) मंडळातील नोंदित बांधकाम कामगारांना प्रधान मंत्री सुरक्षा विमा योजना लागू करणेबाबत.**

याबाबत मा. कामगार आयुक्त यांनी प्रधान मंत्री जीवन ज्योती विमा योजना व प्रधान मंत्री सुरक्षा विमा योजना या दोन्ही योजनांची थोडक्यात खालीलप्रमाणे माहिती दिली.

१. **प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना** - याबाबत मा.कामगार आयुक्त यांनी सांगितले की, या योजनेकरिता वयोमर्यादा १८ ते ५० वर्षे असून लाभार्थीचे बँकेत खाते असावे. रु.३३०/- प्रिमियम भरावा लागेल. लाभार्थिचा कोणत्याही कारणाने मृत्यू झाल्यास रु.२ लाखाचे विमा संरक्षण या योजने अंतर्गत देण्यात येईल. यावर श्री.कुटासकर यांनी असा प्रश्न उपस्थित केला की, मंडळाची देखिल रु.२ लाख मृत्यूलाभाची योजना आहे. तेव्हा या दोनपैकी एकाच योजनेचा लाभ अर्जदारास मिळेल काय ? यावर मा.कामगार आयुक्त यांनी असे प्रतिपादन केले की, मंडळामध्ये नोंदीत लाभार्थिंना या योजनेचा तसेच मंडळाच्या देखील योजनेचा लाभ घेता येईल.

२. **प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना** — याबाबत मा.कामगार आयुक्त यांनी सांगितले कि वयोमर्यादा १८ ते ७० वर्षे असून सहभागी बँकांमधील बचत खाते धारक लाभार्थि

रु.१२/- एवढा प्रिमियम भरावा लागतो. या योजने अंतर्गत लाभार्थ्याला खालीलप्रमाणे लो देय असतील.

फायदे : १. अपघाती मृत्यू झाल्यास रु.२ लाखाचे संरक्षण

२. दोन्ही डोळे अथवा दोन्ही पाय अथवा दोन्ही हात पूर्णपणे गमावल्यास अथवा एक डोळा व एक हात अथवा एक डोळा व एक पाय पूर्णपणे गमावल्यास रु.२ लाखाचे विमा संरक्षण.

३. एक डोळा अथवा एक हात अथवा एक पाय पूर्णपणे गमावल्यास रु.१ लाखाचे विमा संरक्षण.

मा. कामगार आयुक्त यांनी असे सांगितले की, मा.मुख्यमंत्री महोदय यांचे प्रधा सचिव, श्री.परदेशी साहेब यांच्याशी चर्चा झाली असता, त्यांनी या दोन्ही योजना कामगारांसाठी लाभदायी आहेत. या दोन्ही योजनांचा प्रिमियम कमीत कमी आहे. त्यामुळे या योजना तात्काळ लागू कराव्यात, असे सूचित केले आहे. त्यानुसार कामगारांची नोंदणी ज्याप्रमाणे होईल. त्यानुसार या योजनेचा लाभ त्या लाभार्थी कामगारांना देण्यात येईल. याबाबत सद्यस्थितीमध्ये नोंदित बांधकाम कामगार संख्या ४,२३,००० एवढी असून त्याचा खर्च खालीलप्रमाणे आहे.

३३० X ४,२३,००० =१३,९५,९०,०००/-

१२ X ४,२३,००० = ५०,७६,०००/-

-------------------------------------------

एकूण रू. १४,४६,६६,०००/-

(रू. चौदा कोटी सेहचाळीस लाख सहासष्ट हजार फक्त)

वरीलप्रमाणे दोन्ही योजनांची अंमलबजावणी करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

**विषय क्र. ५) मंडळातील नोंदित बांधकाम कामगारांना व त्यांच्या कुटुंबियांना कौशल्यवृध्दी योजना लागू करण्याबाबत विचारविनिमय करणे.**

**महाराष्ट्र शासन**

क्रमांक: इबांका-२०१६/०६/प्र.क्र.४/काम-७
उद्योग उर्जा व कामगार विभाग,
मादामा कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २७ जुलै, २०१६.

प्रति,

कामगार आयुक्त,
कामगार आयुक्त यांचे कार्यालय,
कामगार भवन, ई-ब्लॉक, सी-२०,
बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व),
मुंबई- ४०० ०५१.

विषय: इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदीत बांधकाम कामगारांना प्रधानमंत्री जीवन ज्योती बीमा योजना व प्रधानमंत्री सुरक्षा बीमा योजना लागू करण्याबाबत.

संदर्भ: कामगार आयुक्त तथा अध्यक्ष महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांचे पत्र क्र.का.आ./मइवइबाकमं/योजना/२०१५/६८६, दिनांक ५.५.२०१५.

महोदय,

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदीत बांधकाम कामगारांना प्रधानमंत्री जीवन ज्योती बीमा योजना व प्रधानमंत्री सुरक्षा बीमा योजना लागू करण्यास तसेच मंडळाच्या ठरावानुसार सदर योजनेकरिता विम्याच्या हप्त्याची पूर्ण रक्कम (१००%) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत भरण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही/अंमलबजावणी तातडीने करण्यात यावी, ही विनंती.

आपला,

(प्रशांत पु. राठोड)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत:माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित,

(१) सहायक कामगार आयुक्त तथा सचिव इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, कामगार आयुक्त कार्यालय, कामगार भवन, बांद्रा-कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१ यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव.
(२) निवडनस्ती (कामगार-७)

C:\Users\pa...\Desktop\PIMPLE\CR\2016\Note doc.Note

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या**
**दिनांक ०१.०३.२०१९ रोजी संपन्न झालेल्या ५० व्या बैठकीचे इतिवृत्त.**

मा. ना. श्री. संभाजी दिलीपराव पाटील निलंगेकर, मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिक कल्याण यांच्या प्रमुख उपस्थितीत व मा. श्री. ओमप्रकाश (मुन्ना) यादव, मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ५० वी बैठक शुक्रवारी दिनांक ०१.०३.२०१९ रोजी दुपारी २.३० वा. सह्याद्री अतिथिगृह, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व मंडळ सचिव उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. ना. श्री. संभाजी दिलीपराव पाटील निलंगेकर | मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिक कल्याण |
| २. | मा. श्री. ओमप्रकाश (मुन्ना) यादव | अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ |
| ३. | मा. श्री. राजेश कुमार, प्रधान सचिव | शासकीय प्रतिनिधी |
| ४. | मा. श्री. आर. आर. जाधव, कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य | शासकीय प्रतिनिधी |
| ४. | मा. श्री. शशांक साठे, उप सचिव | शासकीय प्रतिनिधी |
| ५. | मा. श्रीमती वेदा आगटे | मालक प्रतिनिधी |
| ६. | मा. श्री. विजय देवरुखकर | कामगार प्रतिनिधी |
| ७. | मा. श्री. श्री. चु. श्रीरंगम् | सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई. |

बैठकीच्या सुरुवातीस मंडळ सचिव यांनी मा. मंत्री महोदय, मा. अध्यक्ष, मा. प्रधान सचिव, मा. कामगार आयुक्त, मंडळ सदस्य व सर्व उपस्थितांचे स्वागत केले व बैठकीत चर्चा करावयाच्या विषयांशी संबंधित कागदपत्रांचा संच व मंडळाचे मा. अध्यक्ष यांनी मंजूरी दिलेल्या दिनांक २४.०१.२०१९ रोजीच्या मंडळाच्या ४९ व्या बैठकीच्या इतिवृत्ताची प्रत मंजूर ठरावानुसार केलेल्या कार्यवाहीच्या अहवालासह सर्व उपस्थित सदस्यांना वाटप करण्यात आला.

तद्नंतर विषयसूचीनुसार चर्चेस सुरुवात करण्यात आली.

**विषय क्र. ०४:- मंडळातील नोंदित बांधकाम कामगारांना प्रधानमंत्री श्रम योगी मानधन (PM-SYM) योजना लागु करण्याबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, मा. प्रधान सचिव यांचे प.क्र: असंका-२०१९/प्र. क्र.२८/काम-७अ दि. २६.०२.२०१९ अन्वये प्रधानमंत्री श्रम योगी मानधन (PM-SYM) योजना लागु करुन या योजनेमध्ये जास्तीत जास्त कामगारांची नोंदणी करुन योजनेचा लाभ देणेबाबत खालीलप्रमाणे सुचना प्राप्त झालेल्या आहेत.

केंद्र शासनाने असंघटित कामगारांसाठी सामाजिक सुरक्षितता पुरविण्याच्या उद्देशाने दिनांक ३१.१२.२००८ रोजी असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा अधिनियम २००८ पारित केलेला आहे. त्या अनुषंगाने विविध व्यवसाय गट जसे कि बांधकाम कामगार, माथाडी कामगार, सुरक्षा रक्षक, घरेलु कामगार, फेरीवाले, शेतमजुर, गृहउद्योगातील कामगार, माथाडी कामगार, बिडी कामगार, यंत्रमाग कामगार, आशा वर्कर, आंगणवाडी सेविका यासारख्या विविध १२७ व्यवसाय गटातील असंघटीत कामगारांना सामाजिक सुरक्षितता पुरविण्याच्या उद्देशाने प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजना लागु करण्याबाबतचा निर्णय केंद्र शासनाने घेतला आहे दि. १५.०२.२०१९ पासुन नोंदणी शुभारंभ करण्यात आला आहे. योजनेस दि. १५.०२.२०१९ पासुन सुरुवात करण्यात आली आहे.

शासनाच्या उपरोक्त पत्रान्वये प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी कार्यप्रणालीचे विवरण पत्र सोबतच्या प्रपत्र -१ नुसार कळविण्यात आलेले आहेत.

प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजनेबाबतची माहिती पुढीलप्रमाणे कळविण्यात आलेली आहे:

अ) **लाभार्थी पात्रता :-**

- असंघटीत क्षेत्रामध्ये काम करणारा वय वर्ष १८ ते ४० दरम्यानचा कामगार
- मासिक उत्पन्न १५०००/- रु. पेक्षा कमी
- कर्मचारी राज्य बिमा निगम, भविष्य निर्वाह निधी अथवा राष्ट्रीय पेन्शन योजनेचा सभासद नसावा

ब) **आवश्यक कागद पत्रे :-**

- आधार कार्ड
- बँक पासबुक (राष्ट्रीय कृत बँक अथवा IFSC कोड असलेली इतर कोणतीही बँक)

- भ्रमणध्वनी (OTP करीता स्वत:चा अथवा कुटुंबातील अन्य व्यक्तीचा)

क) **योजनेचा लाभ :-**

- वय वर्ष ६० पूर्ण केल्यानंतर दरमहा रु. ३०००/-मानधन
- लाभार्थी कामगारांचा मृत्यू झाल्यास त्याच्या वैवाहिक जोडीदारास योजना सुरु ठेवता येणार
- लाभार्थीस स्वेच्छेने योजनेतून बाहेर पडावयाचे झाल्यास जमा केलेल्या अंशदानासह व्याजाची रक्कम परत मिळणार.

केंद्र शासनाचे कामगार व रोजगार मंत्रालयाने दिलेल्या निर्देशानुसार प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजनेत नोंदणोची कार्यपध्दती खालीलप्रमाणे आहे.

१. योजनेमध्ये असंघटीत क्षेत्रामध्ये काम करणारा वय वर्ष १८ ते ४० दरम्यानचा कामगार, मासिक उत्पन्न १५०००/- रु. पेक्षा कमी असणारा व कर्मचारी राज्य बिमा निगम, भविष्य निर्वाह निधी अथवा राष्ट्रीय पेन्शन योजनेचा सभासद नसणारा कामगार पात्र आहेत.

२. १८ ते ४० वयोगटातील लाभार्थीने रु.५५ ते २००/- पर्यंत प्रतिमाह (वयाची ६० वर्ष पूर्ण होईपर्यंत)अंशदान जमा केल्यानंतर लाभार्थीस वयाची ६० वर्ष पुर्ण केल्यानंतर दरमहा किमान ३०००/- रुपये निवृत्तीवेतन देय राहिल.

३. योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी लाभार्थीस नजिकच्या नागरी सुविधा केंद्रास (Common Service Centres) भेट दयावी लागेल.

४. लाभार्थीस नागरी सुविधा केंद्रामध्ये गेल्यानंतर योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी खालील कागदपत्रे उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

   क) आधार कार्ड

   ख) बॅक पासबुक ( राष्ट्रीय कृत बॅक अथवा IFSC कोड असलेली इतर कोणतीही बॅक)

   ग) भ्रमणध्वनी ( OTP करीता स्वत:चा अथवा कुटुंबातील अन्य व्यक्तीचा )

   घ) पहिले मासिक अंशदान(वयानुसार, रोख स्वरुपाने)

५. नागरी सुविधा केंद्रामार्फत बॅंक खात्याचा तपशील, ई-मेल आयडी, वारसदार (पती-पत्नी) व भ्रमणध्वणी क्रमांक याबाबतचा तपशील अद्यावत केला जाईल.

६. लाभार्थीच्या वयानुसार अंशदानाची रक्कमेची गणना ऑनलाईन सिस्टीमद्वारे करण्यात येईल. योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी, पात्र लाभार्थीच्या वयानुसार, पहिल्या मासिक अंशदानाची रक्कम रोखीने अदा करावी लागेल (प्रधानमंत्री श्रम योगी मानधन योजना वय

निहाय मासिक वर्गणीचा तक्ता दर्शविणारे प्रपत्र — २ सोबत जोडले आहे). अंशदानाची रक्कम भरणा केल्याची पावती संबंधीत नागरी सुविधा केंद्राकडून लाभार्थीस देण्यात येईल.

७. दुस-या मासिक अंशदानापासून लाभार्थीचे अंशदानाची रक्कम लाभार्थीचे बँक खात्यातुन परस्पर कपात (auto-debit) करण्यात येईल.

८. लाभार्थीने योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी योजनेच्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबत स्वाक्षरी केलेले स्वंयघोषणा पत्र व छापील सहमती पत्र, स्कॅन करण्यात येऊन सिस्टीमवर अपलोड करण्यात येईल.

९. पहिले मासिक अंशदान जमा केल्यानंतर प्रधान मंत्री श्रम योगी मानधन योजनेंतर्गत LIC द्वारे पेन्शन खाते क्रमांक जारी करण्यात येईल.

१०. नोंदणीची प्रकिया पुर्ण झाल्यानंतर लाभार्थीस प्रधानमंत्री श्रम योगी मानधन कार्ड व स्वाक्षरी केलेले स्वंयघोषणा पत्र देण्यात येईल.

११. प्रधानमंत्री श्रम योगी मानधन योजना खाते सुरू झाल्यानंतर लाभार्थीस लाभार्थीचे बँक खात्यातुन परस्पर कपात केलेल्या अंशदानाची माहीती एसएमएस द्वारे देण्यात येईल.

१२. योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी लाभार्थीस इतर कोणतेही शुल्क नागरी सुविधा केंद्रास अदा करावे लागणार नाही. त्याबाबतचे शुल्क नागरी सुविधा केंद्रास केंद्र शासनाकडून परस्पर अदा करण्यात येईल.

- केंद्र शासनच्या कामगार विभागामार्फत ३१ मार्च २०१९ अखेर दोन कोटी लाभार्थीचा योजनेमध्ये सहभागी करण्याचा लक्षांक ठेवण्यात आलेला असल्याने महाराष्ट्र राज्यामध्ये ३१ मार्च २०१९ अखेर, राज्यात असणारे सुमारे ४६००० नागरी सुविधा केंद्राकडून प्रत्येकी किमान १०० या प्रमाणे, लाभार्थींची नोंदणी करणे आवश्यक आहे.
- मंडळाच्या अध्यक्षांनी कामगारांच्या संघटनांबरोबर व कामगारांसोबत बैठकीचे आयोजन करुन मार्गदर्शन करण्यात यावे. आपल्या अधिनस्थ कामगारांना योजनेबाबत माहिती देण्यात यावी व जास्तीत जास्त कामगारांनी सदरचे योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी व्यापक स्तरावर, स्थानिक लोकप्रतिनिधींना सहभागी करुन, जनजागृती करण्यात यावी.
- प्रधान मंत्री श्रमयोगी मानधन योजनेबाबत दि. २६ फेब्रुवारी, २०१९ रोजी मा. कॅबिनेट सेक्रेटरी/केंद्र शासन यांनी आयोजित केलेल्या व्हिडिओ कॉन्फरन्समध्ये उपरोक्त निर्देश दिले आहेत की, राज्यांच्या मुख्य सचिवांनी सर्व विभागांच्या अधिका-यांना सदर योजनेत

अधिकाअधिक नोंदणी करण्याबाबत अवगत करावे तसेच सदर मंडळाद्वारे आपल्या मंडळातील नोंदित कामगारांचे प्रथम वर्षाचे अंशदान भरण्यात यावे असे निर्देश प्राप्त झालेले आहेत.

मा. प्रधान सचिव कामगार विभाग यांच्या दि.२६.०२.२०१९ रोजीच्या पत्रातील उपरोक्त निर्देश विचारात घेता महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदित बांधकाम कामगारांना प्रधान मंत्री श्रम योगी मानधन योजना लागु करण्याबाबत खालीलप्रमाणे प्रस्ताव मंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

१. मंडळाकडील नोंदित सक्रीय (जीवित) बांधकाम कामगारांपैकी १८ ते ४० या वयोगटातील व उपरोक्त लाभार्थी पात्रता धारण करणाऱ्या बांधकाम कामगारांना सदर योजना लागु करण्यास मान्यता प्रदान करावी.
२. मंडळाकडील नोंदित सक्रीय (जीवित) बांधकाम कामगारांपैकी १८ ते ४० वयोगटातील लाभार्थ्याने भरावयाची रु.५५/- ते २००/- पर्यंत प्रति महा (वयाची ६० वर्षे पुर्ण होईपर्यंत) भरावयाच्या अंशदानाच्या रक्कमेपैकी प्रथम १ वर्षाची अंशदान मंडळाकडुन भरण्यात यावी व तद्नंतर लाभार्थ्याच्या बॅंक खात्यातून अंशदानाची रक्कम परस्पर कपात करण्यात यावी.
३. ०१ वर्षानंतर लाभार्थ्याच्या बॅंक खात्यातू दरमहा परस्पर अदा केलेल्या अंशदानाच्या रक्कमेचा परतावा (Reimursement) मंडळाकडून करण्यात यावी.
४. सदर योजनेचा लाभ जास्तीत जास्त कामगारांनी घ्यावा, योजनेमध्ये सहभागी व्हावे याकरिता व्यापक स्तरावर, स्थानिक लोकप्रतिनिधींना सहभागी करून जनजागृती करण्यास व त्यावरील खर्चास मंडळाची मान्यता प्रदान करावी.

सदर प्रस्तावावर चर्चा करताना मा. प्रधान सचिव, कामगार विभाग यांनी सूचित केले की, मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांपैकी १८ ते ४० या वयोगटातील पात्र लाभार्थ्यांना सदर योजना लागू करण्यात यावी. पात्र बांधकाम कामगाराने भरावयाच्या अंशदानाच्या रक्कमेपैकी ०१ वर्षाचा अंशदान मंडळाकडून अदा करण्यात यावे. सदर अंशदानाची रक्कम नागरी सुविधा केंद्रामार्फत अदा करण्यात यावी. सदर योजनेची माहिती नोंदीत बांधकाम कामगारांपर्यंत पोहचण्यासाठी पुरेशी प्रसिध्दी देण्यात यावी यास सर्व उपस्थितांनी सहमती दर्शवली व त्यानुसार खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव ५०(४)/२०१९ :- मंडळातील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांपैकी पात्र बांधकाम कामगारांना प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन (PM-SYM) योजना लागू करण्यात यावी. बांधकाम कामगाराने भरावयाच्या अंशदानाच्या रक्कमेपैकी प्रथम ०१ वर्षाचे अंशदान मंडळाने नागरी सुविधा केंद्रामार्फत अदा करावे. सदर योजनेची माहिती सर्व बांधकाम कामगारांपर्यंत पोहचण्याकरीता आवश्यक प्रसिध्दी देण्यात यावी. याबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा व शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी. असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

## महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या
## दिनांक २४.०१.२०१९ रोजी संपन्न झालेल्या ४९ व्या बैठकीचे इतिवृत्त.

मा. ना. श्री. संभाजी दिलीपराव पाटील निलंगेकर, मा. मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिक कल्याण यांच्या प्रमुख उपस्थितीत व मा. श्री. ओमप्रकाश (मुन्ना) यादव, मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ४९ वी बैठक गुरूवार दिनांक २४.०१.२०१९ रोजी सकाळी ११.३० वा. कामगार आयुक्त, यांचे कार्यालय, वांद्रा पूर्व येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व मंडळ सचिव उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. ना. श्री. संभाजी दिलीपराव पाटील निलंगेकर | मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिक कल्याण |
| २. | श्री. ओमप्रकाश (मुन्ना) यादव | अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ |
| ३. | मा. श्री. राजेश कुमार, प्रधान सचिव | शासकीय प्रतिनिधी |
| ३. | मा. श्री. शशांक साठे, उप सचिव | शासकीय प्रतिनिधी |
| ४. | मा. श्रीमती वंदा आगटे | मालक प्रतिनिधी |
| ५. | मा. श्री. श्रीपाद कुटासकर | कामगार प्रतिनिधी |
| ६. | मा. श्री. विजय देवरुखकर | कामगार प्रतिनिधी |
| ७. | मा. श्री. अशोक भुताड | कामगार प्रतिनिधी |
| ८. | मा. श्री. धनंजय माळी | संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष (निमंत्रित) |
| ९. | मा. श्री. श्री. चु. श्रीरंगम् | सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई. |

बैठकीच्या सुरुवातीस मंडळ सचिव यांनी मा. मंत्री महोदय, मा. अध्यक्ष, मंडळ सदस्य व सर्व उपस्थितांचे स्वागत केले व बैठकीत चर्चा करावयाच्या विषयांशी संबंधित कागदपत्रांचा संच व मंडळाचे मा. अध्यक्ष यांनी मंजूरी दिलेल्या दिनांक ३०.१०.२०१८ रोजीच्या मंडळाच्या बैठकीच्या इतिवृत्ताची प्रत मंजूर ठरावानुसार केलेल्या कार्यवाहीच्या अहवालासह सर्व उपस्थित सदस्यांना सादर करण्यात आली.

तदनंतर विषयसूचीनुसार चर्चेस सुरुवात करण्यात आली.

महाराष्ट्र शासन

क्रमांक: इवांका-२०१८/प्र.क्र.१७/काम-७,
उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
दिनांक : १६ फेब्रुवारी, २०१९

प्रति,

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ,
कामगार भवन, ई-ब्लॉक, सी-२०, वांद्रा-कुर्ला संकुल,
बांद्रा (पूर्व), मुंबई-४०० ०५१.

विषय :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत जिवीत (सक्रिय) बांधकाम कामगारांची आरोग्य तपासणी करण्याबाबत.

संदर्भ :-१) आपले पत्र क्र. मइवइबांकमं/आरोग्य तपासणी/१८/२०१९, दि. ०६ फेब्रुवारी, २०१९
२) आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे कार्यालयीन ज्ञापन क्र. S110011/12/2009-CGHS D.II/Hospital Cell(Part I), दि.२८ ऑगस्ट,२०११

महोदय,

उपरोक्त विषयावरील संदर्भाधीन दिनांक ०६ फेब्रुवारी,२०१९ रोजीचे पत्र कृपया पहावे.

२. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामध्ये नोंदीत जिवीत (सक्रिय) बांधकाम कामारांना विविध आजारांना सामोरे जावे लागते. बांधकाम कामगारांची आर्थिकस्थिती अत्यंत कमकुवत असल्याने, औषधोपचार वेळीच घेतले जात नाहीत. परिणामी, काही आजार गंभीर स्वरुप धारण करतात. याकरीता बांधकाम कामगारांची वेळीच आरोग्य तपासणी होणे आवश्यक आहे.

३. दिनांक ०६ फेब्रुवारी, २०१९ च्या पत्रांन्वये दिलेल्या प्रस्तावा प्रमाणे मंडळामध्ये नोंदीत जिवीत (सक्रिय) बांधकाम कामगारांची प्रति कामगार रु.१९५०/- या दराने आरोग्य तपासणी मे.एमएचएल लाईफ केअर लिमिटेड या संस्थेमार्फत करण्यास शासन मान्यता देत आहे. याबाबत असेही स्पष्ट करण्यात येते की, मे.एमएचएल लाईफ केअर लिमिटेड या संस्थेमार्फत Pre Camp, Health Camp व Post Camp Services करीता कोणतेही अतिरिक्त शुल्क आकारले जाणार नाही. तसेच, Lung Function Test ही तपासणी निशुल्क करण्यात यावी.

D:\Sathe-D.S\Labour-७\२०१९\C.R.१७\Letter.docx

४. ज्या तपासण्या सध्या एनएबीएल मान्यता नसलेल्या प्रयोगशाळेतून करण्यात येत आहेत, त्या प्रयोगशाळांनी एनएबीएलची मान्यता घेतल्यास, संबंधित तपासणीसाठी वाढीव शुल्क आकारता येणार नाही.सदर कराराची मुदत दोन वर्षांची राहिल.

आपला,

(श.मा.साठे)

उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत:- कामगार आयुक्त, कामगार आयुक्त कार्यालय, कामगार भवन, ई-ब्लॉक, सी-२०, बांद्रा-कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व), मुंबई-४०० ०५१.

निवड नस्ती- कामगार-७

**विषय क्र.०३ :- एचएलएल लाईफ केयअर लिमिटेड (केंद्र शासनाचा सार्वजनिक उपक्रम) मार्फत नोंदीत बांधकाम कामगारांची आरोग्य तपासणी करणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिवांनी सादर केले की, इमारत व इतर बांधकामाच्या ठिकाणी काम करणाऱ्या बांधकाम कामगारांना त्यांच्या कामाच्या स्वरूपानुसार विविध आजारांना सामोरे जावे लागते. बांधकाम कामगारांचे आर्थिक स्थिती अत्यंत कमकुवत असल्याने आजारावरील औषधोपचार वेळीच घेतले जात नाहीत. परिणामी, काही आजार गंभीर स्वरूप धारण करतात असे निदर्शनास आले आहे.

मंडळामार्फत नोंदीत बांधकाम कामगारांकरीता सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दि.०२.०६.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेचा लाभ ओळखपत्राच्या आधारे देण्यात येत आहे. तथापि, काही बांधकाम कामगारांना सदर योजनेबाबत व उपचाराबाबतच्या पध्दतीची सविस्तर माहिती नसल्यामुळे बांधकाम कामगार सदर योजनेचा लाभ घेऊ शकले नाही असे निदर्शनास आले. यास्तव बांधकामाच्या ठिकाणी काम करत असलेल्या कामगारांची नियमित आरोग्य तपासणी करून ज्या बांधकाम कामगारांना आजार असल्याचे निदर्शनास आल्यास सदर बांधकाम कामगारांना महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत उपचार करणे प्रस्तावित आहे. बांधकाम कामगारांच्या आरोग्याची तपासणी वेळीच होऊन निदर्शनास आलेल्या आजारावर वेळीच उपचार केल्यास बांधकाम कामगारांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर स्वरूप धारण करणार नाही. या उद्देशाने बांधकाम कामगारांकरीता बांधकामाच्या ठिकाणी त्यांच्या आरोग्य तपासणी करणे या विषयाबाबत मंडळाच्या दि.०३.०१.२०१८ रोजीच्या बैठकीत चर्चा करून खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आलेला आहे.

**ठराव:** नोंदित बांधकाम कामगारांची आरोग्य तपासणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे. मंडळामार्फत कॅम्प आयोजित करून सदर कॅम्पमध्ये आरोग्य तपासणी करण्यात यावी. आरोग्य तपासणीत आढळून येणाऱ्या गंभीर आजाराबाबत करावयाची उपाययोजना बाबतचा आराखडा तयार करावा. आरोग्य तपासणीकरीता त्या क्षेत्रातील अनुभवी संस्थेची नेमणूक करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात यावी. सदर योजना मंजूरीचा प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.

मंडळाच्या उपरोक्त ठरावाला अनुसरून या क्षेत्रातील काम करणाऱ्या मे.क्लिनिक ऑन पॉईंट प्रा.लि. पुणे या संस्थेकडून बांधकाम कामगारांसाठी आरोग्य तपासणी करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला.

सदर प्रस्तावातील नमूद मुद्यांच्या अनुषंगाने बांधकाम कामगारांसाठी आरोग्य तपासणी करण्याबाबतच्या योजनेचे सादरीकरण मे. क्लिनिक ऑन साईट प्रा.लि. पुणे यांचेमार्फत दिनांक

२१.०३.२०१८ रोजी च्या बैठकीत करण्यात आले. सदर सादरीकरणानंतर सविस्तर चर्चा होवून खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

ठराव: नोंदित बांधकाम कामगारांची आरोग्य तपासणी करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. सदर आरोग्य तपासणी पथकामध्ये समाविष्ट डॉक्टर संख्या, त्यांचेकडे उपलब्ध तपासणीचे साहित्य,औषधे,तपासणीस लागणारा वेळ, तपासणीचे घटक त्यानुसार कोणत्या आजाराचे निदान होवू शकेल याबाबतचा सविस्तर प्रस्ताव तयार करावा. बांधकाम कामगारांच्या कामाच्या स्वरुपास अनुसरुन निदर्शनास येणाऱ्या आजारांचा प्राधान्याने आरोग्य तपासणीत समावेश करण्यात यावा. सदर योजना प्रथम तीन महिने प्रायोगिक तत्वावर एका जिल्ह्यात राबविण्यातयावीत. तद्नंतर आरोग्य तपासणी योजना राज्यातील इतर जिल्हयात राबविण्यात यावी. असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.

उपरोक्त ठरावाच्या अनुषंगाने मे. क्लिनिक ऑन साईट प्रा.लि..पुणेया संस्थेने सुधारित प्रस्ताव मंडळास सादर केला व मे. क्लिनिक ऑन साईट प्रा.लि..पुणे या संस्थेच्या प्रतिनिधींनी आरोग्य तपासणीबाबत मंडळाच्या दि. २२.०५.२०१८ रोजीच्या बैठकीत सादरीकरण केले. सदर सादरीकरणाअंती मा. कामगार प्रतिनिधी श्री. कुडाळकर यांनी एकाच वेळी महाराष्ट्रात किती ठिकाणी आरोग्य शिबिरे आयोजित करु शकता अशी विचारणा केली. मे. क्लिनिक ऑन साईट प्रा.लि..पुणे या संस्थेच्या प्रतिनिधींनी त्यांच्याकडे सध्या १० टीम तयार असल्याचे सांगितले.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

४६(१२)/२०१८ ठराव: नोंदित बांधकाम कामगारांची आरोग्य तपासणीबाबत मे. क्लिनिक ऑन साईट प्रा.लि. पुणेया संस्थेने केलेल्या सादरीकरणाच्या प्रस्तावास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. सदर योजनेचे RFP Document e-Gov Consultant मे. केपीएमजी यांच्याकडून करुन घेण्यात यावे व योजना मंजूरीचा प्रस्ताव व RFP Document शासन मान्यतेस सादर करण्यात यावेत, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.

सदस्यांच्या कालावधीत मे. एचएलएल लाईफ केअर लिमिटेड या संस्थेने मंडळाकडील नोंदीत बांधकाम कामगारांकरीता आरोग्य तपासणीकरीता दि.१६.०१.२०१९ रोजी मंडळ कार्यालयास प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर प्रस्तावातील ठळक बाबी खालीलप्रमाणे :-

१. मे. एचएलएल लाईफ केअर लिमिटेड ही संस्था केंद्र शासनाच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण अंतर्गत केंद्र शासनाचे एंटरप्राईज आहे.
२. महाराष्ट्रामध्ये मे. एचएलएल लाईफ केअर लिमिटेड या संस्थेच्या सर्व सोयी सुविधायुक्त १६ प्रयोगशाळा "HINDLABS" या नावाने कार्यरत आहे. (प्रत्येक जिल्ह्यात ०३ ते ०४)

३. सदर संस्थेच्या २३ प्रयोगशाळेमार्फत महाराष्ट्र राज्यातील आरोग्य विभागांतर्गत २३०१ ग्रामीण व शहरी भागातील आरोग्य संस्थांमधील रुग्णांना आरोग्य तपासणीची सेवा पुरविण्यात येत आहे.

४. सदर संस्थेकडे आरोग्य तपासणी करीता आवश्यक डॉक्टर, पॅरामेडिकल स्टाफ व हेल्थ वर्कर्सची स्वतंत्र टीम उपलब्ध आहे.

५. मंडळाकडील नोंदीत बांधकाम कामगारांची कामाच्या ठिकाणी किंवा जवळच्या शासकीय आरोग्य संस्थेमध्ये तपासणी करणे प्रस्तावित आहे.

6. सर्व साधारण कामगारांकरीता खालीलप्रमाणे आरोग्य तपासणी प्रस्तावित आहे.

1. Physical Examination (Head to Bottom)
2. CBC
3. Blood Sugar
4. Liver Function Test
5. Renal Function Test
6. Lipid Profile
7. Malaria Parasite
8. ESR
9. Urine Test
10. Occupational History
11. Social History
12. Family History
13. Lung Function Test
14. Audio Screening Test
15. Vision Screening
16. Snellen General Employees
17. Fit for employment Certificates
18. Individual Reports
19. Excutive Company Reports
20. Baseline Medicals-2 X Audio Test
21. General medicals is done by- Occupational Health Nurse
22. Medicals is reviewed by- Occupational health Practitioner

७. संस्थेने आरोग्य तपासणी फी संदर्भात सादर केलेला प्रस्ताव खालीलप्रमाणे आहे.

| Category | Package | Cost/Individual + Taxes |
|---|---|---|
| 1. | General workers- Employees working on the ground not higher than 1.5 | Rs.1500/- |
| 2. | Working on Heights Medical Examination- | Rs 1500/ |

| | | |
|---|---|---|
| | Employees working higher than 1.5 m | |
| 3. | Drivers, Operators and PDP Medicals | Rs. 1500/- |

मे. एचएलएल लाईफ केअर लिमिटेड या संस्थेची महाराष्ट्र राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत कार्यरत रूग्णालयातील रूग्णांची आरोग्य तपासणी करण्याकरीता नेमणूक करण्यात आली आहे. सदर संस्थेचे १३ ठिकाणी प्रयोगशाळा कार्यरत आहेत. २३०१ आरोग्य संस्थातील रूग्णांची तपासणी करण्यात येत आहे. संस्थेकडे आरोग्य तपासणीबाबतची अद्ययावत संगणक प्रणाली उपलब्ध आहे. सदर प्रणालीद्वारे तपासणीचा अहवाल ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध करण्याची सुविधा संस्थेकडे उपलब्ध आहे. उपरोक्त प्रस्तावासंदर्भात संस्थेच्या प्रतिनिधीमार्फत प्रस्तावाचे सादरीकरण करण्यात आले.

सदर सादरीकरणानंतर चर्चेत सहभागी होताना मा. अध्यक्ष यांनी सुचित केले की, आरोग्याची तपासणी बाबतचा प्रस्ताव योग्य आहे. तथापि, सदर तपासणी बांधकाम कामगार आजारी असल्याचे निदर्शनास आल्यास त्या बांधकाम कामगारांवर उपचार होणे आवश्यक आहे. या संदर्भात मा. प्रधान सचिव यांनी मत व्यक्त केले की, आरोग्य तपासणी व आजारावरील उपचार या दोन्ही भिन्न बाबी आहेत. बांधकाम कामगारांच्या आजारावरील उपचाराकरीता मंडळामार्फत महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजना लागू करण्यात आलेली आहे. सदर चर्चेत सहभागी होताना मा. मंत्री महोदय, कामगार विभाग यांनी निर्देश दिले की, आरोग्य तपासणी करीता नेमलेल्याच्या संस्थेने आरोग्य तपासणीत जे बांधकाम कामगार आजारी असल्याचे निदर्शनास येईल अशा बांधकाम कामगारांना महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत उपचाराकरीता जवळच्या रूग्णालयात भरती करावे व सदर योजनेंतर्गत नियुक्त आरोग्य मित्र यांचेमार्फत सदर बांधकाम कामगारांना संपूर्ण उपचार होऊन तो बरा होईल तोपर्यंत पाठपुरावा करावा. या संदर्भात मे. एचएलएल लाईफकेअर लिमिटेड या संस्थेकडून सुधारित प्रस्ताव प्राप्त करावा.

सदर विषयावर सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव क्र. ४२(३)/२०१२: नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांच्या आरोग्य तपासणीकरीता मे. एचएलएल लाईफकेअर लि. यांनी प्रस्तावित केलेल्या आरोग्य तपासणीच्या कार्यवाही शिवाय सदर संस्थेने बांधकामाच्या ठिकाणी कॅम्प आयोजित करून नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांची आरोग्य तपासणी करावी. बांधकामाच्या ठिकाणी आयोजित कॅम्पमध्ये उपस्थित ज्या बांधकाम कामगारांची नोंदणी झालेली नाही त्या बांधकाम कामगारांचे

नोंदणीकरीता आवश्यक कार्यवाही करावी. सदर आरोग्य तपासणीत जे बांधकाम कामगार आजारी असल्याचे निदर्शनास येतील अशा बांधकाम कामगारांना महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेतर्गत नियुक्त केलेल्या आरोग्य मित्रा मार्फत जवळच्या रुग्णालयात भरती करून त्यांच्यावर उपचार करण्यासाठी आवश्यक पाठपुरावा करण्याची जबाबदारी नियुक्त संस्थेवर सोपविण्यात यावी. याबाबतची कार्यवाही, आरोग्य तपासणीच्या अतिरिक्त बाबी, कॅम्पपूर्व व कॅम्पनंतरची कार्यवाही त्यानुसार आरोग्य तपासणीचे दर याबाबतचा सुधारित प्रस्ताव मे. एचएलएल लाईफकेअर लि.या संस्थेकडून मागविण्यात यावा, सदर प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा व त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

| | |
|---|---|
| सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी<br>महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार<br>कल्याणकारी मंडळ, मुंबई | अध्यक्ष<br>महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार<br>कल्याणकारी मंडळ, मुंबई |

कामगार आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.

**विषय : महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक २८.०२.२०१७ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्तांत.**

मा. मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिक यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची दिनांक २८.०२.२०१७ रोजी दुपारी ०२.०० वा. सह्याद्री अतिथीगृह, मलबार हील, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. ना. श्री. संभाजी पाटील निलंगेकर | मा. मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिक कल्याण. |
| २. | श्री. ओमप्रकाश (मुन्ना) यादव | मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ. |
| ३. | श्री. यशवंत केरुरे | मा. कामगार आयुक्त (शासकीय प्रतिनिधी) |
| ४. | श्री. स.अ.मु. नकवी | मा. संचालक व लेखा कोषागारे |
| ५. | श्रीमती श्वेता सिंघल | मा.उपसचिव (कामगार) |
| ५. | श्रीमती वेदा आगटे | मालक प्रतिनिधी |
| ६. | श्री. सतीश मगर | मालक प्रतिनिधी |
| ७. | श्री. अशोक भुताड | कामगार प्रतिनिधी |
| ८. | श्री. श्रीपाद कुटासकर | कामगार प्रतिनिधी |
| ९. | श्री. विजय दवरुखकर | कामगार प्रतिनिधी |

| | | |
|---|---|---|
| | | होताच बदलणे आवश्यक असते. ती जबाबदारी कोण घेणार असा मुद्दा उपस्थित केला. याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br><br>**ठराव: नोंदित बांधकाम कामगारांना Primary Health Kit बाबतचा प्रस्ताव सध्या स्थगित ठेवण्यात यावा, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |
| ११. | **बांधकाम कामगारांसाठी मध्यान्ह भोजन योजना राबविणेबाबत.** | सदर मुद्याबाबत बोलताना मंडळाच्या सचिव यांनी सर्व उपस्थितांच्या निर्देशनास आणुन दिले की, उत्तर प्रदेशात उत्तर प्रदेश इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ व रेल्वे कॅन्टीन व्यवस्थापन यांच्या संयुक्त विद्यमाने बांधकाम कामगारांसाठी बांधकामाच्या ठिकाणी मध्यान्ह भोजन पुरविण्याची योजना राबवत असल्याचे समजते. तथापि, याबाबत अधिनियमामध्ये तरतुद आढळुन येत नाही अथवा तशा कोणत्याही सूचना केंद्र शासन वा राज्य शासन यांचे मार्फत प्राप्त झालेल्या नाहीत.<br><br>"बांधकाम कामगारांसाठी मध्यान्ह भोजन योजना राबविणेबाबत" ही योजना चांगली आहे असे मा. मंत्री महोदय यांनी नमूद केले. मा. अध्यक्ष यांनी सर्व नामांकित संस्थांकडून प्रस्ताव मागवून योग्य त्या संस्थेची निवड करण्याचे सुचविले. त्यावर मालक प्रतिनिधी श्रीमती वेदा आगटे यांनी सदर योजनेसाठी बचत गट नेमण्यात यावे, असे |

| | | |
|---|---|---|
| | | सुचविले.<br>त्यावर मा. मंत्री महोदय यांनी सदर योजनेसाठी प्रथम शासनमान्य आय.टी कंसल्टंट KPMG यांची नियुक्ती करावी व Consultant मार्फत ई-निविदा प्रसिध्द करुन सदर क्षेत्रात काम करणाऱ्या बचत गटांना/संस्थांना नियुक्त करण्यात यावे, असे निदेश दिले.<br>याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br>**ठराव: बांधकाम कामगारांसाठी मध्यान्ह भोजन योजनेसाठी प्रथम शासनमान्य आय.टी कंसल्टंट KPMG यांची नियुक्ती करावी व Consultant मार्फत ई-निविदा प्रसिध्द करुन सदर क्षेत्रात काम करणाऱ्या बचत गटांना/संस्थांना नियुक्त करण्यात यावे, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |
| १२. | **केंद्र शासनाने अधिनियमाच्या कलम ६० अन्वये दिलेल्या निदेशाबाबत ठराव घेणे. मंडळातील नोंदीत बांधकाम** | याबाबत बोलताना मंडळाच्या सचिव यांनी असे स्पष्ट केले की, केंद्र शासनाच्या दि.०९.०९.२०१५ रोजीच्या आदेशान्वये मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना अटल पेन्शन योजना लागू करण्याबाबत आदेशीत केलेले आहे. त्यानुसार सदर योजनेअंतर्गत |

कामगार आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.

**विषय : महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक २८.०२.२०१७ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्तांत.**

मा. मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिक यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची दिनांक २८.०२.२०१७ रोजी दुपारी ०२.०० वा. सह्याद्री अतिथीगृह, मलबार हील, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. ना. श्री. संभाजी पाटील निलंगेकर | मा. मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिक कल्याण. |
| २. | श्री. ओमप्रकाश (मुन्ना) यादव | मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ. |
| ३. | श्री. यशवंत केरुरे | मा. कामगार आयुक्त (शासकीय प्रतिनिधी) |
| ४. | श्री. स.अ.मु. नकवी | मा. संचालक व लेखा कोषागारे |
| ५. | श्रीमती श्वेता सिंघल | मा.उपसचिव (कामगार) |
| ५. | श्रीमती वेदा आगटे | मालक प्रतिनिधी |
| ६. | श्री. सतीश मगर | मालक प्रतिनिधी |
| ७. | श्री. अशोक भुताड | कामगार प्रतिनिधी |
| ८. | श्री. श्रीपाद कुटासकर | कामगार प्रतिनिधी |
| ९. | श्री. विजय दवरुखकर | कामगार प्रतिनिधी |

| | | |
|---|---|---|
| | | केले.<br><br>याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br><br>**ठराव: मंडळांतर्गत कामकाजाचे एकात्मिक संगणकीय प्रणाली बाह्ययंत्रणेमार्फत तयार करुन घेणेबाबत तयार करण्यात आलेले RFP Document व ई-निविदा रद्द करण्यात यावी. मंडळामार्फत नियुक्त करण्यात आलेले IT Consultant मे. अर्न्स्ट ॲन्ड यंग एल पी पी यांची नियुक्ती रद्द करण्यात यावी. त्याऐवजी KPMGया IT Consultant ची नियुक्ती करण्यात यावी व त्यांचेकडून सदर कामाचे नव्याने RFP Document तयार करून घेण्यात यावे. नव्याने तयार करण्यात आलेल्या RFP Document मंडळाचे बैठकीसमोर ठेवून त्यावर चर्चा करून त्यास मंडळाची मान्यता घेवून पुन्हा मंडळ स्तरावर ई-निविदा प्रसिद्ध करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |
| ३. | **नोंदित बांधकाम कामगारांच्या कौशल्यवृध्दी (RPL Scheme) योजनेबाबत.** | याबाबत बोलताना सहाय्यक कामगार आयुक्त, श्री चंद्रकांत राऊत यांनी असे नमूद केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दि.०३.०९.२०१६ च्या बैठकीमध्ये व मा.मंत्री (कामगार) यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये |

कौशल्य वृध्दीकरण योजनेबाबत सविस्तर चर्चा होऊन Recognition of Prior Learning (RPL) for Construction workers या केंद्र शासनाच्या योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्र राज्यातील नोंदीत बांधकाम कामगारांसाठी करण्याबाबत मंडळाची मंजुरी घेण्यात आली होती. त्या अनुषंगाने दि.२७.०९.२०१६ रोजी च्या पत्रान्वये शासन मंजुरीस प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

उपरोक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने पत्र दि. २७.०२.२०१७ अन्वये सदर योजनेची अंमल बजावणी करण्यासाठी मान्यता प्रदान केली आहे. त्यानुसार केंद्र शासनाने एमपॅनल केलेल्या खाली नमूद प्रशिक्षण संस्थांना तसेच प्रशिक्षणाची नियतकालीक तपासणी करण्यासाठी केंद्र शासनाने एमपॅनल केलेल्या तपासणी संस्थापैकी (ट्रेनिंग प्रोव्हायडर्स व असेसिंग बॉडीज) खालील संस्थांना महसुल विभाग निहाय नियुक्ती करण्यात येणार आहे.

| अ.क्र. | विभागाचे नांव | ट्रेनिंग प्रोव्हायडर्स | असेसींग बॉडीज |
|---|---|---|---|
| १ | कोकण विभाग | लेबरनेट सर्विसेस इंडिया प्रा.लि., बंगलोर | इंडिया स्किल्स न्यु दिल्ली. |
| २. | पुणे विभाग | आय एल अँन्ड एफ एस | इंडिया स्किल्स, न्यु |

| | | | |
|---|---|---|---|
| | | स्किल्स. नागडा | दिल्ली |
| ३. | नाशिक विभाग | जी अॅन्ड जी स्किल्स डेव्हलपर्स प्रा.लि.. पंचकुला | एकजी. चंदीगड |
| ४. | नागपूर विभाग | सुशिल बहुउद्देशीय शिक्षण संस्था. नागपूर | शिक्षा भारती न्यु दिल्ली |
| ५. | औरंगाबाद विभाग | भास्कर फाऊंडेशन. दिल्ली | वर्च्युअल एज्युकेशन ट्रस्ट |

तसेच उक्त योजनेची अंमलबजावणी परिणामकारकपणे करण्यासाठी सद्यस्थितीत मंडळाकडे स्वतंत्र असे मनुष्यबळ नसल्यामुळे सदर प्रशिक्षणाच्या कामकाजाचे प्रमाणीकरण करणे. तसेच ट्रेनिंग प्रोव्हायडर आस्थापनांकडून दैनंदिन आढावा घेणे. विविध अभिलेख तयार करणे व संबंधित संस्थांबरोबर कामाचा आढावा घेऊन एकत्रित कार्यपुर्ती अहवाल मंडळास सादर करणे. इत्यादी कामासाठी अशा क्षेत्रात अनुभव असलेल्या एल. अॅन्ड टी. पनवेल. क्रेडाई. पुणे अशा पैकी एका नामांकित संस्थेची नेमणूक करुन त्यांच्यामार्फत या योजनेची देखरेख करुन योजना राबवावी असे प्रस्तावीत करण्यात येत आहे. असे श्री राऊत म्हणाले.

यावर मा. मंत्री महोदय यांनी असे निदेश दिले की, केंद्र शासनाकडून आलेल्या परिपत्रकानुसार ज्या पाच नामांकित संस्थांची शासनाने निवड केली आहे, त्या प्रत्येक संस्थेला विभाग वाटून देवून संबंधित कंपनीशी Agreement करून त्यांना कार्यारंभ आदेश देण्यात यावेत व त्यांच्यामार्फत या योजनेची अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच सदर संस्थांच्या कामकाजावर देखरेख ठेवण्यासाठी स्वतंत्र संस्थेच्या नेमणूकीस असहमती दर्शवून ते काम मंडळामार्फत करण्यात यावे असे. मा. मंत्री महोदय यांनी स्पष्ट केले.

याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव : नोंदित बांधकाम कामगारांच्या कौशल्यवृध्दी (RPL Scheme) योजनेबाबत ट्रेनिंग प्रोव्हायडर्स (Training Providers) यांचेशी करारनामा करुन त्यांना कार्यारंभ आदेश देण्यात यावेत तसेच नियुक्ती करण्यात आलेल्या एजन्सीला कौशल्यवृध्दी (RPL Scheme) योजनेअंतर्गत जास्तीत जास्त लक्षांक देण्यात येऊन लक्षांक पुर्ती करून घेण्यात यावी, तसेच Assesment चे सुध्दा कामकाज संबंधित संस्थेकडून करून घेण्यात यावे, असा ठराव सर्वानुमते घेण्यात**

| | | |
|---|---|---|
| | | आला. |
| ४. | **योजनांची अंमलबजावणी करणेसाठी बाह्य यंत्रणेची/ सल्लागार कंपनीची (Consultant) नियुक्ती करणेबाबत.** | सदर मुद्याबाबत बोलताना मंडळाच्या सचिव यांनी सर्व उपस्थितांच्या निर्देशनास आणुन दिले की, शासन असाधारण अधिसूचना क्र. इमारत-2013:प्र.क्र.104/कामगार-7 अ. दिनांक ११.१०.२०१३ अन्वये नोंदित बांधकाम कामगारांकरिता राबवावयाच्या विविध कल्याणकारी योजना अधिसूचित करण्यात आल्या आहेत. तसेच शासन पत्र दि. १६.०६.२०१६ अन्वये सदर कल्याणकारी योजनांच्या रक्कमेत वाढ करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच मंडळाच्या ठरावानूसार व शासन मान्यतेने सदर कल्याणकारी योजनांमध्ये वेळोवेळी वाढ होत असते. त्याअनुषंगाने नोंदित बांधकाम कामगारांसाठीच्या कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी मंडळाकडून करण्यात येते.<br>कायद्यांतर्गत नोंदणी झालेल्या लाभार्थ्याला योजनेचा लाभ मिळण्यासाठी नोंदणी प्राधिकाऱ्यांकडे विहित नमुन्यात आवेदन सादर करणे आवश्यक असते. मंडळ दाव्यांना मंजूरी दिल्यानंतर वित्तीय सहाय्याचे वाटप २०१५ पासून DBT पध्दतीने करण्यात येते.<br>मंडळाअंतर्गत डिसेंबर २०१६ अखेर ५,७५,६२८ इतक्या बांधकाम कामगारांची नोंदणी झालेली असुन त्यापैकी ३०२०९७ कामगारांची नोंदणी जिवित आहे.लाभार्थ्यांना |

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.

**विषय : महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या**
**दिनांक २२.०९.२०१७ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्तांत.**

ना. मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिक यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची दिनांक २२.०९.२०१७ रोजी दुपारी २.०० वा. सह्याद्री अतिथीगृह, मलबार हील, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. ना. श्री. संभाजी पाटील निलंगेकर | मा. मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिक कल्याण. |
| २. | श्री. ओमप्रकाश (मुन्ना) यादव | मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ. |
| ३. | श्री. यशवंत केरुरे | मा. कामगार आयुक्त (शासकीय प्रतिनिधी) |
| ४. | श्री. मु. अ. नकवी | मा. संचालक व लेखा कोषागारे (शासकीय प्रतिनिधी) |
| ५. | श्रीमती वेदा आगटे | मा. मालक प्रतिनिधी |
| ६. | श्री. श्रीपाद कुटासकर | मा. कामगार प्रतिनिधी |
| ७. | श्री. विजय देवरुखकर | मा. कामगार प्रतिनिधी |
| ८. | श्री. अशोक भुताड | मा. कामगार प्रतिनिधी |

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई



४३ वी बैठक दिनांक २२.०९.२०१७

| | | |
|---|---|---|
| | | याबाबत सविस्तर चर्चा होऊन त्यानुसार खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br>**ठराव: नोंदित बांधकाम कामगारांच्या पाल्यांसाठी किमान ३० पाल्य उपलब्ध होवू शकतील अशा बांधकामाच्या ठिकाणी प्रायोगिक तत्वावर ५० ठिकाणी मोबाईल डे केअर युनिट स्थापना करण्यात यावी. सदर योजना सुरुवातीस मुंबई, MMR क्षेत्रात, पुणे व नागपूर या तीन ठीकाणी राबवावी. यासाठी मंडळाचे Consultant मे. KPMG यांनी सादरीकरण केलेल्या RFP Document ची प्रत ई-मेल द्वारे सर्व मंडळ सदस्यांना पाठवावी. मंडळ सदस्यांनी सदर RFP Document मध्ये काही बदल करावयाचे असल्यास मंडळाला आठ दिवसात कळवावे. तसेच पाल्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून मोबाईल-डे- केअर युनिट मध्ये CCTV बसविण्यात यावे व मंडळ सदस्यांनी सुचविलेल्या बदलासह प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करावा, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |
| ४. | **नोंदित बांधकाम कामगारांना त्यांच्या सोयीसाठी सुरक्षा संच (सेफ्टी किट) पुरविणेबाबत** | याबाबत मंडळ सचिव यांनी असे प्रतिपादन केले की, इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) केंद्रीय नियम १९९८ मधील नियम क्र. ४२, ४६, ५४ व ९२ नूसार व महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार नियम २००७ मधील नियम क्र. ६१ ते ८१ नूसार बांधकाम कामगारास सुरक्षासंच (उदा. हेल्मेट, जॅकेट, सेफ्टी बेल्ट, शूज, ग्लोब्ज् इ.) पुरविणे ही संबंधित कंत्राटदाराची जबाबदारी आहे. त्यामुळे कंत्राटदाराने बांधकाम कामगारांना सुरक्षा संच उपलब्ध करुन दिला पाहिजे. याकरिता मंडळाच्या अधिकाऱ्यांनी |

अध्यक्ष

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

| | | |
|---|---|---|
| | | बांधकामाच्या जागेवर जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली पाहिजे व त्यात त्रूटी आढळल्यास, संबंधित कंत्राटदारावर कारवाई करण्याची तरतूद अधिनियमात आहे.<br>मंडळाच्या दि.२४.१०.२०१६ रोजी व दि.०५.१२.२०१६ रोजीच्या बैठकीत बांधकाम कामगारांना सुरक्षा संच पुरविणेबाबत विषय सादर करण्यात आला होता व चर्चेअंती सुरक्षा संच पुरविण्याबाबत मंडळ सदस्यांनी इतर राज्यामध्ये करण्यात आलेल्या कारवाई सादर केल्यानंतर मंडळाच्या पुढील बैठकीत सदर विषय चर्चेला घेण्यात यावा असा ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला.<br>या संदर्भात इतर राज्याची माहिती घेतली असता सुरक्षा संच पुरविणेबाबतची योजना ओडीसा राज्यात राबविण्यात येत असल्याचे दिसून येते. ओडिसा राज्यामार्फत सुरक्षा संचाच्या खरेदीकरीता बांधकाम कामगारास रू.१०००/- इतके अर्थसहाय्य दिले जाते.<br>या संदर्भात मे. टेलेस्टो कॉमेंट प्रा.लि. यांच्या दि.०६.०९.२०१७ रोजीच्या पत्रान्वये मा. प्रधान सचिव (कामगार) यांना बांधकाम कामगारांसाठी सुरक्षा संच पुरवठयाबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला. सदर प्रस्ताव मंडळास प्राप्त झालेला आहे.<br>उपरोक्त प्रस्तावात खालील सुरक्षा विषयक बाबींचा समावेश आहे.<br>1. Protective Shoes<br>2. Respiratory Protection |

अध्यक्ष

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

3. Heraing Protection
4. Safety helmet
5. Safety Harness
6. Reflactive Jacket
7. Safety Goggle

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने मंडळाच्या दि.१३.०९.२०१७ च्या पत्रान्वये संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचनालय यांना अभिप्राय देणेबाबत विनंती करण्यात आली होती. संचालक औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचनालय यांनी त्यांच्या दि.१९.०९.२०१७ च्या पत्रान्वये सदर प्रस्तावातील सुरक्षा साधनांच्या तांत्रिक बाबी तसेच बांधकाम कामगारांची सुरक्षा विचारात घेवून प्रस्तावातील अनुक्रमणिके प्रमाणे खालील सुरक्षा साधने बांधकाम कामगारांना पुरविणे संदर्भात अभिप्राय नमूद केले आहेत.

| अ.क्र. | सुरक्षा साधने | प्रस्तावातील अनुक्रमांक |
|---|---|---|
| 1. | Protective Shoes (Safety Shoes) | ०१ |
| 2. | Dust Mass (Respiratory Protection) | ०५ |
| 3. | Heraing Protection (Ear Plug) | ०७ |
| 4. | Safety helmet | १३ |

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

| | | |
|---|---|---|
| 5. | Safety Handgloves | १६ |
| 6. | Safety Harness | १७ |
| 7. | Reflactive Jacket | १९ |

वरील सुरक्षा साधनाशिवाय पुरूष व महिला कामगारांना घट्ट आवरणाचे कपडे दिल्यास बांधकामाच्या जागेवर काम करताना सुरक्षिततेच्या दृष्टीने मदत होईल असे अभिप्राय उपरोक्त दि.१९.०९.२०१७ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झालेले आहे. मे. टेलेस्टो कॉमेंट प्रा.लि. या संस्थेने सादर केलेल्या प्रस्तावात एका संचाची अंदाजित रक्कम रू. ५०००/- (पॅकिंगसह) + वस्तू सेवा कर असून मंडळाकडील ३.१० लक्ष नोंदीत बांधकाम कामगारांची संख्या विचारात घेता वस्तू सेवा करासह अंदाजित रू.१६० कोटी एवढा खर्च अपेक्षित आहे. याशिवाय नव्याने नोंदणी होणाऱ्या बांधकाम कामगारांना नोंदणीच्यावेळी सुरक्षा संच देणे प्रस्तावित आहे.

इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम १९९६ चे कलम २२ मध्ये मंडळाने करावयाची कार्ये नमूद केले आहे. त्यातील कलम २२ (ह) नुसार बांधकाम कामगारांसाठी अन्य कल्याणकारी योजना राबविण्याची तसेच सदर कल्याणकारी योजना सुधारित करण्याची तरतूद आहे.

मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना सुरक्षा संच पुरविणेबाबतचा प्रस्ताव मंडळाच्या मान्यतेअंती उपरोक्त तपशीलासह योजना मंजूरीचा प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात येईल. शासन मान्यतेनंतर ई-



अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

| | | |
|---|---|---|
| | | निविदा पध्दतीने अनुभवी संस्थेची नियुक्ती करून पुढील कार्यवाही करणे प्रस्तावित आहे.<br>त्यावर महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार नियम २००७ मधील नियम क्र. ६१ ते ८१ नूसार बांधकाम कामगारास सुरक्षासंच (उदा. हेल्मेट, जॅकेट, सेफ्टी बेल्ट, शूज, ग्लोब्ज् इ.) पुरविणे ही संबंधित कंत्राटदाराची जबाबदारी आहे. त्यामुळे कंत्राटदाराने बांधकाम कामगारांना सुरक्षा संच उपलब्ध करुन दिला पाहिजे, अशी तरतूद आहे. त्यामुळे मंडळाने सुरक्षा संच खरेदी करणे योग्य वाटत नाही. मंडळाकडून सुरक्षा संच (सेफ्टी किट) कामगारांना पुरवठा न झाल्यास परिणामी एखाद्या कामगाराचा मृत्यू झाला तर त्याची जबाबदारी मंडळावर येईल. सबब, याबाबत पुर्नविचार करावा, असे मत मा. कामगार आयुक्त यांनी व्यक्त केले.<br>त्यावर मंडळाचे मा. अध्यक्ष यांनी असे स्पष्ट केले की, जरी अधिनियमाच्या तरतूदीमध्ये कंत्रादाराकडून सुरक्षा संच (सेफ्टी किट) पुरविण्यात यावी असे नमुद असले तरी, कंत्राटदार कामगारांना सुरक्षा संच (सेफ्टी किट) चा पुरवठा करत नाहीत. त्यामुळे मंडळाकडून कामगारांच्या सुरक्षततेच्या दृष्टीने सुरक्षा संच (सेफ्टी किट) देण्यात यावी. मा. अध्यक्ष यांचे मतास मा. कामगार प्रतिनिधी श्री. भुताड यांनी दुजोरा दिला.<br>त्यावर मा. मंत्री महादेय (कामगार) यांनी मंडळामार्फत कामगारांना सुरक्षा संच (सेफ्टी किट) देण्यास काहीही हरकत नाही, असे मत व्यक्त केले. |



अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

| | | |
|---|---|---|
| | | त्यानुसार सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br>**ठराव: मंडळातील नोंदित बांधकाम कामगारांना त्यांच्या सुरक्षततेसाठी सुरक्षा संच (सेफ्टी किट) पुरविण्यात यावे, सुरक्षा संच (सेफ्टी किट) पुरवठ्याकरीता संचालक औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचनालय यांनी त्यांच्या दि.१९.०९.२०१७ च्या पत्रान्वये सुरक्षा साधनांच्या तांत्रिक बाबी तसेच बांधकाम कामगारांची सुरक्षा विचारात घेवून प्रस्तावातील केलेली सुरक्षा साधने बांधकाम कामगारांना पुरविण्यात यावे. तसेच सुरक्षा संच पुरवठयासाठी ई-निविदा पद्धतीने संस्था निश्चित करावी. त्याकरीता आवश्यक RFP Document मंडळाचे e-Goverance Consultant मे. KPMG यांच्या कडून तयार करून घेण्यात यावे व योजनेच्या अटी शर्ती, अंदाजित खर्च व त्यानुसार तयार केलेले RFP Document शासन मान्यतेस सादर करावे. शासन मान्यतेनुसार पूढील कार्यवाही करावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |
| ५. | **नोंदित बांधकाम कामगार व त्यांच्या पाल्यांसाठी Essentional Kit** | याबाबत मंडळ सचिव यांनी असे प्रतिपादन केले की, शासनाकडून मंडळातील बांधकाम कामगारांना Essential Kit पुरविणेबाबतचा प्रस्ताव मंडळास प्राप्त झालेला आहे. इमारत व इतर बांधकाम (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या कलम ४० व ६२ अन्वये राज्य शासन मंडळास योजनांची अंमलबजावणी करण्याबाबत आदेश देऊ शकते. |



**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.

विषय : **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या**
**दिनांक २२.०९.२०१७ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्तांत.**

ना. मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिक यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची दिनांक २२.०९.२०१७ रोजी दुपारी २.०० वा. सह्याद्री अतिथीगृह, मलबार हील, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. ना. श्री. संभाजी पाटील निलंगेकर | मा. मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिक कल्याण. |
| २. | श्री. ओमप्रकाश (मुन्ना) यादव | मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ. |
| ३. | श्री. यशवंत केरुरे | मा. कामगार आयुक्त (शासकीय प्रतिनिधी) |
| ४. | श्री. मु. अ. नकवी | मा. संचालक व लेखा कोषागारे (शासकीय प्रतिनिधी) |
| ५. | श्रीमती वेदा आगटे | मा. मालक प्रतिनिधी |
| ६. | श्री. श्रीपाद कुटासकर | मा. कामगार प्रतिनिधी |
| ७. | श्री. विजय देवरुखकर | मा. कामगार प्रतिनिधी |
| ८. | श्री. अशोक भुताड | मा. कामगार प्रतिनिधी |

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

शहरी आवास योजना

| | | |
|---|---|---|
| | | **वार्षिक आराखडा तयार करून शासन मान्यतेस सादर करावा, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |
| ७. | **गृहनिर्माण विभागामार्फत प्रस्तवित इमारत व इतर बांधकाम क्षेत्रातील कामगारांसाठी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत "महाकामगारआवास योजना" या योजनेच्या अंमलबजावणीबाबत मंडळाचे अभिप्राय शासनास सादर करणे** | याबाबत मंडळ सचिव यांनी सर्व उपस्थितांच्या असे निदर्शनास आणून दिले की, देशातील सर्व बेघरांना पक्की घरे उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने प्रधानमंत्री आवास योजना सुरू करण्यातआलेली आहे. शासन निर्णय गृहनिर्माण विभाग दि.०९.१२.२०१५ अन्वये सदर योजना नागरी समूहांत खालील ०४ घटकांतर्गत राबविण्यात येते.<br>१. जमिनीचा साधनसंपत्ती म्हणून वापर करून त्यावरील झोपडपटटयांचा आहे तथेच पुर्नविकास करणे. (ISSR)<br>२. कर्ज संलग्न व्याज अनुदानाच्या माध्यमातून आर्थिकदृष्टया दुर्बल आणि अल्प उत्पन्न घटकांसाठी परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे (CLSS)<br>३. खाजगी भागीदारीद्वारे परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे (AHP)<br>४. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील लाभार्थ्याद्वारे वैयक्तिक स्वरूपातील घरकुल बांधण्यासाठी अनुदान (BLC)<br>उपरोक्त घटक क्र.०१ साठी केंद्र व राज्य सरकारचे अनुदान प्रती लाभार्थी रू.१.०० लक्ष इतके असून घटक क्र.०३ व ०४ साठी केंद्र सरकारचे अनुदान प्रती लाभार्थी रू.१.५० लक्ष इतके तर राज्य शासनाचे अनुदान घटक क्र.०१,०३ व ०४ करीता प्रती लाभार्थी रू.१.०० लक्ष इतके आहे. निरनिराळया घटकांतर्गत कर्ज संलग्न अनुदान वगळता केंद्र व राज्य शासनाच्या अनुदानाचा हिस्सा ४० टक्के, ४० टक्के आणि २० टक्के अशा ०३ |



अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | |
|---|---|
| | हप्त्यात मुक्त करण्यात येणार आहे. तर घटक क्र.०२ साठी विवक्षित बँका/ गृहनिर्माण वित्तीय कंपन्या व इतर संस्था त्यांच्याकडून १५ वर्षापर्यंतच्या कालावधीसाठी सवलतीच्या दराने कर्ज उपलब्ध करून देण्यात येते.<br>प्रधानमंत्री आवास योजना ही राज्यामध्ये प्रभावीपणे राबविता यावी यासाठी राज्य शासनाकडून खालील सवलती देण्यात आलेल्या आहेत.<br>१. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील व अल्प उत्पन्न गटातील लाभार्थ्यांसाठीच्या मंजूर गृहनिर्माण प्रकल्पांसाठी अंमलबजावणी यंत्रणा (म्हाडा, स्थानिक स्वराज्य संस्था किंवा इतर शासकीय व निमशासकीय संस्था) यांना आवश्यक असलेली आणि निर्बाध्यरित्या वाटपासाठी उपलब्ध असलेली शासकीय जमीन संबंधित जिल्हाधिकारी यांनी रू.१/- प्रती चौ.मी. या नाममात्र दराने कब्जेहक्काची किंमत वसूल करून संबंधित प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणेस भोगवटादार वर्ग-२ या धारणाधिकारावर संबंधित जिल्हाधिकारी यांनी प्रदान/ हस्तांतरीत करावयाची आहे.<br>२. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घटक क्र.०१, ०३ व ०४ खालील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांकरीता बांधण्यात येणाऱ्या गृहप्रकल्पास मोजणी शुल्कामध्ये ५० % इतकी सवलत देण्याबाबत जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख, पुणे यांनी दि.०३.०८.२०१६ रोजी आदेश निर्गमित केले आहेत. |

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

| | |
|---|---|
| | ३. योजनेअंतर्गत आर्थिक दुर्बल घटकातील व्यक्तींना/ लाभार्थींना वाटप करण्यात येणाऱ्या ३० चौ.मी. क्षेत्राच्या सदनिकेसाठी केवळ पहिल्या दस्ताला मुद्रांक शुल्कातून सवलत देण्यात आली असून रू.१०००/- इतके मुद्रांक शुल्क निश्चित करण्यात आले आहे.<br>४. प्रधानमंत्री आवस योजनेतील प्रकल्पांना विकास शुल्कातून सूट (नपा/मनपा अधिनियम मध्ये नगरविकास विभागाकडे सुधारणा प्रस्तावित) देण्याबाबत मंत्रिमंडळाची मान्यता प्राप्त झालेली आहे.<br>➢ **प्रंतप्रधान आवास योजनेतील प्रकल्पांना खालील सवलती देण्याबाबत प्रस्तावित करण्यात आलेले आहे.**<br>१. प्रधानमंत्री आवास योजनेतील प्रकल्पांना २.५ इतके चटई क्षेत्रफळ निर्देशांक (FSI) अनुज्ञेय करण्याची विनंती नगरविकास विभागास करण्यात आलेली आहे.<br>२. कर्ज संलग्न व्याज अनुदानाच्या माध्यमातून (CLSS) बांधण्यात येणाऱ्या गृहप्रकल्पांना मोजणी शुल्क तसेच मुद्रांक शुल्कातून सूट देण्याची विनंती महसूल व वन विभागास करण्यात येत आहे.<br>➢ <u>महाकामगार आवास योजना</u><br>या योजनेनुसार एखाद्या शहरात १० पेक्षा अधिक कामगार कार्यरत असलेल्या बांधकाम विकासकास अशा सर्व कामगारांना प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरे बांधून देणे बंधनकारक असले. यासाठी एकापेक्षा अधिक विकासक एकत्र येवून सदरची योजना राबवू शकतील. योजनेंतर्गत बांधण्यात येणारी घरकुले पंतप्रधान |

अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | आवास योजनेच्या कर्ज संलग्न व्याज अनुदान (CLSS) या घटकाच्या माध्यमातून उपलब्ध करून द्यावयाची असून सदर घरकुले MHADA, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ आणि संबंधित विकासक यांच्यामध्ये होणाऱ्या संयुक्त भागीदारी करारानुसार बांधण्यात येतील.<br>त्या अनुषंगाने प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत महाकामगार आवास योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्यासाठी इमारत व इतर बांधकाम क्षेत्रातील कामगारांकरीता परवडणारी घरे निर्माण करण्याच्या धोरणास मंत्री मंडळाची मान्यता घेण्याची बाब गृहनिर्माण विभागाकडून प्रस्तावित आहे.<br>➢ सदर महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदणीकृत बांधकाम कामगारांकरीता असेल.<br>➢ सदर योजनेंतर्गत घरकुलांची निर्मिती करण्यासाठी व्याज अनुदान वगळता खर्चाचा ८०% भार मंडळ उचलणार असून २० % कर्जाची प्रतिपूर्ती लाभार्थ्यांकडून करण्यात येणार आहे.<br>➢ त्या अनुषंगाने मान्यता/ अभिप्राय देण्याची विनंती कामगार विभागास करण्यात आलेली आहे.<br>उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दि.०९.०८.२०१७ रोजीच्या पत्रान्वये सदर मुद्याबाबत मंडळाचे स्वयंस्पष्ट अभिप्राय शासनास सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार मंडळाचे अभिप्रायासाठी सदर प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. |

अध्यक्ष

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | याबाबत बांधकाम कामांरांच्या घराकरीता मंडळाने मंजूर केलेल्या योजनांना शासनाची मान्यता प्राप्त झाली आहे काय अशी विचारणा मा. कामगार प्रतिनिधी श्री. कुटास्कर यांनी केली.<br>याबाबत मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, मंडळाने नोंदित बांधकाम कामगारांसाठी भाड्याची घरे देणे, म्हाडाकडील तयार घरे खरेदी करणे, प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्ग पात्र बांधकाम कामगारांना राज्य शासनाकडून द्यावयाचे अर्थसहाय्य रु. १ लक्ष राज्य शासनाऐवजी मंडळाकडून देणेबाबत शासन मान्यतेस प्रस्ताव सादर केलेला आहे. मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न दिनांक २८.०६.२०१७ रोजीच्या बैठकीत म्हाडाकडून घर खरेदी करणे या प्रस्तावास असहमती दर्शवून नोंदित बांधकाम कामगारांसाठी भाडयाची घरे उपलब्ध करून देण्यासाठी सचिव स्तरीय समिती गठीत करणे व प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पात्र नोंदित बांधकाम कामगारांना केंद्र शासनाकडील रु. १.५० लक्ष व राज्य शासनाचे रु. १ लक्ष याशिवाय मंडळाकडून रु. १ लक्ष एवढे अनुदान देण्यात यावे, असा निर्णय घेण्यात आला.<br>याबाबत मा. मंत्री महोदय (कामगार) यांनी असे सुचित केले की, प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पात्र नोंदित बांधकाम कामगारांना केंद्र व राज्य शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानाशिवाय मंडळाकडून रु. १ लक्ष ऐवजी रु. २ लक्ष अर्थसहाय्य देण्यासही हरकत नाही.<br>गृहनिर्माण विभागाकडून बांधकाम कामगारांकरीता प्रस्तावित करण्यात आलेल्या |



अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

| | | |
|---|---|---|
| | | "महाकामगारआवास योजना" च्या अटी शर्ती, घरांची किंमत, मंडळाचा व लाभार्थ्यांचा हिस्सा, दरमहा अदा करावयाचा हफ्ता या विविध मुद्यांवर मंडळाच्या बैठकीत चर्चा करण्यात आली. नोंदित बांधकाम कामगाराने दरवर्षी कमीत कमी ९० दिवस काम करण्याची अट पुर्ण न केल्यास सदर कामगाराची नोंदणी संपुष्टात येते. अशा सर्व बाबींवर विचारविनिमय करण्यात आला.<br>याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br>**ठराव: गृहनिर्माण विभागामार्फत प्रस्तावित इमारत व इतर बांधकाम क्षेत्रातील कामगारांसाठी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत "महाकामगारआवास योजना" ऐवजी मंडळाने नोंदित बांधकाम कामगारांच्या घराकरीता मंजूर केलेल्या विविध ठरावानुसार सादर केलेल्या प्रस्तावास शासन मान्यता प्राप्त करावी. तसेच मंडळाच्या दिनांक ०६.०६.२०१७ रोजीच्या ठरावात बदल करून प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पात्र नोंदित बांधकाम कामगारांकरीता केंद्रशासन व राज्य शासनाकडून अनुज्ञेय अनुदान रु. २.५ लक्ष शिवाय मंडळाकडून रु.२ लक्ष अनुदान देण्यात यावे. तसा सुधारित प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |
| ८. | **नोंदित बांधकाम कामगारांच्या** | याबाबत बोलताना मंडळ सचिव यांनी असे प्रतिपादन केले की, मंडळातील नोंदित बांधकाम कामगारांना त्यांनी घरखरेदी किंवा घरबांधणीकरीता बँकेकडून घेतलेल्या गृहकर्जावरील व्याजाची रक्कम |

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

कामगार आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.

**विषय : महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक ०३.०९.२०१६ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्तांत.**

मा.मंत्री (कामगार) महोदय यांचे उपस्थितीत दिनांक ०३.०९.२०१६ रोजी दु. ३.०० वाजता महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ३४ वी बैठक समिती कक्ष, कामगार आयुक्त कार्यालय, कामगार भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. श्री. ओमप्रकाश यादव | : | मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई |
| २. | मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई. | : | शासकीय प्रतिनिधी |
| ३. | मा. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई. | : | शासकीय प्रतिनिधी |
| ४. | श्रीम. वेदा धवल आगटे | : | मालक प्रतिनिधी |
| ५. | श्री. अशोक गोविंदराव भुताड | : | कामगार प्रतिनिधी |
| ६. | श्री. श्रीपाद कुटासकर | : | कामगार प्रतिनिधी |
| ७. | कक्ष अधिकारी, कामगार-७, मंत्रालय, मुंबई. | : | शासकीय प्रतिनिधी |
| ८. | श्री. चंद्रकांत राऊत | : | सहायक कामगार आयुक्त, कार्यासन-३०, मुंबई. |
| ९. | श्री. अशोक तांबे | : | लेखा अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई. |

बैठकीच्या सुरुवातीस मा.कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी मा.मंत्री (कामगार) महोदय यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत

केले तसेच मंडळाच्या सचिव यांनी मंडळाचे अध्यक्ष यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. बैठकीत चर्चा करावयाच्या विषयासंबंधीच्या कागदपत्रांचा संच सर्व मान्यवर सदस्यांना वितरित करण्यात आला.

सर्वप्रथम मा. अध्यक्ष महोदयांनी बैठकीचे कोरम पूर्ण झाल्याची खात्री करुन बैठकीस सुरूवात करण्याची परवानगी दिली. मंडळाच्या सचिव यांनी सदर बैठकीमध्ये खालीलप्रमाणे विषयनिहाय चर्चा करण्यात येत असल्याचे सांगितले.

बैठकीची विषयसूची

| अ. क्र. | विषय | घेण्यात आलेले निर्णय |
|---|---|---|
| १. | **दि.१६.०६.२०१६ रोजी संपन्न झालेल्या मंडळाच्या ३२ व्या बैठकीचे इतिवृत्त कायम करणे.** | मा. अध्यक्षांच्या परवानगीने मागील बैठकीच्या इतिवृत्तास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| २. | **मंडळातील नोंदित बांधकाम कामगार व त्यांच्या कुंटुबियांसाठी राज्य शासनाची "महात्मा फुले जन आरोग्य विमा योजना" लागू करणेबाबत.** | याबाबत बोलतांना मंडळाचे सचिव यांनी असे सांगितले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या जिवीत नोंदीत बांधकाम कामगारांना व त्यांच्या कुटूंबियांना खाजगी विमा ब्रोकर कंपनीमार्फत आरोग्य विमा योजना लागू करणे प्रस्तावित होते. त्यासाठी मंडळामार्फत कार्यवाही सुरु करण्यात आली होती. तथापि, मा. मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत दिनांक २३.०६.२०१६ रोजी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या पार पडलेल्या बैठकीत मा. मुख्यमंत्री यांनी मंडळातील जिवीत नोंदीत बांधकाम कामगार व त्यांच्या कुटूंबियांसाठी सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत सुरु करावयाच्या "महात्मा फुले जन आरोग्य विमा योजना" अंतर्गत उपलब्ध होणाऱ्या रुग्णालयाची अधिकची संख्या आणि मिळणाऱ्या आरोग्य सुविधांचा दर्जा हा खाजगी विमा कंपन्यांकडून राबविण्यात येणाऱ्या आरोग्य योजनांपेक्षा चांगला असल्यामुळे, तसेच बांधकाम कामगारांची संख्या पाहता विमा हफ्त्यासाठी करावा लागणारा खर्चही खाजगी विमा कंपन्यांकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांपेक्षा फारच |

कमी असल्याने सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे नव्याने सुरु करण्यात येणाऱ्या "महात्मा फुले जन आरोग्य विमा योजना" अंतर्गत एक स्वतंत्र गट म्हणून बांधकाम कामगारांचा समावेश करण्यात यावा. यासाठी कामगार विभाग व सार्वजनिक आरोग्य विभागाने बांधकाम कामगारांना वैद्यकीय सेवा उपलब्ध होण्यासाठी संयुक्तरित्या कार्यपध्दती तयार करावी. तसेच बांधकाम कामगारांचा सार्वजनिक आरोग्य विभागाच्या प्रस्तावित योजनेत समावेश करण्यासाठी आवश्यक कागदपत्रांमध्ये बांधकाम कामगारांचे नोंदणी प्रमाणपत्र / ओळखपत्र हा पुरावा म्हणून पुरेसा समजण्यात यावा. त्यासाठी इतर कोणत्याही कागदपत्रांची आवश्यकता राहणार नाही, अशी तरतूद "महात्मा फुले जन आरोग्य विमा योजना" अंतर्गत करण्यात यावी, असेही निदेश मा. मुख्यमंत्री यांनी दिले आहेत, असे मंडळाच्या सचिव यांनी सर्व उपस्थितांना सांगितले.

दि.२७.०६.२०१६ रोजी मा. कामगार आयुक्त, मंडळाचे सचिव, कामगार उप आयुक्त, श्री. काकतकर व मंडळाचे लेखाधिकारी यांची मा. आयुक्त, सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्यासमवेत झालेल्या बैठकीत मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना व त्यांच्या कुटूंबियांना आरोग्य विमा योजना लागू करणेबाबत त्यांचे पात्रता व निकष यावर चर्चा केली. सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी कामगारांचे ओळखपत्र व कुटूंबियांसाठी नाते संबंधाचा पुरावा म्हणून रेशनकार्ड व त्यांचे फोटो आयडी घेण्याबाबतही ठरविण्यात आले. त्या अनुषंगाने दि.२७.०६.२०१६ रोजी मा. आयुक्त, सार्वजनिक आरोग्य विभाग यांना पत्र व्यवहार करण्यात आलेला आहे.

तद्नंतर सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दि.२२.०७.२०१६ रोजीच्या पत्रास अनुसरून सदर योजना बांधकाम कामगार व त्यांच्या कुटूंबियांना लागू करण्याकरीता निर्गमित करावयाच्या शासन निर्णयाचे प्रारूप शासनास दि.२९.०७.२०१६ रोजी सादर करण्यात आलेले आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक ०८.०७.२०१६ रोजी निर्गमित शासन निर्णयान्वये सदरची योजना दि.०२.१०.२०१६ पासून संपूर्ण महाराष्ट्रात

| | | |
|---|---|---|
| | | लागू होणार आहे.<br>मा.मंत्री (कामगार) महोदय यांनी असे सूचविले की, कामगारांना सदर योजनेची माहिती व्हावी या दृष्टिकोनातून सदर योजनेची प्रसिध्दी होण्यासाठी संपूर्ण राज्यामध्ये विविध ठिकाणी सदर योजनेबाबत कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे. जेणेकरुन, जास्तीत जास्त बांधकाम कामगारांना सदर योजनेचा लाभ घेता येईल. यावर मा. कामगार आयुक्त यांनी त्याबाबत सर्व विभागीय कार्यालयांना कळविण्याच्या सूचना मंडळाच्या सचिव यांना दिल्या.<br>याबाबत चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br><br>**ठराव :**<br>**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदित बांधकाम कामगार व त्यांच्या कुटूंबियांसाठी सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या महात्मा फुले जन आरोग्य विमा योजनेची कामगारांना माहिती व्हावी या दृष्टीकोनातून सदर योजनेबाबत राज्यस्तरावर तसेच सर्व विभागीय स्तरांवर कार्यक्रमाचे आयोजन करण्याबाबत सवानुमते ठराव घेण्यात आला.** |
| ३. | **मंडळांतर्गत कामकाजाचे एकात्मिक संगणकीय प्रणाली बाह्य यंत्रणेमार्फत तयार करुन घेणेबाबत.** | मंडळाच्या सचिव यांनी सांगितले की, मंडळाच्या दि. ३०.०७.२०१४, दि.२६.०८.२०१५ व दि. ०१.१०.२०१५ रोजी पार पडलेल्या बैठकीमध्ये बांधकाम कामगार नोंदणीसाठी आवश्यक माहिती/कागदपत्रे जमा करण्यासाठी बाहय यंत्रणेची नियुक्ती करण्याचा ठराव घेण्यात आला. तसेच मंडळाच्या दि. ०२.११.२०१५ रोजी झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने RFP Document तयार करण्यासाठी मे. अर्न्स्ट ॲन्ड यंग एल.पी.पी. या कंपनीच्या Consultant ची नियुक्ती करण्यात आली. |

कामगार आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.

**विषय : महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक ०३.०९.२०१६ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्तांत.**

मा.मंत्री (कामगार) महोदय यांचे उपस्थितीत दिनांक ०३.०९.२०१६ रोजी दु. ३.०० वाजता महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ३४ वी बैठक समिती कक्ष, कामगार आयुक्त कार्यालय, कामगार भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. श्री. ओमप्रकाश यादव | : | मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई |
| २. | मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई. | : | शासकीय प्रतिनिधी |
| ३. | मा. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई. | : | शासकीय प्रतिनिधी |
| ४. | श्रीम. वंदा धवल आगटे | : | मालक प्रतिनिधी |
| ५. | श्री. अशोक गोविंदराव भुताड | : | कामगार प्रतिनिधी |
| ६. | श्री. श्रीपाद कुटासकर | : | कामगार प्रतिनिधी |
| ७. | कक्ष अधिकारी, कामगार-७, मंत्रालय, मुंबई. | : | शासकीय प्रतिनिधी |
| ८. | श्री.चंद्रकांत राऊत | : | सहायक कामगार आयुक्त, कार्यासन-३०, मुंबई. |
| ९. | श्री. अशोक तावे | : | लेखा अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई. |

बैठकीच्या सुरुवातीस मा.कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी मा.मंत्री (कामगार) महोदय यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत

कामगार आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.

**विषय : महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या**
**दिनांक ०३.०९.२०१६ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्तांत.**

मा.मंत्री (कामगार) महोदय यांचे उपस्थितीत दिनांक ०३.०९.२०१६ रोजी दु. ३.०० वाजता महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ३४ वी बैठक समिती कक्ष, कामगार आयुक्त कार्यालय, कामगार भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. श्री. ओमप्रकाश यादव | : | मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई |
| २. | मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई. | : | शासकीय प्रतिनिधी |
| ३. | मा. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई. | : | शासकीय प्रतिनिधी |
| ४. | श्रीम. वेदा धवल आगटे | : | मालक प्रतिनिधी |
| ५. | श्री. अशोक गोविंदराव भुताड | : | कामगार प्रतिनिधी |
| ६. | श्री. श्रीपाद कुटासकर | : | कामगार प्रतिनिधी |
| ७. | कक्ष अधिकारी, कामगार-७, मंत्रालय, मुंबई. | : | शासकीय प्रतिनिधी |
| ८. | श्री. चंद्रकांत राऊत | : | सहायक कामगार आयुक्त, कार्यासन-३०, मुंबई. |
| ९. | श्री. अशोक तावे | : | लेखा अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई. |

बैठकीच्या सुरुवातीस मा.कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी मा.मंत्री (कामगार) महोदय यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत

| | | |
|---|---|---|
| | | **अर्ज क्र.१**<br>प्रसुती जर शस्त्रक्रियेद्वारे झाली असेल तर त्याचा संपूर्ण खर्चाच्या पावत्या मागण्यात येऊ नये. केवळ प्रसूतिबाबत सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र व बाळाचे जन्म प्रमाणपत्र घेण्यात यावे.<br>**अर्ज क्र.२**<br>* बोनाफाईड सर्टिफिकेट असल्यानंतर पुन्हा शाळेचा दाखला घेणे अपेक्षित नाही.<br>* कामगाराच्या पाल्याच्या शैक्षणिक आर्थिक सहाय्यासाठी पत्नीच्या आधार कार्ड / मतदान कार्ड / पॅन कार्ड इ. ची आवश्यकता नाही.<br>**अर्ज क्र.४**<br>११ वी १२ वी शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतल्याचा पुरावा असा उल्लेख करावा प्रवेश पावती अपेक्षित नसावी.<br>**अर्ज क्र.१३**<br>गंभीर आजारी व्यक्तीच्या वयाबाबतच्या पुराव्याची आवश्यकता नसावी.<br>याबाबत सविस्तर चर्चेअंती खालील ठराव घेण्यात आला.<br><br>ठराव :<br>**कामगार प्रतिनिधी श्री कुटासकर यांनी सुचविलेल्या उपरोक्त सुधारणांसह मंडळाच्या योजनांचे अर्जांचे नमूने व सोबत जोडावयाच्या कागदपत्रांच्या यादीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली. सदर अर्जाचे नमुने व कागदपत्रांची यादी सर्व जिल्हा कार्यालयांना उपलब्ध करून देऊन यापुढे लाभार्थ्यांना त्याप्रमाणे अर्ज करण्याबाबत कळविण्यात यावे, असेही सर्वानुमते ठरले.** |
| ५. | मंडळातील नोंदीत बांधकाम | सदर विषयाबाबत चर्चा करताना सचिव असे म्हणाल्या की, दि.०८.१०.२०१५ |

| | | |
|---|---|---|
| | कामगाराचा नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्यास आर्थिक सहाय्य देणेबाबत ठराव घेणे. | रोजीच्या आदेशान्वये केंद्र शासनाने बांधकाम कामगारांच्या नैसर्गिक मृत्यूकरीता प्रधान मंत्री जीवन ज्योती बीमा योजनेअंतर्गत लाभ देण्याबाबत आदेशीत केलेले आहे. मंडळामार्फत प्रधान मंत्री जीवन ज्योती बीमा योजना राबविण्याबाबतची कार्यवाही सुरू करण्यात आलेली आहे. तथापि, मंडळाकडील नोंदणी ही सतत/रोजच होणारी प्रक्रिया असल्याने काही नोंदीत कामगारांचे प्रधानमंत्री जीवन ज्योती बीमा योजनेंतर्गत समावेश होण्याआधीच त्यांचा नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्याच्या कायदेशीर वारसास आर्थिक सहाय्य मिळावे या हेतूने रू.२ लाख इतका लाभ देणेबाबत ठराव घेण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.<br>**याबाबत सविस्तर चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.**<br><br>ठराव :<br>**बांधकाम कामगाराचा कामावर असतांना किंवा नसतांना कोणत्याही ठिकाणी नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्याच्या कायदेशीर वारसास रु.२ लाख इतके अर्थसहाय्य देण्याबाबत ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला. सदर ठरावास शासन मान्यता प्राप्त झाल्यानंतर सदर योजना राबविण्यात यावी व पंतप्रधान जीवन ज्योती विमा योजना किंवा मंडळाची सदरची योजना यापैकी कोणत्याही एकाच योजनेचा लाभ संबंधित कामगाराच्या वारसास घेता येईल, असेही सर्वानुमते ठरले.** |
| ६./ १९. | विषय ६ :<br>i) केंद्र शासनाने अधिनियमाच्या कलम ६० अन्वये दिलेल्या निदेशाबाबत ठराव घेणे. | सचिव यांनी सर्व उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिले की, केंद्र शासनाच्या दि.०९.०९.२०१५ रोजीच्या आदेशान्वये मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना अटल पेन्शन योजना लागू करण्याबाबत आदेशीत केलेले आहे. केवळ सोशल सिक्युरिटी |

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.

विषय : **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या**
**दिनांक २२.०९.२०१७ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्तांत.**

ना. मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिक यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची दिनांक २२.०९.२०१७ रोजी दुपारी २.०० वा. सह्याद्री अतिथीगृह, मलबार हील, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. ना. श्री. संभाजी पाटील निलंगेकर | मा. मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिक कल्याण. |
| २. | श्री. ओमप्रकाश (मुन्ना) यादव | मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ. |
| ३. | श्री. यशवंत केरुरे | मा. कामगार आयुक्त (शासकीय प्रतिनिधी) |
| ४. | श्री. मु. अ. नकवी | मा. संचालक व लेखा कोषागारे (शासकीय प्रतिनिधी) |
| ५. | श्रीमती वेदा आगटे | मा. मालक प्रतिनिधी |
| ६. | श्री. श्रीपाद कुटासकर | मा. कामगार प्रतिनिधी |
| ७. | श्री. विजय देवरुखकर | मा. कामगार प्रतिनिधी |
| ८. | श्री. अशोक भुताड | मा. कामगार प्रतिनिधी |

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

| | | |
|---|---|---|
| | | “महाकामगारआवास योजना” च्या अटी शर्ती, घरांची किंमत, मंडळाचा व लाभार्थ्यांचा हिस्सा, दरमहा अदा करावयाचा हफ्ता या विविध मुद्यांवर मंडळाच्या बैठकीत चर्चा करण्यात आली. नोंदित बांधकाम कामगाराने दरवर्षी कमीत कमी ९० दिवस काम करण्याची अट पुर्ण न केल्यास सदर कामगाराची नोंदणी संपुष्टात येते. अशा सर्व बाबींवर विचारविनिमय करण्यात आला.<br>याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br>**ठराव: गृहनिर्माण विभागामार्फत प्रस्तावित इमारत व इतर बांधकाम क्षेत्रातील कामगारांसाठी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत “महाकामगारआवास योजना” ऐवजी मंडळाने नोंदित बांधकाम कामगारांच्या घराकरीता मंजूर केलेल्या विविध ठरावानुसार सादर केलेल्या प्रस्तावास शासन मान्यता प्राप्त करावी. तसेच मंडळाच्या दिनांक ०६.०६.२०१७ रोजीच्या ठरावात बदल करून प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पात्र नोंदित बांधकाम कामगारांकरीता केंद्रशासन व राज्य शासनाकडून अनुज्ञेय अनुदान रु. २.५ लक्ष शिवाय मंडळाकडून रु.२ लक्ष अनुदान देण्यात यावे. तसा सुधारित प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |
| ८. | **नोंदित बांधकाम कामगारांच्या** | याबाबत बोलताना मंडळ सचिव यांनी असे प्रतिपादन केले की, मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना त्यांनी घरखरेदी किंवा घरबांधणीकरीता बँकेकडून घेतलेल्या गृहकर्जावरील व्याजाची रक्कम |



अध्यक्ष

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | **घरखरेदी किंवा घरबांधणीकरीता बँकेकडून घेतलेल्या गृहकर्जावरील व्याजाची रक्कम मंडळामार्फत देणेबाबत.** | मंडळामार्फत देणेबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे. सदर योजना कर्नाटक, हरियाणा व राजस्थान या राज्यांमध्ये राबविण्यात येत त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे |

| अ.क्र. | कर्नाटक | हरियाणा | राजस्थान |
|---|---|---|---|
| योजनेचे नाव | घरखरेदीबाबत आर्थिक सहाय्य | अधिनियमाच्या नियम ५३ अन्वये घर खरेदी/ घर बांधणे करीता कर्ज | बांधकाम कामगारांकरीता सुलभ गृहनिर्माण योजना |
| योजनेचा तपशील | अ)पात्रता<br>१. बांधकाम कामगारांची नोंदणी कमीत कमी ०५ वर्षे जिवीत असली पाहिजे.<br>२. कामगाराने निवृत्ती वेतन सेवेची १५ वर्षे पूर्ण केलेली असली पाहिजे.<br>३. घर कामगाराच्या किंवा त्याच्या जोडीदाराच्या नावे असणे बंधनकारक | अ) पात्रता<br>१. ०५ वर्षे नोंदणी जिवीत असणे बंधनकारक<br>२. कामगार फक्त एकदाच लाभ घेऊ शकतो.<br>३. सर्व बांधकाम कामगारांना लागू<br>४. कामागराच्या मृत्यू लागू राहणार नाही. | अ)पात्रता<br>१. कामगाराची मागील एक वर्षात नोंदणी झालेली असणे बंधनकारक<br>२. जर घर स्वता:च्या जमिनीवर बांधले असेल तर सदर प्लॉटवर स्वत: किंवा पत्नी/ पती यांची मालकी बंधनकारक<br>३. सदर मालमत्तेवर कामगाराचा पूर्ण हक्क असावा. सदर मालमत्तेबाबत कोणताही वाद असू नये. |

अध्यक्ष

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | आहे. | | ४. बँकेकडून / वित्तीय संस्थेकडून कर्जा व्यतिरिक्त स्वत:च्या बचतीचा सहभाग असावा<br>५. बांधकाम जागेचे तसेच आराखडयाचे परवाने महानगरपालिकेकडून मंजूर करून घेणे बंधनकारक<br>६. बांधकामाची जागा कायदेशीर वारसाच्या नावे असणे बंधनकारक.<br>७. कामगाराच्या नावे स्वताचे घर असल्यास तो सदर योजनेत लाभ घेऊ शकणारी नाही.<br>८. सदर घराची पती पत्नीच्या नावे संयुक्त मालकी असावी. |
| | | | ब) लाभ<br>१. सदर योजनेत नोंदीत | ब) लाभ<br>१. ०५ वर्षे नोंदणी जिवीत | ब) लाभ<br>१. केंद्र शासन व राज्य शासनाच्या |



अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | बांधकाम कामागरांना अर्ज करून लाभ घेता येणे शक्य<br>२. बांधकाम कामगारांच्या नावे घराचे खरेदीखत,मंजूर आराखडा इ. चा तपशील सादर करावा लागेल .<br>३. मंडळामार्फत घर खरेदी, घरबांधकाम व त्यावरील कर्जाच्या प्रस्तावाचे छाननी करण्यात येईल.<br>४. सदर योजनेचा अर्ज नाकारताना अर्जदारास सदर योजनेत राहिलेल्या त्रुटींची पूर्तता करण्याबाबत संधी दिली जाते. | असणे बंधनकारक आणि<br>२. अर्जदाराचे वय कमीत कमी ५२ वर्षेपेक्षा जास्त असू नये सदर योजनेचे कर्जाची परतपेड पुढील ०८ वर्षात करता यावी.<br>३. सदर योजनेचा लाभ फक्त एकदाच घेणे शक्य | विविध योजनांमध्ये पात्र ठरल्यास रू.१.५० लक्ष पर्यंत अनुदान देय राहील.<br>२. स्वताच्या प्लॉटवर घर बांधण्यासाठी आलेल्या खर्चाच्या २५% (बांधकाम खर्चाची मर्यादा रू. ५ लक्ष) अनुदान देय राहील. |
| | | | क) रक्कम<br>१. रू.५०,०००/- पर्यंत अनुदान (Subsidy) अनुदान बँक/ | क) लाभ रक्कम<br>रू. २ लक्ष | क) प्राधान्यक्रम<br>१. दारिंदयरेषेखालील कामगार पिवळे<br>२. मागासवर्गीय कामगार<br>३. विशेष पात्रता |

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | वित्तीय संस्थाना अदा करण्यात येईल.<br>२. अर्जदाराचे कर्ज रू.२ लाखापेक्षा कमी असू नये . सदर कर्जाची रू.५००००/- अनुदान (Subsidy) वगळता उर्वरित रक्कम रू. १.५ लक्ष रक्कमेवरील ०५% पेक्षा जास्त दराने येणाऱ्या व्याजाची रक्कम मंडळामार्फत अदा करण्यात येईल.<br>३. अर्जदाराने घरबांधणीच्या पूर्णत्वाचा दाखला | | ४. फक्त दोन मुली असलेले कामागार<br>५. एका वर्षापेक्षा जास्त कालावधीकरीता (२,३ किंवा ४ वर्षे) नोंदीत बांधकाम कामगार |



अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

| | | | |
|---|---|---|---|
| | व घरखरेदीच्या करारनाम्याच्या साक्षांकित प्रती सादर करणे आवश्यक आहे. | | |
| | | ड) बांधकाम कामागरांना घरखरेदी/ बांधकामाकरीता रू.२ लक्ष पर्यंत बिन व्याजी कर्ज | |

उक्त तक्त्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत राबवावयाच्या योजनेचा प्रस्तावित तपशील खालीलप्रमाणे

| | |
|---|---|
| मंडळाचे नाव | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ,मुंबई |
| योजनेचे नाव | नोंदीत बांधकाम कामगाराच्या घरखरेदी किंवा घरबांधणीकरीता बँकेकडून घेतलेल्या रू. ६ लक्ष च्या मर्यादेत गृहकर्जावरील व्याजाची रक्कम मंडळामार्फत देणेबाबत |
| योजनेचा तपशील | पात्रता<br>१. मंडळाकडे सलग तीन वर्षे नोंदीत बांधकाम कामगार<br>२. कामगाराचे वय १८ ते ५२ वर्षे या दरम्यान असावे.<br>३. घरबांधणीकरीता कर्ज घेताना स्वत:च्या मालकीची जागा, सक्षम |



अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

| | |
|---|---|
| | प्राधिकाऱ्याने मंजूर केलेला आराखडा सादर करणे आवश्यक राहील.<br>४. घरखरेदी करताना घरखरेदीकरीता विकासकासोबत केलेला नोंदणीकृत करारनामा .<br>५. कर्ज घेतलेल्या घराची पती पत्नीची संयुक्त मालकी असावी.<br>६. सदर मालमत्तेवर कामगाराचा पूर्ण हक्क असावा. सदर मालमत्तेबाबत कोणताही वाद (Dispute) असू नये.<br>७. घरखरेदी किंवा घर बांधणी करीता घेतलेल्या कर्जाबाबत बँकेचे कर्जमंजूरीचे आदेश.<br>८. सदर योजनेचा लाभ एकाच घरासाठी (एकदाच) देय रहील. |
| योजनेचा लाभ | १. पात्रता धारण करीत असलेल्या बांधकाम कामागरास बँकेने मंजूर केलेल्या कर्जापैकी रू. ६ लक्ष पर्यंतच्या कर्जावरील संपूर्ण व्याज मंडळाकडून देण्यात येईल.<br>२. व्याजाची संपूर्ण रक्कम बांधकाम कामगाराच्या बँकेतील कर्ज खात्यात थेट जमा करण्यात येईल.<br>३. पात्र बांधकाम कामागरांना देय व्याजाची रक्कम बँकेच्या मासिक विवरणानुसार देय राहील. |

नोंदीत बांधकाम कामगाराच्या घरखरेदी किंवा घरबांधणीकरीता बँकेकडून घेतलेल्या रू. ६ लक्ष च्या मर्यादेत गृहकर्जावरील व्याजाची रक्कम मंडळामार्फत देणेबाबत व प्रस्तावित अटी शर्तीमध्ये योग्य तो बदल करून योजना मंजूरीबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

| | | |
|---|---|---|
| | | मंडळाच्या मान्यतेअंती मंजूर अटी शर्तीसह योजनामंजूरीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात येईल.<br><br>याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br><br>**ठराव: नोंदित बांधकाम कामगारांच्या घरखरेदी किंवा घरबांधणीकरीता बँकेकडून घेतलेल्या रु. ६ लक्ष रक्कमेच्या मर्यादेत गृहकर्जावरील व्याजाची रक्कम मंडळामार्फत देण्यात यावी. मंडळामार्फत द्यावयाची गृहकर्जावरील व्याजाची रक्कम बांधकाम कामगाराच्या बँकेच्या कर्ज खात्यात जमा करताना खालील अटींचे पालन करावे:**<br><br>**१. बांधकाम कामगार मंडळाकडे सलग तीन वर्षे नोंदीत असावा.**<br>**२. बांधकाम कामगाराचे वय १८ ते ५२ वर्षे या दरम्यान असावे.**<br>**३. बांधकाम कामगाराने घरबांधणीकरीता कर्ज घेताना स्वत:च्या मालकीची जागा, सक्षम प्राधिकाऱ्याने मंजूर केलेला आराखडा सादर करणे आवश्यक राहील.**<br>**४. घरखरेदी करताना विकासकासोबत केलेला नोंदणीकृत करारनामा सादर करणे अनिवार्य राहिल.**<br>**५. बांधकाम कामगाराने कर्ज घेतलेल्या घराची मालकी पती-पत्नीची संयुक्त असावी.**<br>**६. सदर मालमत्तेवर बांधकाम कामगाराचा पूर्ण हक्क असावा. सदर मालमत्तेबाबत कोणताही वाद (Dispute) असू नये.**<br>**७. घरखरेदी किंवा घर बांधणी करीता घेतलेल्या कर्जाबाबत बँकेचे कर्जमंजूरीचे आदेश आवश्यक राहतील.**<br>**८. सदर योजनेचा लाभ कूटुंबाच्या एकाच घरासाठी (एकदाच) देय रहील.** |



अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक ३०/१०/२०१८ रोजी संपन्न झालेल्या ४८ व्या बैठकीचे इतिवृत्त.**

मा. मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिक कल्याण यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ४८ वी बैठक मंगळवार दिनांक ३०/१०/२०१८ रोजी दुपारी २.३० वा. सह्याद्री अतिथीगृह, मलबार हिल, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व मंडळ सचिव उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. ना. श्री. संभाजी दिलीपराव पाटील निलंगेकर | मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिक कल्याण |
| २. | श्री. ओमप्रकाश (मुन्ना) यादव | अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ |
| ३. | मा. श्री. राजेश कुमार, प्रधान सचिव | शासकीय प्रतिनिधी |
| ३. | मा. श्री. शशांक साठे, उप सचिव | शासकीय प्रतिनिधी |
| ४. | मा. श्री. सतिश मगर, | मालक प्रतिनिधी |
| ३. | मा. श्रीमती वेदा आगटे | मालक प्रतिनिधी |
| ४. | मा. श्री. श्रीपाद कुटासकर | कामगार प्रतिनिधी |
| ५. | मा. श्री. विजय देवरुखकर | कामगार प्रतिनिधी |
| ६. | मा. श्री. अशोक भुताड | कामगार प्रतिनिधी |
| ७. | मा. श्री. धनंजय माळी | संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष (निमंत्रित) |
| ८. | मा. श्री. श्री. चु. श्रीरंगम् | सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई. |

बैठकीच्या सुरुवातीस मंडळ सचिव यांनी मा. मंत्री महोदय, मा. अध्यक्ष, मंडळ सदस्य व सर्व उपस्थितांचे स्वागत केले व बैठकीत चर्चा करावयाच्या विषयांशी संबंधित कागदपत्रांचा संच व मंडळाचे मा. अध्यक्ष यांनी मंजूरी दिलेल्या दिनांक १८/०७/२०१८

**विषय क्र.०३ :- प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत बांधकाम कामगारांना ग्रामीण भागाकरीता अर्थसहाय्य मंजूर करणेबाबत.**

मंडळ सचिवांनी सादर केले की, राज्यातील इमारत व इतर बांधकाम क्षेत्रातील नोंदीत (सक्रिय) बांधकाम कामगारांसाठी शहरी भागाकरीता प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत अर्थसहाय्य देण्याकरीतेचा प्रस्ताव शासनास मान्यतेकरीता सादर करण्यात आलेला होता. उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने कामगार विभागाने दि.१७.०१.२०१८ रोजीच्या शासन पत्रान्वये मान्यता प्रदान करण्यात आली होती. तसेच, गृहनिर्माण विभागाच्या दि.०३.०२.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर योजना राबविण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात आली होती, व सदर योजनेकरीता बांधकाम कामगारांच्या पात्रतेच्या अटी मंडळ व कामगार विभागाने निश्चित करणेबाबत आदेशात नमूद करण्यात आले होते. त्यानुसार, उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दि. २९.१०.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये शहरी भागातील बांधकाम कामगार आवास योजनेतील पात्रता निश्चित करण्यात आलेली आहे. (प्रत संलग्न)

मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना घरखरेदी किंवा घरबांधणीकरीता बँकेकडून घेतलेल्या गृहकर्जावरील व्याजाची रक्कम मंडळामार्फत देणेबाबतचा प्रस्ताव शासनास मान्यतेकरीता सादर करण्यात आलेला होता. सदर प्रस्तावास शासनाने दि.१७.०१.२०१८ रोजीच्या शासन पत्रान्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. त्यानुसार क्षेत्रीय कार्यालयांना पुढील कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण भागातील नोंदीत बांधकाम कामगारांकरीता लागू करणेबाबत क्षेत्रीय स्तरावर होत असलेली मागणी विचारात घेऊन सदर योजनेच्या अंमबजावणीकरीता योजनेच्या अटी, शर्ती व लाभाची रक्कम निश्चित करणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अकोला, उप संचालक राज्य व्यवस्थापन कक्ष, ग्रामीण गृहनिर्माण विभाग, नवी मुंबई व प्रकल्प संचालक डीआरडीए यांना दि.२३.०८.२०१८ रोजी बैठकीकरीता आमंत्रित करण्यात आली होती.

सदर बैठकीत झालेल्या चर्चेनुसार योजनेच्या अटी शर्ती खालीलप्रमाणे ठरविण्यात आलेल्या आहेत.

**योजनेचे नाव:-** नोंदीत बांधकाम कामगारांकरीता प्रधानमंत्री आवास (ग्रामीण) योजनेंतर्गत अर्थसहाय्य देणे.

**लाभार्थीची पात्रता :-**

१. मंडळाकडे नोंदीत व सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना सदर अर्थसहाय्य देय राहील.

२. नोंदीत बांधकाम कामगारांचे स्वत:च्या नावे महाराष्ट्र राज्यात पक्के घर (सिमेंट व वाळूने बांधलेले घर) नसावे.

३. प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण व इतर राज्य पुरस्कृत ग्रामीण घरकुल योजनांतर्गत पात्र नोंदीत बांधकाम कामगारांना मंडळामार्फत योजनेच्या अनुदानाव्यतिरिक्त रू.८०,०००/- एवढा अतिरिक्त अनुदान अनुज्ञेय राहील.

४. ग्रामीण घरकुल योजनेस पात्र परंतु घरकुल बांधण्यासाठी स्वत:ची जागा नसलेल्या बांधकाम कामगार, पंडीत दीनदयाळ उपाध्याय जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेंतर्गत लाभास पात्र राहील.

५. प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण व इतर राज्य पुरस्कृत ग्रामीण घरकुल योजनेस लागू असणारे पात्रतेचे सर्व निकष सदरील लाभ घेण्यासाठी लागू राहतील.

६. घरकुलास पात्र लाभार्थीच्या कुटूंबातील कोणताही सदस्य नोंदीत बांधकाम कामगार असल्यास सदर लाभार्थी रू.८०,०००/- अर्थसहाय्य मिळण्यास पात्र राहील. तसेच कुटूंबातील केवळ एकाच व्यक्तीस सदर अर्थसहाय्य देय राहील.

७. एकदा लाभ घेतल्यानंतर बांधकाम कामगार पुनश्च: लाभास पात्र राहणार नाही. तसेच सदर घरकुल पुढील ०५ वर्ष हस्तांतरीत/ विक्री करता येणार नाही तसे रू.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर शपथपत्र (Affidavit) सादर करावे लागेल.

**अर्थसहाय्य मिळविण्याची पध्दत:-**

१. राज्य व्यवस्थापन कक्ष, ग्रामीण गृहनिर्माण विभाग, नवी मुंबई ही संस्था सदर योजनेकरीता समन्वय संस्था (Nodel Agency) म्हणून कार्यरत राहील.

२. नोंदीत बांधकाम कामगारांची जिल्हानिहाय यादी मंडळाकडून उपलब्ध करून देण्यात येईल.

३. नोंदीत बांधकाम कामगार प्रस्तावित योजनेकरीता पात्र ठरविल्यानंतर मंडळाकडून मंजूर अर्थसहाय्याची रक्कम राज्य व्यवस्थापन कक्ष, ग्रामीण गृहनिर्माण विभाग या संस्थेकडे वर्ग करण्यात येईल.

४. घराच्या बांधकामाच्या प्रगतीनुसार राज्य व्यवस्थापन कक्षाकडून टप्पानिहाय अनुदान बांधकाम कामगारांच्या खात्यावर PFAMS प्रणालीद्वारे वर्ग करण्यात येईल.

५. सदर योजनेची प्रचार प्रसिध्दी मंडळामार्फत केली जाईल व सदर प्रचार प्रसिध्दीचा खर्च अटल विश्वकर्मा सन्मान योजनेवर खर्ची टाकण्यात येईल.

यथाप्रस्तावित नोंदीत बांधकाम कामगारांना प्रधानमंत्री आवास (ग्रामीण) योजनेंतर्गत अर्थसहाय्य देणेबाबत लाभाची पात्रता, आवश्यक कागदपत्रे व अर्थसहाय्य वाटपाची रक्कम यास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात यावी. मंडळाने मान्यता प्रदान केल्यानंतर शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल असा प्रस्ताव मंडळ बैठकीत सादर करण्यात आला.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर योजनेनुसार पात्र लाभ धारकाला अर्थसहाय्य कसे मिळेल यांची माहिती दिली. त्यावर श्री. मगर यांनी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) यांना सदर योजनेमध्ये समन्वय सस्था म्हणून न नेमता सदर योजनेची रक्कम कामगाराच्या बँक खात्यामध्ये थेट वर्ग करण्यात यावी असे नमुद केले. यावर मा. अध्यक्ष यांनी श्री. मगर यांनी नमुद केलेल्या प्रस्तावावर विचार करावा असे सांगितले. त्या नंतर मा. सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मा. अध्यक्ष यांना कामगारांना योजनेचे रु. २ लाख कामगारांना कसे मिळतील याबाबतची प्रस्तावित कार्यपध्दती विषद केली.

बैठीस उपस्थित संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष यांनी त्यांच्या मार्फत सामाजिक न्याय विभाग व आदिवासी विकास विभागाकडून मंजूर झालेल्या व सद्यस्थितीत कक्षामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांची माहिती दिली. मंडळाची प्रधानमंत्री आवास योजना व त्यांची योजना एकत्रित कशा राबविता येवू शकतील याबाबत मा. अध्यक्षांनी विचारणा केली. त्यावर मा. प्रधान सचिव (कामगार) यांनी मंडळाने आपल्या नोंदीत सक्रीय (जिवित) कामगारांची यादी कक्षास द्यावी आणि राज्य व्यवस्थान कक्ष आपल्याकडील यादीशी ताळमेळ घेवून त्यांच्याकडील यादीत असलेले व पात्र बांधकाम कामगारांची यादी मंडळाला

पाठवतील व मंडळ स्तरावरुन निधी कक्षाकडे वर्ग करावा लागेल याबाबत स्पष्ट करतांना संचालकांनी खुलासा केला की, आमच्या कक्षामध्ये आगामी तीन ते चार वर्षात वितरीत करावयाच्या अंदाजे १२ लक्ष लाभार्थ्यांची यादी निवडण्यात आली आहे. तथापी सदर निवडलेल्या यादीत नोंदीत सक्रीय (जिवित) बांधकाम कामगार असल्यास सदर बांधकाम कामगारांना योजनेचा लाभ देता येईल अन्यथा लाभ मिळण्यासाठी प्रतिक्षा करावी लागेल. अशी प्रतिक्षा करणे बाबत सर्व मंडळ सदस्यांनी विरोध दर्शविला, मंडळाकडे निधी उपलब्ध असतांना पात्र लाभार्थ्यांना त्वरीत लाभ मिळावा असे मत व्यक्त केले. या संदर्भात सविसतर चर्चेअंती मा. मंत्री महोदयांनी निर्देश दिले की, मंडळाचे सचिव व संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष यांनी एकत्र बैठक घेवून आदिवासी विकास विभागाच्या शबरी आदिवासी घरकुल योजना आणि सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या रमाई घरकुल योजनेचा अभ्यास करावा व त्याच धर्तीवर नोंदीत बांधकमा कामगारांसाठी स्वतंत्र योजना तयारी करावी व ग्राम विकास विभागाच्या सहमतीने राज्य व्यवस्थापन कक्षामार्फत राबविण्यात यावी. नोंदीत बांधकाम कामगारांना सदर योजनेअंतर्गत रु. २.५० लक्ष एवढे अर्थसहाय्य देण्यात यावे असे प्रतिपादन केले.

योजनेचे उदिष्ट लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी मंडळस्तरावर एक कार्यकारी अभियंता व एम उप अभियंता नेमण्यात यावा व आणखी काय करता येईल हे बघावे असे सांगितले. त्यावर संचालक राज्य व्यवस्थान कक्ष यांनी असे नमुद केले की, सदर योजनेचे उदिष्ट लवकरात लवकर सफल होण्यासाठी ग्रामिण भागामध्ये ग्रामसेवकांना प्रोत्साहन देता येवू शकेल.

सविस्तर चर्चेअंती सर्वानुमते खालील ठरात घेण्यात आला.

**ठराव क्र. ४८(३)/२०१८: प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत नोंदीत सक्रीय (जिवित) बांधकाम कामगारांकरीता आदिवासी विकास विभागाच्या शबरी आदिवासी घरकुल योजना आणि सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या रमाई घरकुल योजनेच्या धर्तीवर स्वतंत्र योजना तयार करावी ग्रामीण भागाकरीता प्रती लाभार्थी रु. २.५० लक्ष ऐवढे अर्थसहाय्य देण्यात यावे. सदर योजना ग्रामविकास विभागाच्या सहमतीने राज्य व्यवस्थापन कक्षामार्फत राबविण्यात यावी. सदर योजनेच्या**

कार्यन्वयाकरीता मंडळ स्तरावर सहायक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य) या संवर्गातील एक पद निर्माण करावे. सदर पद मंडळामार्फत थेट नियुक्तीने अथवा प्रतिनियुक्तीने भरण्यात यावे. सदर योजनेच्या लाभार्थी निवडीच्या अटी शर्ती, योजना राबविण्याची पध्दती, अनुदान वितरणाची पध्दत निश्चित करुन योजना मंजूरीचा प्रस्ताव लवकरात लवकर शासन मान्यतेस सादर करण्यात यावा. शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी. असा ठराव सर्वानुमते पारीत करण्यात आला.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

**गृह निर्माण विभागामार्फत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत (सक्रीय) बांधकाम कामगारांसाठी राबविण्यात येणा-या शहरी भागातील महाराष्ट्र बांधकाम कामगार आवास योजनेतील पात्रता निश्चीत करणेबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग,उर्जा व कामगार विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: इबांका २०१७/प्र.क्र. ३६०/कामगार ७**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: २९ ऑक्टोबर, २०१८.

**वाचा-**
शासन निर्णय गृहनिर्माण विभाग क्र.प्रआयो-२०१५/प्र.क्र.१०८/गृनिधो-२,
दिनांक ०३ फेब्रुवारी २०१८.

**प्रस्तावना:-**

देशातील प्रत्येक कुटुंबाला हक्काचे घर उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने केंद्र सरकारने जून, २०१५ मध्ये सर्वांसाठी घरे या संकल्पनेवर आधारीत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आली आहे. त्यास अनुसरुन गृह निर्माण विभागामार्फत दिनांक ०९ डिसेंबर २०१५ च्या शासन निर्णयान्वये राज्यात प्रधानमंत्री आवास योजना कार्यन्वित करण्यात आली आहे. सदर योजनेची व्याप्ती वाढवून त्यात राज्यातील इमारत व इतर बांधकाम क्षेत्रातील बांधकाम कामगारांचा समावेश करुन दिनांक ०३ फेब्रुवारी २०१८ च्या शासन निर्णयान्वये शहरी भागासाठी महाराष्ट्र बांधकाम कामगार आवास योजना जाहीर करण्यात आली आहे. त्यात लाभार्थी म्हणून पात्र होण्यासाठी खालील अटी व शर्ती निश्चीत करण्यात आलेल्या आहेत.

अ) महाराष्ट्र बांधकाम कामगार आवास योजनेंर्तगत लाभास पात्र असणारा गृहनिर्माण प्रकल्प महारेरा अधिनियम, २०१६ अंतर्गत नोंदणीकृत असावा.

ब) लाभार्थी कामगार हा महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे नोंदणीकृत व योजनेंतर्गत पात्र असावा.

क) वरील ब) प्रमाणे पात्र कामगार, अट व क्रमांक अ) प्रमाणे नोंदणीकृत कोणत्याही प्रकल्पातील घरकुल योजनेत सहभागी झाल्यास महाराष्ट्र बांधकाम कामगार आवास योजनेंर्तगत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडून देय प्रती लाभार्थी रु.२ लक्ष इतके अनुदानारा पात्र राहील.

२. दिनांक ०३ फेब्रुवारी २०१८ च्या शासन निर्णयान्वये बांधकाम कामगाराची पात्रता निश्चित करण्यासंदर्भात संबधीत मंडळ व कामगार विभाग यांच्यावर जबाबदारी सोपवलेली आहे. त्यास अनुलक्षून शहरी भागातील महाराष्ट्र बांधकाम कामगार आवास योजनेतील सदनिकेसाठी अर्ज करण्यासाठी बांधकाम कामगाराची पात्रता खालील प्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय:-**

**अ. योजनेच्या अंमलबजावणीसाठी निवडलेले कार्यक्षेत्र व अर्ज करण्या-या नोंदीत (सक्रिय) बांधकाम कामगारास अर्ज करावयाचे कार्यक्षेत्र.**

(१) दिनांक ०३ फेब्रुवारी २०१८ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र बांधकाम कामगार आवास योजनेस मान्यता देण्यात आली असून सदर योजनेची अंमलबजावणी ही संचालक, राज्य अभियान संचालनालय (सुकाणू अभिकरण ) यांचे मार्फत करण्यात आलेली असून ही सुकाणू अभिकरण हे शहरी भागात कार्यरत आहे.

(२) सदर योजनेंर्तगत शहरी भागातील निवडलेल्या गृहनिर्माण प्रकल्पातील सदनिकेसाठी त्याच जिल्ह्यातील नोंदणीकृत (सक्रिय) असलेले बांधकाम कामगार मागणी करु शकतील. मात्र मुंबई, नवी मुंबई व ठाणे क्षेत्रातील नोंदीत (सक्रिय) बांधकाम कामगार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील परिघामधील प्रकल्पांमध्ये उपलब्ध असलेल्या सदनिकेसाठी मागणी करु शकतील.

**ब. सदनिका उपलब्ध असणा-या प्रकल्पाची माहिती, पात्रता तपासणी व लाभार्थी निवड**

(१) महारेरा अधिनियम २०१६ अन्वये नोंदणीकृत असलेल्या विकासकास प्रधानमंत्री आवास योजनेतील मंजूर गृहनिर्माण प्रकल्पासाठी शासनाच्या वेगवेगळ्या विभागामार्फत सूट व सवलती देण्यात आलेल्या आहेत. त्यास अनुलक्षुन महाराष्ट्र बांधकाम कामगार आवास योजनेंर्तगत शहरी भागातील प्रकल्पातील सदनिकेची किंमत, सदनिकेचे क्षेत्रफळ प्रमाणीत करणे, तसेच गृहनिर्माण प्रकल्पाचे स्थळ निश्चीत करुन त्याची यादी गृह निर्माण विभाग, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाला उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करेल. या यादीतील सदनिकेसाठी इच्छुक व पात्र होणा-या बांधकाम कामगारांची नावे, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांनी संचालक, राज्य अभियान संचालनालयाकडे (सुकाणू अभिकरणास )सादर करावीत.

(२) प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मंजूर प्रकल्पातील सदनिकांसाठी संचालक, राज्य अभियान संचालनालयाकडे (सुकाणू अभिकरणास ) प्राप्त झालेल्या अर्जापैकी नोंदीत (सक्रिय) बांधकाम कामगारांचे अर्ज, सदर अर्जांची पात्रता तपासण्यासाठी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे वर्ग करण्याची कार्यवाही संचालक, राज्य अभियान संचालनालय (सुकाणू अभिकरणास )यांनी करावी.

(३) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने संचालक, राज्य अभियान संचालनालय यांचेकडे (सुकाणू अभिकरणास )सादर केलेल्या यादीतील नावातून लाभार्थी म्हणून निवड करण्याचे अधिकार व त्यासाठी आवश्यक प्रक्रिया राबविण्याचे अधिकार सुकाणू अभिकरणास राहतील. सुकाणू अभिकरणाने सदनिका वाटपाकरिता अंतिम केलेला नोंदीत (सक्रिय) बांधकाम कामगार लाभार्थी म्हणून मंडळाच्या अनुदानास पात्र राहील.

**क. अर्ज करण्यासाठी बांधकाम कामगाराची पात्रता**

दिनांक ०३ फेब्रुवारी २०१८ च्या शासन निर्णयान्वये जाहिर केलेल्या शहरी भागातील महाराष्ट्र बांधकाम कामगार आवास योजनेतील सदनिकेसाठी अर्ज करण्यासाठी बांधकाम कामगारांची पात्रता खालील प्रमाणे राहील.

(१) शहरी भागातील महाराष्ट्र बांधकाम कामगार आवास योजनेचा लाभ घेण्यासाठी बांधकाम कामगार हा नोंदणीकृत (सक्रिय) असावा तथापि तो महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे सलग एक वर्षापेक्षा अधिक, बांधकाम कामगार म्हणून नोंदणीकृत असावा.

(२) शहरी भागातील महाराष्ट्र बांधकाम कामगार आवास योजनेअंतर्गत लाभार्थी म्हणुन निवडलेला बांधकाम कामगार हा महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील रु.२ लक्ष अनुदानास पात्र आहे. मात्र सदर अनुदान संचालक, राज्य अभियान संचालनालय यांच्या अधिनस्त असलेल्या राज्य अभियान संचालनालयाकडे जमा करण्यात येईल.

(३) बांधकाम कामगारांच्या नावे अथवा त्यांच्या पती/पत्नीच्या नावे स्वत:ची सदनिका नसेल असेच बांधकाम कामगार, शहरी भागातील महाराष्ट्र बांधकाम कामगार आवास योजनेचा लाभ घेण्यास पात्र राहतील. तसे त्यांनी रु. १०० च्या मुद्रांकावर ( Stamp Paper) लेख प्रमाणक ( Notary ) करुन देणे अनिवार्य राहील.

(४) सदनिका प्राप्त झाल्यापासून पुढील पाच वर्षापर्यंत कोणत्याही प्रकारे बांधकाम कामगारास सदनिका हस्तांतरीत करता येणार नाही.

२. सदरचे शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध असून, त्याचा संगणक संकेतांक २०१८१०२९१२३८३६५६१० असा आहे. तसेच सदरचा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Digitally signed by Shashank M. Sathe
Date: 2018.10.29 12:42:10 +05'30'

(श. मा. साठे)
उप सचिव , महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव.
३. सर्व सन्माननीय विधानसभा/विधानपरिषद सदस्य
४. मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव.
५. मा. राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव.
६. मा. अध्यक्ष, इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांचे स्वीय सहायक.

७. मा.विरोधी पक्ष नेता (विधानपरिषद /विधानसभा) यांचे खाजगी सचिव.
८. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक.
९. सर्व अ.मु.स /प्र.स./सचिव मंत्रालयीन विभाग.
१०. प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहाय्यक.
११. समितीचे इतर सर्व सदस्य (व्दारा कामगार आयुक्त)
१२. कामगार आयुक्त, मुंबई / अतिरिक्त कामगार आयुक्त, मुंबई/पुणे/नागपूर.
१३. उप कामगार आयुक्त, मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, औरंगाबाद.
१४. सचिव, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई
१५. महालेखापाल-१ महाराष्ट्र (लेखापरिक्षा व लेखा अनुज्ञेयता), मुंबई.
१६. महालेखापाल-२ महाराष्ट्र (लेखापरिक्षा व लेखा अनुज्ञेयता), नागपूर.
१७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१८. निवडनस्ती (कामगार-७).

महाराष्ट्र शासन

इबांका -२०१७/प्र.क्र.४७४/काम ७,
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
दिनांक:- १७ जानेवारी,२०१८

प्रति,

कामगार आयुक्त,
"कामगार भवन",
बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,
बांद्रा (पूर्व), मुंबई -५१.

विषय:- महाराष्ट्र इमारत व इतरबांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत पात्र बांधकाम कामगारांच्या घरखरेदी किंवा घरबांधणीकरीता बँकेकडून घेतलेल्या गृहकर्जावरील व्याजाची रक्कम मंडळामार्फत देणेबाबत.

संदर्भ:- १.आपला दिनांक २७ ऑक्टोबर २०१७ रोजीचा प्रस्ताव.
२.शासनपत्र समक्रमांक दिनांक ७ नोव्हेंबर, २०१७.
३.आपले दिनांक ३० नोव्हेंबर,२०१७ रोजीचे पत्र.

महोदय,

महाराष्ट्र इमारत व इतरबांधकाम कामगार कल्याण मंडळातील नोंदीतपात्र बांधकाम कामगारांच्या घरखरेदी किंवा घरबांधणीकरीता बॅकेकडून घेतलेल्या गृह कर्जावरील व्याजाची रक्कम मंडळामार्फत देणेबाबतच्या योजनेच्या अंमलबजावणीस खालील नमूद अटीं/शर्तींच्या अधीन राहून शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

I. राष्ट्रीयीकृत बँकेने मंडळाकडील नोंदणीकृत पात्र बांधकाम कामगारास रु.६ लक्ष अथवा त्यावरील कर्ज महत्तम १० वर्षाच्या कालावधीत परतफेड करण्याच्या करावावर मंजूर केले असेल तर महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ केवळ रु.६ लक्ष भांडवलावर आकारलेले वर्षनिहाय व्याज बँकेस अदा करेल. तथापि मंडळाकडून प्रत्येक वर्षी बांधकाम कामगाराची पात्रता तपासणे अनिवार्य राहील.

II. योजनेअंतर्गत मंडळामार्फत बांधकाम कामगाराच्या गृहकर्जावरील द्यावयाच्या व्याज अनुदानाची महत्तम मर्यादा रु.२ लक्ष राहील. तसेच कर्ज मंजुरीसोबत बांधकाम कामगारांच्या कर्जाचा विमा काढणे अनिवार्य राहील.

iii. सदर योजनेचा लाभ वय वर्ष १८ ते ५० वयोगटातील नोंदणी पात्र बांधकाम कामगार घेण्यास पात्र राहतील.

iv. नोंदीत पात्र बांधकाम कामगार यांच्या स्वत:च्या अथवा पती/पत्नीच्या नावे घर नसेल असेच बांधकाम कामगार या योजनेचा लाभ घेण्यास पात्र ठरतील व त्या आशयाचे हमीपत्र बांधकाम कामगारांकडून घेण्यात यावे.

v. सदर योजनेतून लाभ घेताना घर पती- पत्नीच्या संयुक्त नावे नोंदणीकृत असणे अनिवार्य आहे. तथापि, त्यातून अविवाहीत /विधवा/विधूर/ परितत्क्या बांधकाम कामगारांस वगळण्यात यावे.

आपला,

(द. य.डांगे)

कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन

प्रत-

१) सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई, यांस माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित,

२) निवडनस्ती, कामगार-७

**विषय क्र.०२ :- मंडळाकडे नोंदित बांधकाम कामगारांच्या मुलीच्या विवाहासाठी रु. ५१०००/- अर्थसहाय्य देणेबाबत.**

मंडळ सचिव यांनी सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या स्थापनेनंतर मंडळाच्या विविध बैठकांमध्ये नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांसाठी कल्याणकारी योजना राबविणे संदर्भात ठराव पारित करण्यात आले आहेत. मंडळाने पारित केलेल्या ठरावानुसार योजना मंजूरीचे प्रस्ताव वेळोवेळी शासनास सादर करून शासन मान्यतेअंती योजनेचा लाभ नोंदीत बांधकाम कामगारांना देण्यात येत आहे.

सद्यस्थितीत मंडळस्तरावरून नोंदीत बांधकाम कामगारांसाठी एकूण २९ विविध कल्याणकारी योजना राबविल्या जातात. सदर योजनांमध्ये नोंदीत बांधकाम कामगारांच्या पहिल्या विवाहाच्या खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी रू.३०,०००/- इतके अर्थसहाय्य मंडळामार्फत दिले जाते. माहे मार्च २०१९ पर्यंत सदर योजनेंतर्गत १७५३ बांधकाम कामगारांना लाभ अदा करण्यात आलेले आहे.

नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांच्या पाल्यांकरीता शैक्षणिक लाभाच्या विविध योजना राबविण्यात येत आहेत. तथापि, मुलांच्या विवाहकरीता कोणतीही योजना राबविली जात नाही. नोंदीत बांधकाम कामगार, लोकप्रतिनिधी व कामगार संघटनांकडून मंडळास सादर निवेदनामध्ये बांधकाम कामगाराला मिळणारे अल्प वेतनामधून दैनंदिन खर्च भागवून मुलीचे विवाह करताना अनेक आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागते. ही बाब विचारात घेता नोंदीत बांधकाम कामगारांच्या मुलीच्या विवाहाकरीता रू.५१,०००/- एवढे अर्थसहाय्य मंडळातर्फे देण्याबाबत विनंती करण्यात आली आहे. मंडळामार्फत आयोजित विविध कल्याणकारी योजनांच्या वर्धा, अकोला येथील लाभ वाटप कार्यक्रमामध्ये सुध्दा यासंदर्भात मागणी नोंदविण्यात आलेली आहे.

मंडळामार्फत सन २०१८ मध्ये राजस्थान या राज्यातील इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाला भेट दिली असता सदर भेटीमध्ये मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती घेतली असता राजस्थान या राज्यात नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांच्या एका मुलीच्या विवाहाकरीता रू.५१,०००/- एवढे अर्थसहाय्य देण्यात येत आहे.

नोंदीत बांधकाम कामगार, लोकप्रतिनधी, कामगार संघटना इत्यादींकडून प्राप्त विनंतीस अनुसरून खालीलप्रमाणे योजना मंजूरीचा प्रस्ताव मंडळाच्या मान्यतेस सादर करण्यात आला होता.

योजनेच्या अटी शर्ती खालीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात आले होते.

| अ. क्र. | योजना व योजनेच्या अटीशर्ती | सादर करावयाचे कागदपत्रे |
|---|---|---|
| १. | नोंदीत बांधकाम कामगारांच्या मुलीच्या लग्नाकरीता अर्थसहाय्य | |
| २. | नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगार असावा. | ओळखपत्र/नुतनीकरण |
| ३. | एका मुलीच्या विवाहखर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी रू.५१,०००/- एवढे अर्थसहाय्य देय राहील. | ओळखपत्रातील कुटूंबाच्या तपशीलामध्ये मुलीच्या नावाची नोंद असावी. |
| ४. | मुलीचे वय १८ वर्षापेक्षा जास्त असावे. | ओळखपत्रामध्ये जन्म तारखेची नोंद असावी. |
| ५. | मुलीचे शिक्षण कमीत कमी १० वी पर्यंत असावे | १० वी उत्तीर्ण प्रमाणपत्र |
| ६. | मुलीचा विवाह संपन्न झाल्याचा पुरावा सादर करावा. | लग्नपत्रिका/ लग्नाचे फोटो/ विवाह नोंदणी प्रमाणपत्र |

उक्त बाबींच्या अनुषंगाने प्रस्तावित मंडळाकडील नोंदित बांधकाम कामगारांच्या एका मुलीच्या विवाहखर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी रु. ५१०००/- अर्थसहाय्य देणेबाबतची योजना मान्यतेकरीता सादर करण्यात आली होती.

सदर बैठकीत मा. मंत्री महोदय कामगार विभाग यांनी असे सूचित केले की, प्रस्तावित योजनेच्या अटी शर्तीमधून शिक्षणाची अट वगळण्यात यावी तसेच मुलीचा विवाह संपन्न झाल्याचा पुरावा म्हणून विवाह नोंदणी प्रमाणपत्र घेण्यात यावे. सदर सुचनेस सर्व मंडळ सदस्यांनी सहमती दर्शविली व चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव सर्वानुमते घेण्यात आला

**ठराव क्रं. ५२(२)/२०१९ :- नोंदीत बांधकाम कामगारांच्या मुलीच्या विवाहाकरीता रू.५१,०००/- एवढे अर्थसहाय्य मंडळातर्फे देण्याबाबतच्या योजनेस मान्यता प्रदान**

करण्यात येत आहे. सदर योजनेच्या अटी शर्ती खालीलप्रमाणे असतील.

१. नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांच्या एका मुलीच्या विवाहाकरीता रू.५१,०००/- एवढे अर्थसहाय्य देण्यात यावे.

२. मुलीचा विवाह संपन्न झाल्याबाबतचे विवाह नोंदणी प्रमाणपत्र सादर करावे.

३. नोंदीत बांधकाम कामगाराच्या ओळखपत्रातील कुटूंबाच्या तपशीलात मुलीच्या नावाची नोंद असावी.

४. लग्न झालेल्या मुलीचे वय १८ वर्षापेक्षा कमी असू नये. याबाबत वयाचा पुरावा (ओळखपत्रातील नोंद/ जन्माचा दाखला/ शाळा सोडल्याचा दाखला/ बोनाफाईड सर्टिफिकेट/) सादर करावा.

सदर निर्णयानुसार प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा व शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

# महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ,मुंबई.

एमएमटीसी हाऊस, पाचवा मजला प्लॉट नं. सी २२,
ब्लॉक - ई , वांद्रे- कुर्ला संकुल बान्द्रा (पुर्व),मुंबई ४०० ०५१.

## महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या ५७ व्या बैठकीचे इतिवृत्तांत

*******

बैठक स्थळ :- सहयाद्री अतिथिगृह, मलबार हिल, मुंबई
दिनांक :- ०२.०३.२०२१ (मंगळवार)
वेळ :- दुपारी ०४.०० वाजता

**विषय क्र.०१ :- मंडळाच्या दि.२७.१०.२०२० रोजी संपन्न ५६ व्या बैठकीचे इतिवृत्तांत कायम करणे.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, मा.अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ५६ वी बैठक दिनांक २७.१०.२०२० रोजी दुपारी १.०० वा. आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीच्या इतिवृत्तांतास मा.अध्यक्ष महोदयांनी मान्यता दिली आहे. सदर इतिवृत्तातांत काही बदल असल्यास सुचवावा अशी विनंती मंडळ सचिवांनी केली. सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र. ५७(१)/२०२१:- मंडळाच्या दि.२७.१०.२०२० रोजीच्या ५६ व्या बैठकीचे इतिवृत्तांत कायम करण्यास मान्यता देण्यात येत आहे, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

**विषय क्र.०२ :- मंडळाकडील नोंदित जिवित (सक्रीय) बांधकाम कामगारांकरिता राबविण्यात येत असणाऱ्या विविध कल्याणकारी योजनामध्ये सुधारणा करणे व नवीन योजना लागू करणेबाबत विचार विनिमय करणे.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, मा. मंत्री महोदय, कामगार विभाग यांच्या अध्यक्षतेखाली, मा. प्रधान सचिव (कामगार विभाग) व मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांच्या उपस्थितीत दि.०४.०१.२०२१ रोजी देशातील अन्य ०६ राज्यात राबविण्यात येत असलेल्या विविध कल्याणकारी योजनांच्या तुलनात्मक सादरीकरणाबाबत संपन्न बैठकीत महाराष्ट्र राज्यातील विविध कल्याणकारी योजनांमध्ये सुधारणा/बदल व नवीन योजना राबविणेबाबत घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने राज्यातील ०५ जिल्हा कार्यालयाचे अभिप्राय मंडळास प्राप्त झालेले आहेत. सदर बैठकीतील निर्णय व जिल्हा कार्यालयाकडून प्राप्त अभिप्राय विचारात घेऊन मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांमधील बदल/ सुधारणा, नवीन योजना राबविणे प्रस्तावित आहे. तसेच, केंद्र शासनाचे निर्देश व कामगार संघटनांनी उच्च न्यायालयात सादर केलेल्या याचिकेच्या अनुषंगाने इमारत व इतर बांधकामावर काम करणाऱ्या बांधकाम कामगारांच्या नोंदणीकरीता आवश्यक ९० दिवस काम केल्याचे स्वयं साक्षांकित (Self certificate) प्रमाणपत्र घेणेबाबत विचारविनिमयाकरीता प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. त्यानुसार सोबतच्य

विवरणपत्रात नमूद केल्याप्रमाणे मंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध कल्याणकारी योजना, प्रस्तावित सुधारणा/ बदल/ नवीन प्रस्तावित योजना व बांधकाम कामगाराने ९० दिवस काम केल्याचे स्वयं साक्षांकित प्रमाणपत्र याबाबतचा तपशील सादर करण्यात आला होता. सदर तपशीलाबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला होता.

ठराव क्र.५७(२)/२०२१ :-

१. मंडळाकडील नोंदित जिवित (सक्रीय) बांधकाम कामगारांकरिता राबविण्यात येत असलेल्या विविध कल्याणकारी योजनामध्ये सोबतच्या सहपत्रात नमूद केल्याप्रमाणे सुधारणा/ बदल करणे, योजना बंद करणे, प्रस्तावित नवीन ०२ योजना कार्यन्वित करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. त्यानुसार प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा.

२. सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे बहुतांश कालावधीत शाळा/ महाविद्यालये बंद होती अथवा ऑनलाईन पध्दतीने कार्यरत होती अशा स्थितीत दि.०१.०४.२०२० ते दि.३१.०३.२०२१ या कालावधीत शैक्षणिक सहाय्याच्या योजनेचा लाभ घेण्यासाठी शाळा/ महाविद्यालयातील उपस्थितीची अट शिथील करण्यात येत आहे.

३. कोविड-१९ विषाणू प्रादुर्भाव कालावधीत दि.३१.०३.२०२० पर्यंत नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना दोन टप्प्यात रू.५०००/- अर्थसहाय्य वाटपाची कार्यवाही दि.३१.०३.२०२१ पर्यंत पूर्ण करण्यात यावी.

४. मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती बांधकाम कामगार, लोकप्रतिनिधी, कामगार संघटना, स्वयंसेवी संस्था, संबंधित कार्यालये व अन्य संबंधित संस्था व व्यक्ती पर्यंत पोहचविण्यासाठी माहिती पुस्तिका तयार करून सदर माहितीपुस्तिकेचे वाटप करण्यात यावे.

५. बांधकाम कामगारांना ९० दिवस काम केल्याबाबत स्वयं साक्षांकित प्रमाणपत्र (Self Certificate) बाबत अन्य राज्यांकडून माहिती प्राप्त करून मंडळाच्या आगामी बैठकीत विचारविनिमयाकरीता प्रस्ताव सादर करण्यात यावा,

असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

**ब. मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांकरीता प्रस्तावित योजनांबाबत मंडळाच्या दि.०२.०३.२०२१ रोजीच्या ५७ व्या बैठकीतील निर्णयाचा तपशील**

| अ. क्र. | योजनेचे नाव | मिळणारा लाभ | आवश्यक कागदपत्रे | मंडळाच्या दि.०२.०३.२०२१ रोजीच्या ५७ व्या बैठकीतील निर्णय |
|---|---|---|---|---|
| १. | नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगाराचा अपघात/ नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्याचे शव मूळ गावी पाठविण्यास अर्थसहाय्य | बांधकाम कामगाराने नोंदणी करताना घोषित केलेल्या मूळ प्रति कि.मी. रू.२०/- अथवा एस.टी. महामंडळाच्या आगारप्रमुखाने प्रमाणित केलेल्या अंतरासाठी प्रति कि.मी. रू.२०/- प्रमाणे | १. सक्षम वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेला मृत्यूचा दाखला<br>२. नामनिर्देशित व्यक्ती उपलब्ध नसल्यास उत्तराधिकारी प्रमाणपत्र<br>३. अर्जदाराचे आधारकार्ड व बँकेचा तपशील<br>४. सर्व सत्यप्रतीवर वारसदाराची स्वाक्षरी असावी. | नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगाराचा अपघाती/ नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्याचे शव नोंदणी करताना घोषित केलेल्या मूळ गावी पाठविण्यासाठी एस.टी. महामंडळाच्या आगारप्रमुखाने प्रमाणित केलेल्या अंतरासाठी प्रति कि.मी. रू.२०/- प्रमाणे शव वाहतूकीची रक्कम आगाऊ स्वरूपात त्यांच्या वारसास देण्यात यावी. |
| २. | नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांचा अपघात होऊन हात किंवा पाय निकामी झाल्यास कृत्रिम हात किंवा पाय बसविण्यासाठी अर्थसहाय्य देणे. | प्रत्यक्ष खर्चाच्या आधारे | १. सक्षम वैद्यकीय अधिकाऱ्यांनी हात अथवा पाय निकामी झाल्याचे प्रमाणित करणे.<br>२. कृत्रिम हात किंवा पाय बसविणेबाबत सक्षम वैद्यकीय अधिकाऱ्याचे शिफारस पत्र<br>३. Artificial Limb Manufacuring Corporation of India कडून कृत्रिम हात किंवा पाय बसविल्याचे प्रमाणपत्र | नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांचा अपघात होऊन हात किंवा पाय निकामी झाल्यास बांधकाम कामगाराने कृत्रीम हात/ पाय Artificial Limb Manufacuring Corporation of India, Kanpur (Regional office Navi Mumbai) या संस्थेकडून बसवावा. त्यासाठीचा खर्च Artificial Limb Manufacuring Corporation of India, Kanpur या संस्थेने प्रमाणित केल्याप्रमाणे अदा करण्यात यावा. |

**महाराष्ट्र शासन**

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई – ४०० ०३२.

दूरध्वनी- ०२२- २२७९३८५५
E-mail ID:- ashok.mande@nic.in

दि. ०१ फेब्रुवारी, २०२२.

क्र. इबांका २०२१/प्र.क्र.७८/कामगार-७

प्रति,

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ,
एमएमटीसी हाऊस, पाचवा मजला,
ई ब्लॉक, सी-२२, बांद्रा कुर्ला संकुल, बांद्रा (पू.) मुंबई ५१

विषय:- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदित बांधकाम कामगार लाभार्थ्यांकरिता नविन कल्याणकारी योजना राबविणेबाबत

संदर्भ:- १. आपले पत्र क्र. मइवइबाकमं/मुलीच्या विवाहाकरिता/१५५/२०१९, दि २६.०९.२०१९

२. आपले पत्र क्र. मइवइबाकमं/मंछध्ह बैठक विषय क्र.२/३८/२०२१, दि.४.५.२०२१

महोदय,

विषयाधीन प्रकरणी संदर्भाधीन पत्रान्वये मंडळाने शासनास पाठविलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मला आपणांस असे कळविण्याचे निर्देश आहेत की, खाली नमूद केलेल्या तीन योजनांना शासन मान्यता देण्यात येत आहे. सदर योजनांची व्याप्ती, नियमावली, लाभार्थ्यांचे निकष इ. बाबी अंतिम करुन योजनांची अंमलबजावणी तातडीने करण्यात यावी व त्याबाबतचा कार्यपालन अहवाल शासनास सादर करावा, ही विनंती.

१. अपघाती नैसर्गिक मृत्यू झालेल्या नोंदित बांधकाम कामगार लाभार्थ्यांचे शव शववाहिनीद्वारे मूळ गावी पाठविण्यासाठी एस. टी. महामंडळाच्या आगार प्रमुखाने प्रति किलोमीटर अंतरासाठी प्रमाणित केलेल्या दराप्रमाणे अर्थसहाय्य देणे.
२. नोंदित बांधकाम कामगार लाभार्थ्यांचा अपघातात हात किंवा पाय निकामी झाल्यास कृत्रिम अंग जोडण्यासाठी अर्थसहाय्य देणे.
३. नोंदित बांधकाम कामगारांच्या एका मुलीच्या विवाहाकरिता रु. ५१,०००/- एवढे अर्थसहाय्य देणे.

आपली,

(शिल्पा चौधरी)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत,

निवड नस्ती